# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



ऑक्टोबर १९८६

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान.
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

श्री. रा. द. बन्ने

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

---

**वर्ष ६५ वे]**

**श्रीसाईबाबा पुण्यतिथी विशेषांक**
**किंमत १ रुपया**
**दूरध्वनी क्रमांक ४१२२५६१**

**[ अंक ७ वा**

---

: कार्यालय :

**'साईनिकेतन'', प्लॉट नं ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.**

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# श्री साई वाक्सुधा

येता कोणीही दर्शनासी।
लागतां चरण वंदावयासी।
असो हिंदु यवन वा पारसी
दक्षिणा त्यापासीं मागत॥ ९०॥

ती तरी काय थोडी थोडकी।
रुपये एक दोन वा पंचकडी।
मागत शत सहस्त्र लक्ष कोडी।
स्वेच्छा परवडी दक्षिणा॥ ९१॥

दिधली तरी आणीक आणा।
संपली म्हणतां उसनी घ्याना।
जेव्हां कोठें उसनीही मिळेना
तेव्हां मग याचना थांबवीत॥ ९२॥

आणीक तयां भक्तां म्हणत।
"फिकीर न करीं जा यत्किंचित।
देईन तुजला रुपये मी मस्त।
वैसें तूं निश्चिंत मजपाशीं॥ ९३॥

दुनियेमें किसी का कोई है।
और किसीका कोई है।
अपना तो यहां कोई नहीं है।
अपना अलाही अल्ला है॥ ९४॥

करी जो मज जीव प्राण।
ऐसियाचीच मज वाण।
तो देतां मज एक गुण।
देतो मी शतगुण तयासी" ॥ ९५॥

— श्री साई सच्चरित् अध्याय १४ वा.

# सुविचार

उद्योगिनं पुरुषसिंह मुपैति लक्ष्मीः।
देवं हि दैवमिति कापुरुषा वदन्ति।
दैवं निहत्य कुरु पौरुषमात्मशक्त्या।
यत्न कृते यदि न सिद्धयति कोऽत्र दोषः

*

उद्योग करणाऱ्या पराक्रमी पुरुषाकडे संपत्ति चालत येते. नशीब, नशीब अशी ओरड हलके लोक करीत असतात. नशिबास बाजूस सारून स्वतःचे सामर्थ्य पराक्रमी लावतात. खटपट करूनही जर यशस्वी झाला नाही तर दोष कोणाचा?


या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील
मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# श्री साईलीला — ऑक्टोबर १९८६

## अनुक्रमणिका


| क्रमांक | लेख-कविता शिर्षक | लेखक-कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | ४ |
| २ | वंदन करूनी साई चरणाला | — कवी जयराज | ५ |
| ३ | श्री साईसच्चरितातील काही ओव्यांचे गूढार्थ | — श्री. मु.ब. निंबाळकर | ६ |
| ४ | बाबांच्या कृपेने गाय बरी झाली | — श्री. हरीभाऊ शेळके | १२ |
| ५ | श्री. साईनाथांचा शरणार्थी (१७) | — श्री. विश्वास खेर | १३ |
| ६ | श्रीसाई उदीचे महत्व | — श्री. संजीव चंदने | १६ |
| ७ | साईभक्त श्री. दासगूण | — | १८ |
| ८ | सरस्वती सदन | — प्रा. प्र.के. धर्माधिकारी | २४ |
| ९ | भक्ती मार्ग | — सौ. निर्मला राजे | २५ |
| १० | नमस्कार तुजला साईनाथा | — कु. पंकज साटम | २६ |
| ११ | खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | — साईनंद | २७ |
| १२ | साईगुरु | — कु. सिंधु थोरात | २८ |
| १३ | रामाचे रामफळ, सितेचे सीताफळ लक्ष्मणाचे.... | — श्री. मधुसूदन करंबेळकर | २९ |
| १४ | साईबाबांचे प्राणी-प्रेम | — सौ. भावना जेऊरकर | ३१ |
| १५ | विश्वव्यापी देव-सद्गुरु साईनाथ | — सौ. संगीता गोडबोले | ३३ |
| १६ | श्री साईबाबा व गीतासार | — कै. श्री. पृ.कृ. धुपकर | ३५ |
| १७ | बाबांच्या भक्तांची नावे व त्यांच्या वाचनातील ग्रंथ | — श्री. राघवेंद्र डी. कुलकर्णी | ३९ |
| १८ | ग्रंथ परिचय | — शुभनिल | ४० |
| १९ | चालविसी हाती धरुनिया | — कु. वत्सला आजगांवकर | ४१ |
| २० | चरण मिठी | — डॉ. इंदू नाईक | ४२ |
| २१ | बाबांनी साईप्रकाशला वाचविले | — श्री. एन.आर. देशपांडे | ४३ |
| २२ | नवसास माझी पावेल समाधी.... | — सौ. पुष्पलता सुर्यवंशी | ४४ |
| २३ | मंगळसूत्र मिळाले | — सौ. उमा कीर्तने | ४६ |
| २४ | नित्य मी जिवंत.... | — कु. स्मिता म. चिटणीस | ४७ |
| २५ | श्री साई कृपेचा वरद हस्त लाभलेले एक सिद्ध-स्तोत्र | — श्री. विनायक शेंडे | ४८ |
| २६ | श्रीबाबांचा एक विशेष आलेला अनुभव | — सौ. मालती भोसले | ५० |
| २७ | श्रद्धा व सबुरी कार्य सिद्धी करी | — सौ. मनोरमा तळवडेकर | ५१ |
| २८ | साईबाबांची कृपा | — सौ. अर्चना तावडे | ५२ |
| २९ | ही श्री बाबांचीच लीला | — श्री. सूर्यकांत गर्जे | ५३ |
| ३० | साईनाथ गुरु | — डॉ. कापडी | ५४ |
| ३१ | पाठीराखा साई | — सौ. पुष्पा वडगावे | ५५ |
| ३२ | विजयादशमी | — श्री. विश्वनाथ चव्हाण | ५७ |
| ३३ | नवयुगाला साईंचा महान संदेश | — श्री. प्रमोद रायसोनी | ५८ |
| ३४ | ... आणि इच्छा पूर्ण झाली | — श्री. व.दा. वेदक | ५९ |
| ३५ | शिरडीवृत्त | — | ६० |
| ३६ | नाम तुझे गोड साई | — सौ. कुन्दा गोडे | ६४ |

## संपादकीय



विजयादशमी उर्फ दसरा हा श्री साईबाबांच्या निर्वाणाचा अर्थात पुण्यतिथीचा महन्मंगल दिवस. १५ ऑक्टोबर १९१८ रोजी विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर बाबा समाधिस्त झाले. या घटनेस यंदा ६८ वर्षे झाली. शिर्डीत प्रतिवर्षी तीन महोत्सव विशेष भव्य प्रमाणात साजरे केले जातात. श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा नि विजयादशमी. या तिन्ही उत्सवास भक्तगण फार मोठ्या संख्येने हजर राहात असतो व बाबांच्या थोरवीला व त्यांच्या चिरस्मरणीय नि लोकोपकारी कामगिरीला साजेशा भव्य स्वरूपात हे उत्सव साजरे केले जातात.

श्री साईनाथांच्या निर्वाणीची ६८ वर्षे हां हा म्हणता निघून गेली आहेत. ह्या कालखंडाचा बाबांच्या दृष्टीने प्रत्येक भक्ताने विचार करण्यासारखा आहे. ६८ वर्षापूर्वी श्री साईनाथ शिरडीत देहाने वावरत होते. आपल्या भक्तांच्या सुखदुःखाची चिंता वाहात होते. त्यांना दिलासा देत होते.

आणि आता एवढा काळ लोटला तरी भक्तजनांच्या दृष्टीने त्यांचे जे महत्तम कार्य आहे ते आजही त्याच जोमाने चालू आहे. श्री महाराजांनी आपल्या हयातीत भक्तांना सांगून ठेवले होते की, मी जरी देहाने दूर गेलो, दृष्टीआड झालो तरी माझे भक्त हेच माझे सर्वस्व असल्यामुळे मी त्यांच्यापासून कधीही दूर जाणार नाही. त्यांच्या हृदयात माझे निरंतर स्थान राहील. ज्या ज्या वेळी श्रद्धायुक्त अंतःकरणाने माझे भक्त मला हाक मारतील त्या त्या वेळी मी त्यांच्या हाकेला त्यांच्या पुढ्यात येऊन उभा राहीन व त्यांचे जे काही दुःख असेल ते मी नाहीसे करीन, त्याबद्दल त्यांनी पक्की खात्री बाळगावी.

संत चूडामणी श्री बाबांनी आपल्या भक्तांना उद्देशून आपल्या हयातीत हे जे आश्वासन दिले त्याचे पालन आजवर त्यांनी केले आहे व भावी काळातही ते भक्तांच्या अनुभवास आल्याशिवाय रहाणार नाही. गेल्या ६८ वर्षाच्या काळात हजारोच नव्हे तर लक्षावधीच नव्हे तर कोट्यावधी भक्तांनी या आश्वासनाचा अनुभव घेतला आहे व आजही भक्त घेत आहेत.

साईभक्तांनो, ६८ वर्षाचा कालावधी हा काही थोडाथोडका म्हणता येणार नाही. या कालावधीत या देशातच नव्हे तर अखिल जगतात कितीतरी घडामोडी झाल्या, उलथापालथी झाल्या, क्रांत्या झाल्या व जीवनमूल्ये बदलली. परंतु शिरडीत समाधिस्थ झालेल्या या थोर सत् पुरुषाने भक्तांना जी आश्वासने दिली ती बव्हंशी खरी ठरली आहेत. शिरडीत बाबांच्या दर्शनाला नव्हे भेटीला येणारा भक्तसमूह दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे. रोजच्या रोज बाबांच्या दर्शनासाठी नि अभिषेक पूजा-अर्चा वगैरे कार्यानिमित्त वाढत्या प्रमाणात भक्तगण येऊ लागलेला आहे. अशी ही जी वाढ चालली आहे ती का उगाच?

याचे कारण एकच. आजही श्री साईबाबांचे अस्तित्व नि कर्तृत्व पूर्वीइतकेच जाणवत

आहे. बाबा भक्तिभावनेने व श्रद्धायुक्त अंतःकरणाने दिलेल्या हाकेला ओ देतात. भक्ताचे दुःख मग ते कोणत्याही प्रकारचे असो, ते दूर करण्यासाठी झटतात अशी भक्तांची पूर्ण खात्री झालेली आहे. आणि त्यामुळे यांच देशात नव्हे तर देशाबाहेरही दूरदूरच्या ठिकाणी बाबांचे भक्त फार मोठ्या प्रमाणात पसरलेले आहेत. ते परोपरीने बाबांची आठवण करतात व बाबाही त्यांच्या आठवणींचे फळ त्यांच्या पदरात टाकल्या शिवाय रहात नाहीत.

अशा प्रकारे गेल्या ६८ वर्षातील कालखंडाकडे सहजासहजी जरी नजर फिरविली तरी वर्षानुवर्ष साई भक्तीचा सुखसोहळा वृद्धींगत होत चालल्याचे आढळून येईल.

"जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती, देह कष्टविती उपकारे, संत साईबाबांसारखे, सत्पुरुष केवळ लोक कल्याणासाठी या भूतलावर अवतीर्ण होतात. आपले ते कार्य पार पाडतात व देहाने या जगातून दृष्टीआड झाल्यानंतरही त्या लोक कल्याण कार्याची ध्वजा सतत व अविरत फडकवीत ठेवीत असतात.

श्री साईनाथांच्या लोक कल्याणकारी कार्याची ध्वजा गेली ६८ वर्षे अखंड, अव्याहत फडकत राहिली आहे तशीच ती पुढेही फडकत राहील यात बिलकूल शंकाच नाही. बोला —

आकाशात तारका, शिरडीत द्वारका
साईनाथासारखा देव नाही देव नाही

श्री परम कृपाळू साईनाथांच्या या अडुसष्टाव्या पुण्यतिथीनिमित्त समस्त भक्तांना व त्यांच्या कुटुंबियांना श्रीबाबांचे शुभाशिर्वाद.

# वंदन करूनी साई चरणाला

आदी नमन गणरायाला
वंदन करूनी साईचरणाला ॥ धृ० ॥

शिर्डी ग्रामी अवतरला
भक्ती भावांचा संगम झाला
वंदू लागले सर्व साईला
आदी नमन गणरायाला
वंदन करूनी साईचरणाला ॥ १ ॥

सर्व धर्मिय वंदू लागले
सर्व धर्माचे एक नांदले
भेदभावही सर्व विसरले
आदी नमन गणरायाला
वंदन करूनी साईचरणाला ॥ २ ॥

करावी नित्य साई भक्ती
साई नामात मोठी शक्ती
सर्व दुःखाची हिच मुक्ती
आदी नमन साई चरणाला ॥ ३ ॥

साई रुपी भगवंत पाहीला
नाना दाखवी जना लीला
शरण यावे साई नाथाला
आदी नमन गणरायाला
वंदन करूनी साईचरणाला ॥ ४ ॥

— कवी जयराज

# श्रीसाईसच्चरितातील काही ओव्यांचे गूढार्थ

— श्री. मु. ब. निंबाळकर
१/१४, फाईव्ह स्टार अपार्टमेंटस्,
बंड गार्डन रोड, पुणे-४११ ००१.

(माझ्या श्रीसाईसच्चरिताच्या नित्य पठणात व अभ्यासात काही ओव्यांचा शब्दार्थाशिवाय आणखी काही गूढार्थ कधी कधी मला सुचला, कोठेतरी वाचला किंवा कोणा साईभक्ताशी केलेल्या चर्चेत निदर्शनाला आला तो वेळोवेळी मी टिपून ठेवलेला तो खाली देत आहे. वाचकांना तो पटला नाही किंवा उद्‌बोधक वाटला नाही तरी मनोरंजक खास वाटेल अशी आशा करतो. — लेखक)

**१) "माझे माणूस कितीही दूर। असेना सात समुद्रांपार।**
**चिडीसारखा मी बांधूनिया दोर। ओढूनि सत्वर आणितो" ॥ २८ ॥**

**— अध्याय ५१**

चिडी म्हणजे चिमणी. एखादा मुलगा चिमणीच्या पोराच्या पायाला दोरी बांधून ज्याप्रमाणे त्याला आपल्याकडे ओढून घेतो त्याप्रमाणे बाबा आपल्या भक्तांना आपणाकडे ओढून घेतात. मग त्या भक्ताची इच्छा असो वा नसो. ज्याप्रमाणे चिमणीचे काही चालतच नाही त्याप्रमाणे भक्तांचे काही चालतच नाही. ते ओढलेच जातात व एकदा बाबांकडे गेले की ते परत जातच नाहीत. चिकटतातच. हेमाडपंतांनी नाही का म्हटले?

जो जो साईस पाहूं सरला। तो तो जागचे जागींच ठेला।
पुनश्च नाही मागे परतला। पायींच रतला साईंच्या ॥ ११ ॥

— अध्याय ३५

**२) रमते राम आयोजी आयोजी। उद्धियांकी गोनियां लायोजी ॥ ध्रु. ॥**

**— अध्याय ३३/२९**

मनाची लहर लागल्यावर आनंदित होऊन बाबा त्यांच्या उदीबद्दल वरील ध्रुपद वरचेवर सुस्वराने म्हणत असत. बाबांनी रामाचेच नाव का घेतले? कृष्णाचे किंवा इतर देवांचे का नाही? जणू काय बाबांना सांगावयाचे होते की, त्यांची उदी रामाच्या बाणाप्रमाणे अमोघ म्हणजे निश्चित परिणामकारक आहे. खरेच आहे. आपणा सर्वांना याचा अनुभव येतच आहे. श्रीसाईसच्चरितातही अन्य ठिकाणी एका भक्ताने म्हटले आहे —

म्हणे ऐसें रामबाण विचित्र। औषध अन्यथा असेना ॥ १३४ ॥

— अध्याय ३४

**३) सर्वांगी जरी ओतलें उदक। शिरचि तेवढें ओले एक।**
**इतर अवयव खुले टाक। वस्त्रींही टांक न जलाचा ॥ १८१ ॥**

**— अध्याय २८**

मेघाने बाबांना गंगोदकाने स्नान घालण्याचा आग्रह चालविला तेव्हा बाबांनी त्याला सांगितले की, "माझ्या डोक्यावरच तेवढे पाणी घाल." परंतु तसे करताना मेघा प्रेमाने दाटला व त्याने 'हर गंगे' म्हणून सबंध अंगावरच कलश रिकामा केला. तथापि वर म्हटल्याप्रमाणे बाबांचे फक्त शिरच तेवढे ओले झाले आणि बाकी अंग वस्त्रांसह कोरडेच राहिले. चमत्कार तर खराच. बाबांनी आपला शब्द खरा करून दाखविला, पण त्याबरोबरच जणू काय मेघाला खात्री पटवून दिली की, ते त्याचे इष्टदैवत साक्षात शंकरच आहेत. शंकराने नाही का स्वर्गातून आलेला गंगेच्या पाण्याचा लोट आपल्या जटेतच रोखून ठेवला होता.

**४) आणिक कैसी नवलपरी। आप्पा नामें एक आचारी।**
**उभा तेथेंच धुनीशेजारीं। बाबा तयावरी घालिती ।। १०८ ।।**
**म्हणती हे शेटजी इथवर आले। ते मजकरितां नाहीं श्रमले।**
**आप्पांलागीं प्रेम दाटलें। म्हणूनि पातले शिरडीस ।। १०९ ।।**

**— अध्याय ३५**

काका महाजनींचे शेठ ठक्कर धरमसी जेठाभाई यांना उद्देश्यून बाबांनी वरील वाक्ये म्हटली होती. इतर पुष्कळ भक्त समोर उभे असताना बाबांनी या आचारी आप्पाचेच नाव का घेतले? धरमसींना जेवण आगदी व्यवस्थित लागत असे. शिरडीस ते बाबांच्या दर्शनाला आले परंतु आधी एका गुजराती खाणावळीत आपल्या साग्रसंगीत जेवणाची व्यवस्था करून मगच. बाबांना हे कळले होते व म्हणूनच त्यांच्या जीभेच्या चोचल्याबद्दल बाबांचा हा हसत हसत टोमणा! दुसऱ्या कोणाला याचा अर्थ कळला नाही पण धरमसी मनात समजून गेले. अशी होती बाबांची शिकवणीची अनोखी तऱ्हा!

**५) "काय करावें आई आज। गेलो मी बांद्र्यास जैसा रोज।**
**नाहीं खावया प्यावया पेज। उपाशी मज यावें लागलें ।। १०७ ।।**

**— अध्याय ९**

हे शब्द बाबांनी सौ. तर्खडना उद्देशून म्हटले होते. त्यांचे पती श्री. बाबासाहेब तर्खड बांद्र्याला नेहमीप्रमाणे खडीसाखरेचा नैवेद्य दाखवायला विसरले होते व म्हणून बाबांना भरदुपारी अन्नाविण परतावे लागले होते. यावरून बाबांना सर्वांना हे दाखवून द्यावयाचे होते की, त्यांचे तसबिरीला दाखविलेला नैवेद्य त्यांना पावतो. बाबांना सगुण भक्ती व मूर्तिपूजा (ते मुसलमानी वेष धारण करत असले व 'अल्ला मालिक' असे तोंडाने सारखे म्हणत असले तरी) मान्य होती. खालील उदाहरणे याला पुष्टी देतात :—

(१) मुंबईच्या बाळाबुवांनी चार वर्षांपूर्वी बाबांच्या छबीचे दर्शन घेऊन नमस्कार केला होता. ते शिरडीस आल्यावर बाबांनी त्यांची व आपली चार वर्षांपूर्वीची ओळख आहे असे सर्वांना सांगितले. (अ. ३३)

(२) १९१७ साली होळीच्या दिवशी पहाटे कै. दाभोलकरांच्या स्वप्नात येऊन बाबांनी सांगितले की, ते त्यादिवशी दुपारी त्यांचेकडे भोजनाला येतील व खरोखरीच भोजनाच्या

पंक्ती बसल्या असताना कै. दाभोलकरांचे मित्र अल्लीमहमद बाबांची मातीची मूर्ती घेऊन आले. जणूकाय बाबा साक्षातच प्रकट झाले. (अ. ४०)

(३) वणी येथील सप्तशृंगी देवीच्या पुजाऱ्याच्या (काकाजीच्या) स्वप्नात येऊन देवीने त्याला मनाच्या शांतीकरिता बाबांकडे जाण्यास सांगितले व इकडे बाबांनी देखील काकाजीला आपल्याकडे घेऊन येण्यासाठी शाम्याला नवस फेडण्याचे निमित्त काढून वणीस पाठविले. यावरून बाबांची व दगडाच्या मूर्तीतील देवीची एकात्मता तर दिसून येतेच परंतु श्रीकृष्ण भगवानांच्या खालील म्हणण्याचीही प्रचीती येते —

"संत माझीच सजीव प्रतिमा। संत सप्रेमा तो मीच" ॥ ३० ॥

— अध्याय ११

अशा प्रकारे बाबांनी आपल्या भक्तजनांना सगुण भक्तीचे व मूर्तिपूजेचे महत्त्व पटवून दिले होते.

**६) ज्याचे आंबे त्यानेंच घ्यावे। किमर्थ आपणां कोणाचे व्हावे।**
**ज्याचे असतील त्यानेंचि खावे। मरूनि जावे खावोनी ॥ ९४ ॥**

**— अध्याय २५**

बाबांचे हे शब्द अहमदनगरच्या दामू अण्णाला उद्देशून होते. कोळंब्यात चार आंबे शामा ठेवून गेले होते व दामू अण्णांनीच उचलून घ्यावे अशी बाबांची इच्छा होती. कारण तो दामूअण्णाच्या कुटुंबाला प्रसाद होता. परंतु बाबा 'मरूनि जावे खावोनी' असे भलतेच का म्हणाले? आई आपला मुलगा फार हट्ट करून काही मागू लागला की ती रागाने नाही का म्हणत, "घे मेल्या! मर जा एकदाचा!" परंतु मनातून काही तिची तशी इच्छा नसते. तसे तर बाबांचे नसेल ना?

किंवा तत्त्वज्ञानांच्या दृष्टीने विचार केला तर असाही अर्थ निघू शकेल. जवळ बसलेल्या म्हाळसापतींनीच तो दामू अण्णांना समजावून सांगितला होता. ते म्हणाले होते, "अरे अण्णा! हे शारिरीक/देहाचे मरण नव्हे तर आध्यात्मिक आयुष्याचे मरण होय. याला दुसऱ्या शब्दात संसारातील प्रमाद किंवा भ्रम म्हणतात. मुले झाली व संसारातील जबाबदाऱ्या वाढून त्यात गुरफटून गेले की तो वाढत जातो. शिवाय बाबांच्या चरणाशी मरण आले तर ती कृपाच म्हणावयाची — आपला उद्धारच. तेव्हा ते आंबे तू घेच."

बाबा अर्थात दामू अण्णाचा हा गोंधळ पाहून मनातल्या मनात आपल्या या विनोदावर हसत होते. मग लगेच दया येऊन त्यांनी खुलासा केला, "अरे दाम्या! ते आंबे तू नाही खायचे. तुझ्या बायकोला दे. धाकटीला, तिला आठ मुले होतील" असो.

वर म्हाळसापतींनी दामूअण्णाला सांगितलेला मरणाचा अर्थ म्हणजे ओढून ताणून केलेला काहीतरी अर्थ नव्हे. सनत्कुमारांनी हेच म्हटले आहे.

"प्रमादो मृत्युरहं ब्रविमि। (प्रमादालाच मी मृत्यू म्हणतो) तसेच हेमाडपंतही पुढे अध्याय ५२ मध्ये हेच स्पष्ट करतात :—

**प्रमाद** मिथ्या ज्ञानाचे कारण। आत्मरूपी अनवधारण।
जेथूनि उद्भवे जनन-मरण। सर्वानर्थ-निदान जें॥ १२ ॥

**मोह** म्हणजे मिथ्या ज्ञान। अनात्मठायीं आत्माभिमान।
**तोच मृत्यू विद्वज्जन। लक्षण करितात ।। १३ ।।**

**७) "असो बारवी पलीकडे थेट। आहे जी पाऊलवाट।**
**चालूनि येसील काय तूं निट। विचार जा स्पष्ट तयातें" ।। ९७ ।।**
**"चार वेळांतीं चाळीस हजार। रुपये तूं देणार काय मज" ।। ९९ ।।**
**'आज बोकड कापावयाचा मानस।**
**आहे आमुचा मशिदीस। तुज काय गोस पाहिजे ।। १० ।।**
**किंवा पाहिजे तुवर अस्थी। किंवा वृषण वासना चित्ती" ।। १०२ ।।**

— अध्याय ११

कल्याणच्या सिदीक फाळकेला हे तीन प्रश्न शामामार्फत बाबांनी विचारले होते. काय त्याचा अर्थ होता? सिदीक फाळके मक्का-मदीना यात्रा करून आलेला वृद्ध हाजी होता. त्याला आपण यात्रा करून आल्याची घमेंड होती व शिरडीला आल्यावर बाबांनी त्याला अति मानसन्मानाने वागवावे अशी त्याची अपेक्षा होती. बाबा हे सर्व जाणून होते म्हणूनच त्यांनी आधी ९ महिने तर त्याला मशिदीवर चढूच दिले नाही. मग हळूहळू त्याचा अहंकार उतरला असे पाहून वरील प्रश्न विचारून त्याची शरणागती कोठवर पोहोचली आहे याची परीक्षा घेतली. पहिल्या प्रश्नाने सिदीक फाळके आपल्या शरीराने किती कष्ट सोसण्यास तयार आहे हे, दुसऱ्या प्रश्नाने तो किती द्रव्य खर्च करण्यास तयार आहे हे व तिसऱ्या प्रश्नाने तो बाबांसाठी आपल्या मनाच्या इच्छा आकांक्षा किती मारण्यास तयार आहे हे बाबांनी पडताळून पाहिले. सिदीक फाळक्याने देखील यथोचित उत्तरे देऊन बाबांपुढे आपली तन, धन व मन यासकटची शरणागती दर्शविली आणि बाबा संतुष्ट झाले.

परंतु तरी बाबा त्याचेवर पुन्हा का खवळले?

कोळंबा आणि पाण्याच्या घागरी। स्वये उचलूनि भिरकाविल्या द्वारीं।
हात चावोनियां करकरी। आले शेजारी हाजीच्या ।। १०६ ।।
धरूनि आपली कफनी दों करीं। हाजीसन्मुख उचलूनि वरी।
म्हणती "तूं काय समजलास अंतरीं"। करिसी फुशारी मजपुढें ।। १०७ ।।
बुढढेपणाचा तोरा दाविसी। ऐसेंचि काय तूं कुराण पढसी।
मक्का केल्याचा ताठा वाहसी । परि न जाणती तूं मातें" ।। १०८ ।।

— अध्याय ११

तर हा राग हाजीच्या दुर्वृत्तींचा नाश करण्यासाठी होता. हे झाल्यावर नाही का बाबांनी लगेच आंबे विकत घेऊन त्याला पाठविले, पुन्हा येऊन पंचावन्न रुपये खिशातून काढून दिले व जेवावयासही निमंत्रिले. अशा प्रकारे बाबांचा राग हा भक्तांच्या अंतिम कल्याणाकरिताच असे. याच अध्यायात हेमाडपंत म्हणतातः—

जरी क्रोधे कांपले थरथरां। डोळे जरी फिरविले गरगरां।
तरी पोटीं कारूण्याचा झरा। माता लेंकुरा तैसा हा ।। ७३ ।।

आणि बाबांचे बोल उद्धृत करतात :—

माय हाणी लेंकुरा लाता। समुद्र करी नदियां परता।
तरीच मी होय तुम्हां अव्हेरिता। करीन अहिता तुमचिया ।।७५।।

८) **''खालीं डोकें वरती पाय। टांगी उफराटे 'जै' गुरूराय।**
**तै मज आनंद कैसा होय। समर्थ गुरूमाय जाणाथा।।९०।।**

**— अध्याय ३२**

बाबांना त्यांच्या गुरूंनी एका विहिरीवर नेऊन झाडाला दोन्ही पाय बांधून पाण्यावर अलगद उलटे लोंबत सोडले होते व ते दुसरीकडे निघून गेले होते. नंतर ४।। -५ तासांनी ते परत आले व बाबांना घाईघाईने मोकळे केले. बाबांना मात्र या उलटे टांगण्याचा मुळीच त्रास झाला नाही व उलट आनंदच वाटला. याबद्दल बाबांचे वरचे उद्‌गार आहेत.

काहींच्या मते वरील गोष्टीचा अर्थ शब्दशः न घेता लाक्षणिक घेतला पाहिजे. उलटे टांगले म्हणजे सुख कसे वाटेल? उलट त्रासदायकच व अस्वस्थ वाटेल. तेव्हा याचा खरा अर्थ बाबांच्या गुरुंनी त्यांना समाधि अवस्थेत नेले होते असा असावा. समाधि लागण्यासाठी बाहेर विषयांकडे धावणारी इंद्रिये आत व वर ओढून घ्यावी लागतात व तेच बाबांच्या गुरुंनी त्यांना साधून दिले होते. विहिररूपी संसारात पाणीरूपी विषयांजवळ तर बाबांना ठेवले होते परंतु हात न पोचण्याइतके दूरही ठेवले होते. उलटे टांगल्यामुळे सर्व इंद्रिये आत व वर सहस्त्रधाराकडे ओढून जाऊन बाबांना समाधि लागली होती. आणि म्हणूनच त्या ४।। -५ तासात बाबा अत्यंत आनंदनिर्भर अवस्थेत होते असो.

तथापि माझ्या मते उलटे टांगण्याचा शब्दशः अर्थ घेतला तरी हरकत नाही. अहो! संतांची कृपा करण्याची रीत अशी नेहमी उलटीच असते. स्वतः बाबांनी नाही का एका भक्ताचा सुजलेला डोळा ठेचलेल्या बिब्ब्याचा गोळा बांधून बरा केला? बापूसाहेब बुट्टींची वांती व रेच त्यांना बदामपिस्त्यासह दूध पाजून बरी केली आणि भिमाजी पाटलांचा क्षयरोग त्यांचे स्वप्नात जाऊन त्यांना छडीने फोडून व वक्षःस्थळावर वरवंटा फिरवून बरा केला. गुजरातच्या मोटा महाराजांना तर बाबांनी १९३८ साली (समाधीनंतर २० वर्षांनी) कराची येथे समोर प्रकट होऊन शहराच्या भर रस्त्यावरून दिवसाढवळ्या सर्व कपडे काढून नागव्याने घरी परतण्यास आज्ञा दिली होती. अलीकडेच दुसऱ्या संतांचे उदाहरण द्यावयाचे तर ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराजांचे सद्‌गुरु श्री तुकाराम महाराजांनी त्यांना वडाच्या झाडाची तोडलेली पाने पुन्हा झाडाला लावायला सांगितली होती. तेव्हा हेमाडपंत पुढे लगेच म्हणतात तेच खरे :—

संताघरची उलटीच खूण। हें तों अनुभवजेय ज्ञान।
एथें निष्ठात एक प्रमाण। एक साधन गुरुकृपा।।९२।।

— अध्याय ३२

**(९) ऐकतां हे बाबांनी म्हटलें। वीट नाहीं कीं कर्मचि फुटलें।**
**ऐसे वदूनि हळहळले। नेत्रीं आले दुःखाश्रू ॥ ५० ॥**

**— अध्याय ४४**

पुष्कळ वर्षांपासून बाबांची एक जुनी वीट होती. तिचा आधार घेऊन बाबा रात्री एकांतात आसन लावून बसत असत. देहत्यागाच्या काही दिवसांआधी केर काढणाऱ्या एका मुलाच्या हातून ती फुटली. तेव्हा बाबांना फार दुःख झाले व ते हळहळून शोक करू लागले. बाबा अगदी विरक्त होते तरी लोकसंग्रहाकरिता त्यांनी हा देखावा केला असे हेमाडपंत म्हणतात. पण कदाचित "वीट नाहीं कीं कर्मचि फुटलें" या शब्दांनी त्यांचे स्वतःचे नव्हे तर भक्ताचेच कर्म फुटले असे तर बाबांना सांगायचे नसेल ना? मग बाबांचा कंठ दाटणे व नेत्री अश्रू येणे ठीकच होते. आपण गेल्यावर भक्तांचे कसे होणार याचा विचार येऊन एखाद्या प्रेमळ पित्याप्रमाणे त्यांचा शोक अनावर झाला असेल. अर्थात ही आपली बालबुद्धी भक्ताची कल्पना! बाबांची करणी बाबांनाच माहित.

**१०) असो हे देहावसान व्हावया आधीं। बत्तीस वर्षांपूर्वीच समाधी।**
**होणार, पण म्हाळसापतींची बुद्धी। निवारी त्रिशुद्धि हा कुयोग ॥ ६२ ॥**
**टळता न जरी हा दुष्प्रयोग। कैंचा अवध्यांतें साईसुयोग।**
**त्रेचाळीस वर्षांमागेंचि वियोग। होता कीं कुयोग ऐसा तो ॥ ६३ ॥**
**त्रेचाळीस वर्षांआधींच कबर। होऊनि जाती कैंची मग खबर।**
**कैंचे मग तें दर्शन मनोहर। होतें सुखकर साईंचें ॥ ९० ॥**

**— अध्याय ४४**

शके १८०८ (सन १८८६) साली मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी बाबांनी तीन दिवस ब्रह्मांडी प्राण चढवून दिला होता व परत शुद्धीवर आले होते. वरील ३ ओव्यांमध्ये एकदा बत्तीस वर्षांपूर्वी व नंतर दोनदा त्रेचाळीस वर्षांमागे असे वेगवेगळे कथन आल्यामुळे वाचकांना संभ्रम पडतो. तर बत्तीसवर्षांपूर्वी म्हणजे बाबांच्या 'देहावसान व्हावया' (सन १९१८) आधी व त्रेचाळीस वर्षांपूर्वी म्हणजे हेमाडपंत हा अध्याय लिहित असताना पासूनच्या (सन १९२९) आधी असा आहे. त्यांचे म्हणणे की बाबांच्या भक्तांना आज जो त्यांचा 'वियोग' झालेला आहे किंवा बाबांची जी 'कबर' बांधली गेली आहे ती घटना जी ते हा अध्याय लिहित असताना पासून ११ वर्षांपूर्वी (सन १९१८) घडली, ती ४३ वर्षांपूर्वी (सन १८८६) घडली असती आणि पुढे जे असंख्य भक्तांना बाबांचे मनोहर व सुखकर दर्शन लाभले ते लाभले नसते असो.

**११) करम कर मेरे हाल पर तूं करीम। (परतू)**
**तेरा नाम रहिमान है और रहीम।**
(हे अल्ला! माझ्या परिस्थितीवर तू कृपा कर. तुझे नाव दयाळू व दया आहे.)

तूंही दोनो आलमका सुलतान है।
जहांमें नुमाया तेरी शान है।
(तूच दोन्ही जगाचा सम्राट आहेस. या जगामध्ये तुझा मोठेपणा उघड दिसणारा आहे.)

फना होनेवाला है सब कारोबार।
रहे नूर तेरा सदा आशकार। (रहे)
(हा सर्व कारभार नष्ट होणार आहे. (मात्र) तुझी सर्वांना दिसणारी शोभा सदा राहणार आहे.)

तू आशिकका सदा मददगार है। (आसिकका) (मदतगार)
(भक्ताचा तू सदा मदतगार आहेस.)

अध्याय ३४ मध्ये डॉ. पिल्ल्यांच्या सुजलेल्या पायावर अब्दुल्लाचा पाय पडला व त्यांनी किंकाळी फोडली. त्यांच्या पायातील नारू फुटून लागला आणि ते एकीकडे आक्रोश करीत गाऊ पण लागले. त्यांनी म्हटलेले उर्दू गाणे शुद्ध मराठी अनुवादासह वर दिले आहे. उर्दू भाषेच्या अज्ञानामुळे श्रीसाईसच्चरिताच्या सर्वच आवृत्तींच्या या गाण्याच्या छपाईत चूका राहिलेल्या आहेत ज्या वर कंसात दिल्या आहेत. वाचकांनी त्या आपल्या प्रतीत सुधारून घ्याव्यात.

## बाबांच्या कृपेने गाय बरी झाली

— श्री. हरीभाऊ त्र्यंबकराव शेळके
शिर्डी.

मी, दोन महिन्यापूर्वी श्री समर्थ साई चरणी एक गिर गाय, तांबडी शिंगे वर्ण काळा अशी अर्पण केली आहे. ती गाय व्याली व तिला कालवड झाली. ती व्याली तेव्हा रात्री ७.३० वाजले होते. गाय व्याली. जार टाकला. पण ती कालवडीला पिऊ देईना तेव्हा आमचा नोकर हे घरी सांगू लागला की गाईच्या एका स्तनातून रक्त येत आहे. व ३ स्तनातून दूध येते. गाय त्यामुळे कालवडीला पिऊ देत नाही. असे सांगितल्यावर त्या नोकरास आमच्या घरातील श्री साईबाबांची उदी देऊन गाईस लावावयास सांगितली. त्या बरोबर गाय कालवडीस दुध देऊ देऊ लागली व स्तनातून येणारे रक्तही बंद झाले. ही कृपा केवळ साईबाबांच्या विभूतीने झाली आहे. गाय ११.३.८६ रोजी ७.३० ला व्याली व गाईची व कालवडीची तब्येत आता उत्तम आहे. तिचे दुध त्यादिवशी पासून बाबांचे नैवेद्य कोठीत जात आहे व दररोज या गाईचे दुध नैवेद्य कोठीत जाईल व श्री साईबाबांना रोज या दुधातून नैवद्य दिला जाईल अशी साईबाबा चरणी प्रार्थना करतो.

# श्री साईनाथांचा शरणार्थी (१७)

लेखक: ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादक: वि.बा. खेर

एका दुपारनंतर तीन-चार वाजता मी राधाकृष्णआईकडे गेलो तेव्हा तिने तोंडासमोर एक हिरवी मिरची धरलेली होती. मी बसलो तसे ती म्हणाली, "ही घे". ती मिरची घेऊन मी तोंडात टाकली व चावून खाल्ली पण बिलकुल तिखट लागली नाही. नंतर कित्येक वर्षांनी एका योगसिद्ध गुरूने आपल्या शिष्याला दिलेल्या मंत्राविषयीची टिपणी माझ्या नजरेस आली तिच्यात मिरची मंत्रून खायला देण्याचा प्रयोग होता. राधाकृष्णआईने त्या मिरची द्वारे माझ्यावर काही प्रयोग केला पण त्या प्रयोगाचा परिणाम मला अजून समजला नाही. परंतु पुष्कळ अगम्य वस्तु नजरेस पडू लागल्याचे समजे व कित्येक वेळा वस्तु असूनसुद्धा त्यांच्या जागी दिसत नसत. एकदा खुंटीवर रूमाल होता तो आणायला मला राधाकृष्णआईने सांगितले. मी खुंटीजवळ गेलो असता रूमाल दिसला नाही, परंतु राधाकृष्णआईने येऊन 'हा बघ रूमाल' असे म्हणून मला तो दाखविला. गुरूसेवासुद्धा गुरूकृपेशिवाय घडत नाही याचा हा प्रत्यक्ष अनुभव.

उघडपणे राधाकृष्णआई बोलत नसे परंतु मी सर्वसंगपरित्याग करून शिरडीत रहावे अशी तिची अंतरीची इच्छा होती. अकरा महिने शिरडीत राहून (१९१३ मध्ये) मी मुंबईला परतलो त्यासंबंधी ती मला म्हणाली, "तुझी आठवण वारंवार येऊन खूपच रडू येई" व एकदा शिरडीचा मुक्काम संपून मुंबईला जाण्याचा समय जवळ आला तेव्हा ती म्हणाली, "मग आम्ही तुझ्यासाठी एवढे अश्रू ढाळले ते व्यर्थच!" असे ती म्हणे खरे पण माझी रहाण्याची व्यवस्था ती करत नसे किंवा होत नसे. म्हणून मी संभ्रमात पडे.

एका रात्री मी शिवेवरच्या ओढ्यावर ध्यानासाठी बसलो होतो. तिथे एक झोपडी होती. झोपडीत रात्री भजन चालते असे मी ऐकले होते पण मला कोणी दिसले नाही. ध्यानावस्थेत मी एक बैलगाडी येताना पाहिली. तिच्यात बाबा रूद्रवेशात उभे होते. त्यांच्या मिशा विशेष लांब होत्या. गाडीतून त्यांनी माझ्यावर एक मोठा पत्थर व अनेक लहान खडे फेकले ते माझ्या जवळ येऊन पडले परंतु मला काहीच इजा झाली नाही. नंतर तेथून उठून मी मुक्कामावर परतलो.

या सुमारास एका रात्री सर्वजण झोपी गेल्यावर मी माझा लोटा घेऊन बाहेर पडलो. बाहेर पडताच संन्यास घेण्याचा निश्चय केला. शिरडी गावाच्या बाहेर येऊन राहत्याकडे चालू लागलो. रात्रीचे १२/१२.३० वाजले असावे. आश्विन महिन्याचा वद्य पक्ष असल्यामुळे सर्वत्र अंधकार पसरला होता. थोडे अंतर चालल्यावर अरूणोदयावेळी किंवा संध्याकाळी अस्तास जाताना रक्तबिंबासारखा दिसणारा सूर्याचा तांबडा गोल आकाशात पाहिला. मला वाटले की सर्वस्व त्यागाच्या माझ्या निश्चयामुळे सूर्यनारायणाने मला दर्शन दिले. खऱ्या संन्यास्याचा त्याग पाहून सूर्यसुद्धा हा वैराग्यवान पुरूष उडी मारून माझ्या पलिकडे जाईल या भीतीने कंपायमान होतो असे काही शास्त्रवाचन त्यावेळी मला

आठवले. मध्यरात्री सूर्य-दर्शन होते असे सांगणारे शास्त्र सत्य आहे याची खात्री पडली. ह्या विचार आल्यावर थोड्याच वेळात सडकेच्या एका उंचवट्याच्या शेवटी पाणी होते ते सूर्यप्रकाशामुळे दृष्टीस पडले व मी सावध झालो. नाही तर अंधारात माझे पाऊल चुकून पाय मुरगळला पण असता. हे पाहून साईबाबांनी मला अशा रीतीने संभाळले असे वाटले. चालता चालता थोड्या वेळाने दोन-चार जण शेकोटी पेटवून आपापसात बोलत बसले होते तेथे आलो. त्यांनी मला बोलावले म्हणून मी थांबलो व थोडावेळ बसलो. परंतु त्यांचे व माझे काही संभाषण झाले नाही. नंतर मी माझा लोटा तेथेच ठेऊन पुढे निघालो व राहत्याची नदी आली ती ओलांडून तिच्या रेतीत एका झाडाचे खोड होते त्यावर बसलो. एका तासानंतर नदीतील एका झाडाच्या बुंध्यातून पिशाच्च निघाल्याचा आवाज ऐकू आला. नंतर मला लघुशंकेची घाई लागल्यामुळे जवळपास जेथे बसलो तेथे कोणी दिवा धरून माझ्या गुह्यभागावर प्रकाश टाकत असल्याची जाणीव झाली. नीट बघता समजले की ते एक पिशाच्च होते. त्याच्या माथ्यावर दिवा किंवा दिव्यासारखा प्रकाश होता व ते डोके खाली व पाय वरती करून चालत होते. लघुशंका आटोपून लगेच परत झाडाच्या खोडावर जाऊन बसलो. तेथून मी पाहिले की ते पिशाच्च खाली डोके, वर पाय करून नदीत उतरले व दोन-तीन वेळा पाण्यात बुड्या मारून बाहेर पडले. काही वेळाने ते अदृश्य झाले.

त्या पिशाच्चाला पाहून हा कोणी ब्रह्मराक्षस असावा असे वाटले. डोक्यावरील प्रकाशावरून ब्रह्मराक्षसाची योनी प्राप्त झालेला हा कोणी विद्वान असावा. भक्तिहीन विद्वानाची तसेच स्वतः प्राप्त करून घेतलेले ज्ञान कुठल्याही अधिकारी व्यक्तीस न दिल्याने अशी गत होते ह्या गोष्टीची यावेळी मला आठवण झाली. पहाट होताच मी शिरडीस परतलो तेव्हा खासगीवाले भेटले, त्यांनी विचारले, "रात्री तुम्ही कुठे गेला होता?" बाबांनी तुमच्या शोधासाठी एका माणसास पाठविले. मी सुद्धा घोड्यावर बसून तुमच्या शोधात निघालो पण तुमचा पत्ताच लागला नाही. बाबांना व आम्हाला असले कष्ट होऊ नयेत म्हणून इतःपर काकासाहेबांचे वाड्यात निजण्याचे वचन द्या." काकासाहेब पण म्हणाले, ' येथेच निजा तुमच्या जवळ माझा बाबू झोपेल. तुमचे पण बाबूवर प्रेम आहे." मी म्हणालो, "ठीक , या उपर येथेच निजेन." त्या दिवसापासून काकासाहेबांच्या वाड्यात माडीवर झोपण्याचे मी ठरवले.

त्यानंतर दोन-तीन दिवसांनी संध्याकाळ नंतर गावाबाहेर कोपरगावला जाणाऱ्या सडकेवर जेथे आवडेल त्या ठिकाणी जाऊन मी बसू लागलो. एकदा असा बसलो असता आवाज आला, "आम्ही मी व काकासाहेब तुला घेऊन जायला येऊ का?" मी म्हणालो, "काकासाहेबांना घेतल्याशिवाय या." वरील आवाजामुळे झालेले संभाषण खरे मानले नाही परंतु दोन-तीन तासांनी रात्री राधाकृष्णआई व काकासाहेब तसेच सगुण हातात कंदील घेऊन मला शोधत शोधत सडकेवर आले. त्यांनी मला एक सुट्या गाडीचा परंतु गाडीलाच दोरीने बांधलेला बैल चरत होता तेथे मला बसलेला पाहिले. राधाकृष्णआईने विचारले, "वामन्या, असं काय करतोस? इथं कुठ येऊन बसलास?"

मी म्हणालो, "मी गावात येऊ लागलो तेव्हा येथे सर्वत्र प्रकाश दिसला व त्यात एकनाथ महाराजांचे मंदिर पण पाहिले." दोन-तीन दिवसांनी गोष्ट निघता ती म्हणाली, "अरे तू तर माझ्या गुरू एकनाथांना पण आणलेस, कसा विचित्र माणूस आहेस तू?"

एका सकाळी आठ-नऊच्या सुमारास मी काकासाहेब दीक्षितांच्या वाड्याच्या पाठीमागील भागातून जेथे मोट चालते व लोक पाणी भरतात, तेथून जात होतो. त्या वेळी कानावर सतारीचे सुंदर स्वर पडताच मी काकासाहेबांच्या आतल्या भिंतीला जाळी होती तिच्यातून डोकावले तो एक सुंदर स्त्री सतार वाजवताना दिसली. त्या स्त्रीने मला आत येण्याची निशाणी केली म्हणून मी आत जाऊन बसलो. माझ्या हातात सतार देऊन ती स्त्री म्हणाली, "घ्या." मी सतार परत करून म्हणालो, "मला सतार वाजविण्याचे ज्ञान नाही." असे म्हणून मी बाहेर पडलो तेव्हा नानावल्ली क्रोधायमान स्थितीत तेथे आला व जवळ पडलेल्या संगमरवरी फरशीतून एक फरशी घेऊन, 'तुला सतार वाजवता येत नाही तर ती हातात घेतलीसच कशाला?' असे ओरडून माझ्या डोक्यावर दोन वेळा जोरात हाणली. मी असे समजलो की माझी टाळू फुटून रक्तस्त्राव होत असेल. पण डोक्याला स्पर्श करता हाताला रक्त किंवा टेंगूळ सुद्धा लागले नाही. त्याने मी विस्मित झालो. नंतर त्याच दिवशी किंवा दुसऱ्या कुठल्या तरी दिवशी मी काकासाहेबांच्या पुढल्या दरवाज्यातून निघून ओसरीवर आलो तेथे नानावल्ली आरडाओरड करत आला आणि माझ्या छातीवर बोटाने बाळबोध लिपीत त्याने चौदा एक अक्षरे काढली. बोटाला कुंकू-कोळसा लावला नसल्याने काय अक्षरे काढली ते समजले नाही. त्याची कृति माझ्यासाठी कदाचित कल्याणप्रद असावी, असा भास झाला.

'सतार वाजवता येत नाही तर हातात कशाला घेतलीस,' असे बोलून फरशीचे दोन घाव रागाने केले त्यांनी जणू काय बाबा त्या द्वारे अशी सूचना करत असावेत की तू विचारल्यावरून सांगितलेला निर्गुण उपासनेचा मंत्र साधत नसेल तर तू तो घेतलास कशाला?

## गोकुळाष्टमी कार्यक्रम

सालाबादप्रमाणे यंदाही गोकुळाष्टमी कार्यक्रम दि. २७-८-८६ व २८-८-८६ रोजी साजरा करण्यात आला. बुधवार दि. २७-८-८६ रोजी (श्रावण वद्य ॥ ८ ॥) रात्रौ ९ ते १०-०० कलाकारांची हजेरी झाली. रात्रौ १० ते १२-०० श्री. मधुकर गणेश सुर्यवंशी, (संस्थान गवई) यांचे कृष्णजन्म कीर्तन झाले. १२ वाजता कृष्णजन्म झाल्यानंतर शेजारती झाली व प्रसाद वाटण्यात आला.

गुरुवार दि. २८-८-८६ रोजी (श्रावण वद्य ॥ ९ ॥) रोजी सकाळी १०-३० ते १२-०० गोपाळकाला व दहीहंडी कार्यक्रम झाला. रात्रौ ९-१५ ते ११-०० श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक निघाली. मिरवणूक परत आल्यानंतर शेजारती झाली.

एक विचारप्रवर्तक लेख

# श्रीसाई उदीचे महत्त्व

**श्री. संजीव गजानन चंदने एम्.कॉम.**
माणिक कॉलनी, चाळ ३/७,
अहिल्यादेवी चौक, कल्याण-४२१ ३०१.

सर्व प्राण्यांमध्ये हत्ती भलामोठा असला तरी वनराज सिंहाला महत्त्व, पंचपक्वानाचे जेवण असले तरी मिठाला महत्त्व, तर आपल्या शरीरात आत्म्याला महत्त्व. अगदी त्याचप्रमाणे साईबाबांनी ह्या भूतलावर जे काही कार्य केले त्यात उदीला महत्त्व आहे. उदबत्ती धूप जाळल्यानंतर अथवा प्रज्वलीत अग्नी शांत झाल्यानंतर जी राख उरते त्याला उदी (अंगारा अथवा विभूती) म्हणतात.

शिर्डीला येणाऱ्या भक्तांना साईबाबा प्रसाद म्हणून विभूती देत असत. काही साईभक्त ही उदी कपाळाला लावतात, तर काही व्याधीग्रस्त भक्त उदीचा औषध म्हणून उपयोग करतात. परंतु काही भक्त अशी ही प्रासादीक विभूती (उदी) आपल्या शरीरावर होणाऱ्या जखमांवर लावतात, मग ती जखम शरीराच्या कोणत्याही भागावर झालेली असो. त्याही पुढे जाऊन बोलायचे झाल्यास काही भक्त ही उदी प्रसाद म्हणून भक्षण करतात तर काही पाण्याबरोबर औषध म्हणून घेतात. काही भक्त ही प्रासादिक उदी आपापल्या घरात फुंकरतात. अर्थातच उदीचा वापर कसा करावा हा वैयक्तिक प्रश्न आहे.

तसे पहाल तर मी सुद्धा साईबाबांचा एक उपासक आहे. वर्षातून एकदा शिर्डी येथे जातो. आमचे कुटुंब तसे भाग्यवान कारण प्रत्यक्ष साईनाथांना बघितलेल्या चार व्यक्ती आमच्या कुटुंबात आहेत. त्यापैकी सध्या एक काका आणि आत्या आजही सुखासमाधानाने आपले आयुष्य जगत आहेत. असो! आपल्या समोर आलेल्या भक्तांना प्रसाद म्हणून साईबाबा उदी (अंगारा/विभूती) देत असत. काही व्याधीग्रस्त भक्तांच्या अंगाला साईबाबा स्वतः उदी लावत. संतश्रेष्ठ म्हणून साईबाबांचा जगात लौकिक आहे. साईबाबांनी भक्तांच्या अंगाला विभूती लावली म्हणून आपणसुद्धा आपल्या स्वतःच्या अंगाला विभूती लावायची का? कारण संत हे समोर आलेल्या माणसाचे नैतिक धैर्य वाढविण्याचे काम करतात. उदा. एखाद्या व्याधीग्रस्त भक्ताने जखमेवर साईबाबांची विभूती लावली तर त्याला फार मोठा आधार वाटतो. कारण त्या उदीच्या निमित्ताने त्याचे मानसिक धैर्य वाढते. शास्त्रीय दृष्टीकोनातून बोलायचे झाल्यास उदीच्या निमित्ताने आपल्या शरीरातील रक्तप्रवाहाची गती वाढते. त्यामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढते. त्याची परिणती म्हणून आजारी माणसाची प्रकृती सुधारते. पण (माझ्या मते) ह्या साठी उदी फक्त कपाळाला लावली तरी चालेल. शरीराच्या सर्वांगाला उदी लावायलाच पाहिजे असे नाही. कारण ज्याची ईश्वरावर नितांत श्रद्धा आहे, त्याचे संरक्षण केवळ ईश्वराच्या स्मरणानेसुद्धा होते. हे तर साक्षात् साईबाबांनीच सांगितले आहे. 'तुम्ही फक्त माझे स्मरण करा, मी तुमच्या सोबतच आहे' किंवा 'तुम्ही माझ्याकडे पहा, मी तुमच्याकडे अवश्य पाहीन' हा साईबाबांचा उपदेश अतिशय साधा आहे. अशा संतश्रेष्ठाचे विचार आपण आचरणात आणायचे की त्यांची उदी सर्वांगाला

अथवा जखमेवर लावण्यात धन्यता मानायची? कारण ही उदी हे रुपक आहे. आपणा सर्वांच्या आयुष्यात येणारी सुखदुःखे ही राखे समान आहेत. ह्या सर्वांची शेवटी राखच होणार आहे. अगदी थोडक्यात सांगायचे म्हणजे, राखेचे मूल्य हे शून्यवत आहे, पण त्या शून्यवत गोष्टी आपणाला मौल्यवान करता आल्या पाहिजेत. सामान्यातून असामान्य असे काहीतरी निर्माण करता आले पाहिजे; असाच त्या 'उदी'चा रुपकात्मक अर्थ आहे. आजपर्यंत होऊन गेलेल्या प्रत्येक संताने काहीतरी ग्रंथनिर्मिती केली आहे. म्हणजे 'ग्रंथ' हे त्यांचे जनसंपर्काचे माध्यम होते. पण साईनाथांनी कोणतीही ग्रंथ निर्मिती केली नाही, त्यांचे जनसंपर्काचे माध्यम 'उदी' हे होते. म्हणूनच ही उदी फक्त कपाळाला लावावी असे आग्रही तत्त्वज्ञान आहे. कारण कपाळाला म्हणजे दोन डोळ्यांच्या-भुवयांच्यामध्ये प्रणवाचे स्थान आहे, (अगदी सोप्या भाषेत सांगायचे म्हणजे ओंकाराचे स्थान) ते 'उदी' अथवा 'कुंकूम अक्षता' लावल्याने प्रज्वलीत होते. विशेषतः तिर्थस्थानांचा अंगारा (उदी). तेथूनच आध्यात्मिक प्रगतीला सुरुवात होते. म्हणूनच साईबाबांनी आपल्या समोर येणाऱ्या भक्तांना प्रसाद म्हणून उदी देऊन सामान्यजनांचे नैतिक धैर्य वृद्धींगत करणे, सामान्यजनांना सत्कर्मास प्रवृत्त करणे, उपासनेला प्रवृत्त करणे... इत्यादी अमोल कार्य केले. संतांकडून अशा कार्याला सुरुवात झाली की, सामान्यजनांची सेवाभावी वृत्ती वाढते. अंगी सात्विकता येते. सुसज्जनांचा सहवास लाभतो. असो!

अशी ही प्रासादीक विभूती जर का एखाद्या भक्ताने भावनावश होऊन पायाला झालेल्या जखमेला लावली तर अप्रत्यक्षपणे साईबाबांची उदी पायदळी तुडविल्यासारखेच आहे. श्रीसाईबाबा हे जगप्रसिद्ध संत आहेत. सर्वांनीच जर साईबाबांची उदी अंगाला लावण्याचे अनुभव दिले, तर साईनाथांच्या तत्त्वप्रणालीचा प्रचार बाजूलाच राहील, असे मला वाटते. ह्याच संदर्भात साईबाबा असताना घडलेला प्रसंग बोलका असाच आहे. पायमोजे बनविणाऱ्या एका कारखानदाराला पायमोज्यांना 'साईनाथ पायमोजे' असे नाव द्यायचे होते. त्याप्रमाणे त्याने साईबाबांना विचारले. पण साईबाबा अकाही बोलले नाहीत. ते फक्त स्वतःच्या पायांकडे बघत बसले. दुसऱ्या दिवशीसुद्धा असाच प्रसंग घडला. पण ती साईबाबांची इच्छा नव्हती हे साईनाथांच्या नेहमीच्या सहवासात राहणाऱ्यांनी ओळखले. कारण त्यामुळे बाबांचे नाव अप्रत्यक्षपणे पायदळी तुडविले जाणार होते. अगदी त्याचप्रमाणे उदीच्या संदर्भात बोलायचे झाल्यास कमरेच्या खालच्या भागास कोठेही उदी लावू नये असे मला वाटते. किंबहुना आपल्या शरीराचे दोन भाग पडतात. एक कमरेवरचा म्हणजे डोक्यापासून कमरेपर्यंत आणि दुसरा कमरेपासून पायापर्यंतचा. तसेच उभ्या शरीराचे दोन भाग मानले जातात, एक डावा आणि एक उजवा. त्यापैकी उजवी बाजू मूलतः पवित्र आणि जोरकस अशीच असते. म्हणूनच साईबाबांची उदी ही भक्तीभावनेने आपण फक्त कपाळालाच लावावी. (तसा वेदांत उल्लेख आहे.) म्हणजे संतांचे पावित्र्य, उदीचे सामर्थ्य अबाधित राहते. शेवटी आपण सर्वांना साईबाबांनी सांगितलेल्या तत्त्वप्रणालीचा जगभर प्रसार करायचा आहे. त्यासाठी साईबाबांची उदी हे फक्त माध्यम आहे, सर्वस्व नव्हे. हे आपण सर्वांनी मनोमानसी बाळगले पाहिजे.

# ह.भ.प. श्रीदासगणूमहाराज



स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधी जन्मती?
तसेच गणुदास हे स्तविती साईनाथांप्रती

श्रीसंत दासगणूमहाराज हे श्रीसाईबाबांचे समकालीन. ते साईबाबांचे एक थोर भक्त होऊन गेले. आधुनिक महिपती म्हणून त्यांची किर्ती महाराष्ट्रभर दवरळत आहे. त्यांचे खरेखुरे नाव गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे. त्यांचे पूर्वज रत्नागिरी जिल्ह्यातील कोनवडे गावचे राहाणारे. त्यांचे घराणे सुखवस्तू. गोत्र शांडिल्य, अश्वलायन सूत्र, ऋग्वेदी चित्पावन ब्राह्मण. आईचे नाव सावित्रीबाई होते.

दासगणूंचा जन्म शके १७८९ मध्ये पौष शुद्ध एकादशीच्या पुण्यदिवशी इ. सन १८६७ साली अकोळनेर येथे झाला. अकोळनेरचे आप्पाजी रामचंद्र जहागीरदार हे त्यांचे मातामह. मातृकुल ईश्वरनिष्ठ असल्याने या संस्काराचा वारसा श्रीदासगणूंना पूर्णपणे प्राप्त झाला खरा, पण वयाच्या तिशीपर्यंत तो सुप्त होता.

श्रीदासगणूंचा जन्म सुर्योदयाचे सुमारास झाला. म्हणून त्यांचे पाळण्यातील नाव नारायण असे ठेवले गेले. त्यांची आई या नारायणाला घेऊन जेव्हा आपल्या पतिगृही परत आली, त्यावेळी आजोबा श्रीएकनाथपंतांनी आपल्या गुटगुटीत नातवास मोठ्या प्रेमाने मांडीवर घेतले व नातवास पाहून ते म्हणाले, "नारायण नाव काय ठेवलेस? या गुलामाचे पोट कसे गणपतीसारखे आहे. याचे कानसुद्धा पहा कसे मोठे आहेत. तेव्हा याला आपण गणपतीच म्हणू या."

आजोबांची ही सूचना सर्वांनाच एकदम मान्य झाली व नारायण हे नाव मागे पडून गणपती, गणेश हेच नाव प्रचारात आले.

शके १७९८ मध्ये त्यांची वयाच्या नवव्या वर्षी मुंज झाली. लहान असताना दासगणूंना विद्याभ्यासात गोडी वाटेना. त्यांच्या वडिलांनापण विविध व्यवसायामुळे मुलाकडे लक्ष देण्यास फारशी सवड झाली नाही. त्यांचे चुलते जनार्दनपंत, मामलेदार असल्याने ते बहुतेक फिरतीवर असत. म्हणून आपल्या पुतण्याला श्री. रघुनाथ बळवंत लिमये यांच्याकडे त्यांनी सोपविले. ते गृहस्थ फार कडक, छडीशिवाय बोलतच नसत, त्यामुळे उनाडक्या करणाऱ्या छोट्या दासगणूवर त्यांच्या कडकपणाचा उलटा परिणाम झाला.

पुढे जनार्दनपंतांनी इ.स. १८८८ ते १८८९ या काळात संगमनेरला ठकार नावाच्या पदवी परीक्षेपर्यंत अभ्यास केलेल्या गृहस्थांच्या हवाली दासगणूंना केले. ते शिक्षक होते. पण दासगणूंचे तिथेही जमेना. अभ्यासात त्यांचे मन रमेना. रात्रीच्या वेळी ते तमाशास जात. गोंधळी, तमासगीर, यांच्याशी त्यांची सलगी वाढली. लावण्या पोवाडे, इ. ग्राम्य गीतांशी त्यांचा परिचय वाढला. अनंत फंदी, प्रभाकर, रामजोशी, सगनभाऊ, होनाजी बाळा यांच्यासारखी लावण्या, पोवाडे, छक्कड, फटके इ. ची रचना आपणही करावी, अशी आकांक्षा त्यांच्यात निर्माण झाली; व अभ्यासाच्या टिपणाऐवजी लावण्या-छक्कड यांचीच रचना ते करू लागले.

इंग्रजी चौथीत असतानाच दासगणूंनी शाळेला व शिक्षणाला रामराम ठोकला व ते आपल्या मावशीचे यजमान श्री. बळवंत सदाशीव गोडबोले यांच्याकडे बडोद्यास गेले. श्री. गोडबोले मुन्सफा होते. तिथे त्यांनी आपल्या भाच्याला एका खाजगी खात्यात लहानशी नोकरी मिळवून दिली. पण त्या कामाचा त्यांना कंटाळा आला. त्यांनी नोकरी सोडली

व ते पुन्हा नगरला आले. शके १८१३ मध्ये जामखेड तालुक्यातील बोरले-अष्टयाचे जहागीरदार नारायणराव रानडे यांच्या कन्येशी श्रीदासगणूंचा विवाह पुण्यास झाला. लग्नानंतर मुलगा वळणावर येईल अशी सर्वांची कल्पना होती, पण काही एक न करता चकाट्या पिटीत ते गावामधून हिंडत व दिवसभराचा वेळ घालवीत. यामुळे घरात त्यांचे सारखे खटके उडू लागले.

एकदा चुलती त्यांना टोचून बोलली व त्यासरशी दासगणू जे घराबाहेर पडले ते कायमचेच.

आपले एक स्नेही श्री. विश्वनाथपंत निरूळ यांचे घरी ते काही दिवस राहिले. पण असेच एकदा नगरच्या रस्त्यावरून हिंडत असताना पोलिस सुपरिंटेंडेंट एम. केनेडी हे युरोपियन गृहस्थ घोड्यावरून येत असताना त्यांची व दासगणूंची गाठ पडली व त्यांनी त्यांना श्रीगोंदे येथे दरमहा ९ रुपये पगारावर शिपाई म्हणून नोकरीस ठेवले. श्रीगोंदे, जामखेड, खडी, नगर, नेवासे या गावी त्यांनी एकूण ११ वर्षे नोकरी केली.

श्रीदासगणू प्रथम कट्टर शिवभक्त होते. सोमवार, प्रदोष, शिवरात्र ही व्रते ते मोठ्या निष्ठेने व कडकडीत पाळीत. महाशिवरात्रीला निर्जळा व्रताने शिवलिंगावर रूद्राचा अभिषेक करीत. पंढरपूरचे ते वारकरी होते. गोदावरी बद्दल त्यांना अपरंपार प्रेम होते. महान भगवद्भक्त श्रीसदगुरू वामनशास्त्री इस्लामपूरकर हे दासगणूंचे गुरु होत. आपल्या या सद्गुरुंचा उपदेश झाल्यावरच, दासगणू हे दासगणूमहाराज या नात्याने प्रसिद्धीला आले. सदगुरुंचा दास असा गणू किंवा गणू हा सद्गुरुंचा दास या भावनेने महाराज आपल्या काव्यामध्ये स्वतःचा उल्लेख दासगणू किंवा गणूदास अशा प्रकारे करू लागले. आपल्या नोकरीत असताना केलेल्या काव्यातून —

गणूदास रची हे कवनकथा सुंदर।
वामनशास्त्रींचा हस्त मस्तकावर।।

अशा अर्थाचे अनेक उल्लेख आहेत.

श्रीसदगुरुंच्या आदेशानुसार दासगणू शिरडीला गेले. सदाचारसंपन्न वामनशास्त्रींनी त्यांना आपण काशीस समाधिस्थ होण्यापूर्वी सांगितले होते.

"शिरडीचे श्रीसाईबाबा सुयोग्य विभूती आहेत. त्यांना तू माझेच स्वरूप मान. आम्ही दोघे एकरूप आहोत. तेच तुला आता येथून वेळोवेळी मार्ग दाखवतील."

या आदेशानुसार श्रीदासगणूंनी श्रीसाईबाबांना उद्देशून पुढीलप्रमाणे प्रार्थना केली:

हे श्रीसाई समर्था। तुझ्यापदी ठेवूनी माथा।
करितों विनंती हीच आतां। ती उदारपणें मान्य करा।।
मी सकल संतांचा चरणरज। माझी राखा आपण लाज।
तुम्ही भवाब्धीचे जहाज। हे म्यां पक्के जाणलें।।
हीच विनंती, साईनाथा। या वामनशास्त्र्यांच्या छात्रा।
नका लोटूं कदा परता। बाबा, दासगणूंसी।।

माझे गुरु मरून गेले। पोरकेपण मजला आले।
म्हणून पाहिजे सांभाळिले। या पोरक्या गणूसी।।
तुम्ही एकरूप अवघे संत। तुम्हां माजीं नसे द्वैत।
तुम्ही वामनशास्त्री साक्षात। आहात, बापा, मजलागी।।

भक्तिसारामृत ५३-२९२

श्रीदासगणूंची निष्ठा श्रीसाईबाबांच्या चरणी स्थिरावली. आपले स्नेही श्री. नानासाहेब चांदोरकर यांच्याबरोबर १८९६ साली प्रथम दासगणू शिरडीला श्रीसाईंच्या दर्शनाकिरता गेले. त्यांच्या बाबांच्या वरील निष्ठेतूनच त्यांना पुढील अभंग स्फुरला.

शिरडी माझे पंढरपूर। साईबाबा रमावर।।
शुद्धभक्ती चंद्रभागा। भाव पुंडलीक जागा।।
याहो याहो अवघे जन। करा बाबांसी वंदन।।
गणू म्हणे, बाबा साई। धाव पाव, माझे आई।।

श्रीसाईबाबांचे दासगणूंच्यावर भारी प्रेम होते. अनेकांच्यावर बाबा कधी कधी खूप रागवत, शिव्या देत, मारहाणदेखील करीत, पण दासगणूंवर ते रागावल्याचे कुणी कधीच पाहिले नाही.

दरवडेखोरांच्या कान्ह्या भिल्ल नावाच्या नायकाला पकडण्यासाठी श्रीदासगणूंची नेमणूक झालेली होती. लोणी या गावी ते रामदासीच्या गुप्तवेषाने एका श्रीराम मंदिरात राहिले. मंदिर झाडून साफसूफ करून रोज एकाग्र चित्ताने मूर्तीची पूजा ते करीत. त्यांच्या तेथल्या वागण्यामुळे कान्ह्या भिल्ल प्रभावीत झाला. त्याने आपल्या गळ्यातील सोळा तोळे वजनाचा सोन्याचा गोफ त्यांना सादर समर्पण केला; पण दासगणूंनी त्याचा स्वीकार केला नाही. उलट, त्याच्या पैशातून देवळाची दुरूस्ती करण्यास पाटलास सांगितले. या निर्लोभ वृत्तीचा परिणाम भिल्ल नाईकावर झाला. दववशात या कामगिरीतून प्रयत्नाने त्याची मुक्तता झाली.

जामखेड येथे ते बदलून गेले. येथे त्याच्या सुप्त प्रतिभेचे नवे उन्मेष दीप्तिमान झाले. दामाजीपंतांच्या स्वयंकृत आख्यानावर त्यांनी येथे कीर्तन केले. श्रोते मुग्ध झाले.

पुढे नेवासे येथे बदली झाल्यावर तेथील नटनर्तक मोहिनी राजापुढे डफ फोडून तमाशाचा नाद त्यांनी सोडून दिला व आपली वाणी व लेखणी परमेश्वराच्या सगुणस्वरूपाच्या वर्णनात खर्च केली.

श्रीसद्‌गुरू साईनाथांच्या दर्शनात ते पावन झाले. पुढे त्यांच्याच आज्ञेवरून त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला व संतचरित्रे लिहिण्याचे कार्य त्यांनी स्वीकारले. श्रीसाईबाबांनी यासाठी त्यांचे कार्यक्षेत्र नांदेड मराठवाडा हे आगाऊच नियोजित केले होते. त्याप्रमाणे तिकडच्या भागात जाऊन त्यांनी कीर्तन प्रचार केला. संतचरित्र साहित्य जमविले व प्रत्यक्ष लेखनास सुरुवात करून काही काळाने ते लेखन संपविले.

श्रीदासगणू हे प्रभावी निर्लोभी कीर्तनकार होऊन गेले. कीर्तनाची बिदागी ते घेत

नसत. इंदूर संस्थानच्या व देवास संस्थानच्या दरबारात त्यांची कीर्तने झाल्यावेळी आपल्या अंगच्या प्रसंगावधानाने उभय नरेशांच्या कौतुकाचा व आदराचा विषय ते झाले. श्रीसाईबाबांची त्यांच्यावर प्रीती होती. त्यांची पण बाबांवर निष्ठा होती. धार्मिक व्रतवैकल्ये ते साक्षेपाने करीत. त्यांच्या कर्मनिष्ठेला त्यांच्या परिणत प्रज्ञेचे अधिष्ठान होते. गायत्री पुरश्चरणे त्यांनी तीनदा केली. गोदावरीला प्रदक्षिणा पण त्यांनी एका सिंहस्थात केली. त्यांची काव्यसंपदा विपुल आहे. त्यांचे भाषाप्रभुत्व दांडगे होते. त्यांच्या लेखनातून भक्तीचा जिव्हाळा ओतप्रोत भरलेला आढळतो. त्यांनी लावण्या, पोवाडे, छक्कड, ओव्या, पदे, चरित्रे, नाटक, मनाचे श्लोक, शिष्यबोध इत्यादी अनेक विषयांवर अंदाजे दोन लक्ष संख्या परिमित लेखन केले आहे. वेदांत हा त्यांच्या आवडीचा विषय. दंभाचा त्यांना अमाप तिरस्कार असे. त्यांच्या लेखनात अमाप रसोत्पत्ती, अभ्यासुवृत्ती आहे. त्यांची भाषा साधी खेडवळालाही समजावी अशी आहे. महाराष्ट्रातील आजच्या विद्वानांना त्यांच्या लेखनशैलीचे कौतुक वाटते. त्यांची बहुश्रुतता दांडगी होती. त्यांचा राष्ट्राभिमान, संस्कृतीबद्दलचा अभिमान, धर्म यांबद्दलचे प्रेम अप्रतिम आहे. त्यांची वृत्ती मृदू, करूणामय, प्रभुला प्रार्थना करताना त्यांच्या नेत्रांवाटे गंगायमुनेच्या धारा प्रवाहित होत असत. ते साक्षात्कारी विभूती होते. त्यांचा मित्रपरिवार फार मोठा होता. त्यांच्या ऋणानुबंधीयांत शेठ, सावकार, व्यापारी, पांढरपेशे, मध्यमवर्गीय यांचाही भरणा असायचा. श्रीदासगणूंनी समाजाला ईश्वराभिमुख करून त्याचे त्यांनी उन्नयन केले. असा हा श्रीसाईबाबांचा थोर भक्त, सेवक, महापुरुष कार्तिक वद्य एकादशी, दिनांक २५ ऑक्टोबर १९६२ रोजी पंढरपूर येथे श्रीपांडुरंगचरणी विलीन झाला. त्यावेळी त्यांचे वय ९५ वर्षांचे होते. त्यांची समाधी चंद्रभागेच्या वाळवंटात बांधली गेलेली आहे.

श्रीदासगणूंचे समग्र काव्यसंग्रह एकंदर नऊ खंडात आता पुस्तकरूपाने प्रकाशित झालेले आहेत.

श्रीसाईबाबा हे परमात्म्याशी किंवा परमात्म्याच्या निरनिराळ्या रूपांशी अगदी मिसळून गेलेले होते. भक्तांनी जशी जशी इच्छा केली, तसे तसे बाबांनी त्यांना दर्शन दिले. कधी राम, तर कधी कृष्ण, कधी पांडुरंग तर कधी अक्कलकोटस्वामीमहाराज, कधी मौलवी, तर कधी कुणाचे सदगुरू. अशा निरनिराळ्या स्वरूपात बाबांनी भक्तांना दर्शन दिलेले आहे.

एकदा दासगणूंनी बाबांच्याजवळ असताना पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनास जाण्याची इच्छा व्यक्त केली. तशी परवानगी त्यांनी मागितली. परंतु बाबांच्या मनात दासगणूंना पाठवायचे नव्हते. म्हणून बाबा म्हणाले,

"अरे गणू, शिरडी हेच आपले पंढरपूर. आपल्याला शिरडी सोडून जाण्याचे कारण नाही."

दासगणूंचा बाबांच्यावर भारी विश्वास! ते विचार करू लागले, की शिरडी हेच जर आपले पंढरपूर, तर इथला पांडुरंग कोण? या विचारात ते मग्न झाले. तोच बाबा त्यांना साक्षात् पांडुरंग स्वरूपात दिसू लागले.

याच प्रसंगावर दासगणूंनी शिरडी माझे पंढरपूर। साईबाबा रमावर। असे सुंदर पद

रचले. रमा म्हणजे रखुमाई व तिचा वर म्हणजे पती अर्थात रमेचा पती म्हणजे पांडुरंग.

एकदा याच दासगणूंना प्रयागला गंगा-यमुना या संगमस्थानी जाण्याची तीव्र इच्छा झाली. तेव्हा बाबा म्हणाले,

"गणू, आपले प्रयागतीर्थ येथेच आहे."

— आणि खरोखरीच आश्चर्याची गोष्ट, बाबांच्या दोन्ही आंगठ्यातून गंगा-यमुना निथळू लागल्या, वाहू लागल्या, दासगणूंना हे पाहून नवल वाटले.

दासगणूंच्या प्रमाणेच गौळीबाबा नावाचे एक सतपुरूष बाबांच्या वेळी होते. ते वर्षाचे आठ महिने पंढरपुरी राहून श्रीहरी पांडरंगाची सेवा करीत व चार महिने तीर्थयात्रा करीत. ते बाबांच्यासमोर समाधी लावून बसत व सांगत, की त्या स्थितीत बाबा त्यांना पंढरपूरचे विठोबाच दिसत असत. आहे की नाही!

मुंबईचे एक डॉक्टर श्रीरामाचे मोठे भक्त होते. ते बाबांना मानीत नसत.

एकदा ते आपल्या मित्राच्या आग्रहाखातर त्यांच्या बरोबर शिरडीस गेले. परंतु 'मी जरी शिरडीस आलो, तरी मी बाबांना नमस्कार करणार नाही,' असे त्यांनी मित्राला निक्षून सांगितले होते. डॉक्टर व मित्र बाबांच्याकडे चालले होते. परंतु बाबा दुरून दिसल्याबरोबर डॉक्टर देहभान हरखून धावत सुटले व बाबांच्या पुढे जाऊन त्यांनी अक्षरशः लोटांगण घातले. बाबांनी त्यांना शुभआशीर्वाद दिला. ते परत निघाल्यावर मित्रांनी त्यांस विचारले.

"डॉक्टर, हे काय केलंत तुम्ही? तुमचा निश्चय तुम्ही विसरलात काय?"

डॉक्टर म्हणाले,

"अहो, कसला निश्चय नि कसचं काय? तिथे साईबाबा होतेच कुठे? मला त्यांच्या जागी अयोध्यापती प्रभू श्रीरामचंद्रजी दिसले व मी त्यांच्यापुढे लोटांगण घातले!"

आहे की नाही बाबांची अगम्य लिला.

ह.भ.प. संत श्रीदासगणूंनी बाबांच्या कीर्तीचा सुगंध आपल्या उभ्या हयातीत सातत्याने दरवळत ठेवला. त्यांनीच त्यांच्या कार्याचा प्रसार कीर्तनाद्वारे सर्वत्र केला.

धन्य ते बाबांचे सतशिष्य दासगणूमहाराज. आजही शिरडीला पुण्यउत्सव प्रसंगी दासगणूंचे नातू श्री. अनंतराव आठवलेमहाराज कीर्तने करीत असतात; व बाबांचे स्मरण करतात.

श्रीदासगणू एकदा शिरडीस असताना नीटनेटका पोशाख करून बाबांना भेटण्यास गेले. त्यांना वंदन केल्यावर 'नवरदेवासारखा सजून कुठे चाललास' असा बाबांनी प्रश्न केला. 'कीर्तन करावयास जातो' म्हणून दासगणूंनी उत्तर दिले. त्यावर बाबा म्हणाले, 'अंगरखा फेटा कशास, किमर्थ केलास इतुका प्रयास हा सर्व भार कशास अंगावर घ्यावा? तो सर्व खाली काढून ठेव."

तेव्हा त्यांच्या आज्ञेनुसार दासगणूंनी सर्व पोशाख बाबांच्या चरणावर ठेवला आणि तेव्हापासून 'तनु उघडी डोई न पगडी। कासेसीं साधीच पंचे जोडी' यात सांगितल्याप्रमाणे कीर्तन करण्याची त्यांची प्रथा पडली.

तै पासूनी उघडे सोज्ज्वल।
हाती चिपळी गळा माळ।
कीर्तन समयी सर्व काळ।
गणूदास हा वेळपर्यंत ।। २७ ।।
ही नारदीय मूळ गादी
येथूनचि हरिदासांची मांदी।
बाह्य रंगाची न ज्या उपाधी
अंतःशुद्धि ध्येय ज्या।।

श्रीसाईसच्चरित्र अध्याय १५

याप्रमाणे लोकांच्या विनंतीला मान देऊन दासगणू नारदीय पद्धतीने कीर्तन करू लागले. 'एका कवडीचाही परिग्रह किंवा दुराग्रह तेथे ना' (अ. १५-१९) असा त्यांचा कीर्तनाचा बाणा असल्यामुळे श्रोत्यांची अतोनात गर्दी व अनिवार उडी कीर्तनप्रसंगी नेहमी होत असे. शिरडीस रामनवमी उत्सव १९१२ साली सुरू झाल्यावर चवथ्या वर्षापासून म्हणजे १९१६ सालापासून पुष्कळ वर्षे रामनवमी उत्सवात या नारदीय पद्धतीने ते कीर्तन करीत होते.

# सरस्वती स्तवन

सप्तसुरांच्या नादा मधूनी
विद्यादान देई, देवी
शुभ्रवस्त्र परिधान करूनी
पावित्र्याचा धडा शिकवूनी
समीप बैसे मयूर पक्षी
विराज होऊनी शिळेवरी
संगीताची ध्वजा फडकवूनी
विद्येचे ज्ञान देऊनी
समीप वाहे कृष्णामाई
सप्त सुरांच्या नादामधूनी

**प्रा. धर्माधिकारी प्र. के.**
मु.पो. मसूर, ता. कराड,
जि. सातारा, पिन : ४१५१०६.

# भक्ती मार्ग

— सौ. निर्मला राजे
लीला भुवन, राजारामपुरी,
कोल्हापूर.

साईबाबांची भक्ती कशी करावी याबाबत मी आपणापुढे माझे विचार ठेवणार आहे.

संसारी जीवनात भक्तीमार्ग कसा साध्य करावयाचा तर संसारी जीवन फार कठीण आहे असे माझे मत आहे, तरी प्रयत्न करताच त्यावरही आपणाला मात करता येते. ह्यासाठी आपल्या मनामध्ये साईबाबांची भक्ती करण्याची दीर्घ इच्छा पाहिजे. सकाळी उठल्यावर दैनंदिन व्यवहार सुरू करण्यापूर्वी श्री साईबाबांना नमन करून त्यांच्या अस्तित्वाचे व अतर्क्य शक्तीचे चिंतन करावे, त्यांना नतमस्तक व्हावे. अशा मंगल प्रेमानेच रोजच्या व्यवहाराला सुरवात करावी. शरीरशुद्धी व स्नान करून मुखाने श्री साईबाबांचे नामस्मरण करून त्यांना प्रेमाने जेवढे आळवता येईल तेवढे नेमाने आळवावे. ह्या युगात भक्ती जो नित्यनेमाने करतो तो भाग्यवान व पुण्यवान होय. काही वेळाने श्री साईबाबा त्याच्यावर संतुष्ट होऊन त्याला कल्याणाचा मार्ग दाखवतील.

ह्या संसारात वेगवेगळी संकटे येतात. शरीराला व मनाला खूप यातना होतात. अशाही परिस्थितीत आपण आपले नामस्मरण अखंड चालूच ठेवावे. हे नामस्मरण करण्यासाठी शरीर व मन ह्या दोघांचे स्वास्थ्य असणे जरूर आहे. ह्यासाठी आपण काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, ह्यांवर विजय मिळवला पाहिजे. जसजसे आपण नामस्मरण वाढवू तसतसे ह्या सर्वांवर आपण विजय मिळवत जाऊ. नामस्मरणामुळे शरीर व मन ह्यांना स्थिरता प्राप्त होईल. मनाला शांती व सुख मिळावे असे वाटत असेल तर धैर्य धारण केले पाहिजे. सर्व दुर्बलता झुगारून टाकली पाहिजे. मनावर अपमानाचे व निंदेचे आघात होतील पण ते सहन केलेच पाहिजेत. सहनशीलता बाळगून लिन होणे, मोठेपणाचा अभिमान टाकून देणे, हे मना, तू इतका ताकदवान झाला पाहिजेस की तू हा धारण केलेला देह गेल्यानंतर तुझी वाहवा झाली पाहिजे. कारण तोंडापुढे सर्व चांगले म्हणतात पण नंतर चांगले म्हणणेच जास्त रास्त आहे.

चांगली माणसे नेहमी सत्यानेच वागतात. सत्यासाठी सर्व आघात सोसण्याची मनाची तयारी पाहिजे. त्यासाठी आपण आपला देह चंदनासारखा झिजवला पाहिजे. चंदन उगाळल्यानंतर जसा वास सुटतो तसा आपण ह्या जगातून गेल्या नंतर आपली किर्ती पसरली पाहिजे. ह्यासाठी श्री साईबाबांची भक्ती आपण वाढवली पाहिजे.

ह्या जगात श्री साईबाबांचे नामस्मरण केल्याने जी शांतता मनाला मिळते ती दुसऱ्या कशानेही मिळणार नाही. ह्या जगात सुखी कोण आहे का? मला असे वाटते ह्या जगात प्रत्येकाला जसे ठेवले आहे तसे राहिले पाहिजे. सर्व अपूर्ण आहे, श्री साईबाबाच पूर्ण आहेत असे माझे वैयक्तिक मत आहे. आपणाला ह्या जगात जी दुःखे भोगावी लागत आहेत, ती आपल्या पूर्व जन्मीच्या कर्मांची फळे आहेत. जसे संकल्प तशी

वासना, जशी वासना तशी कर्मे, जशी कर्मे तशी फळे अशा अनुषंगाने पूर्व जन्मीच्या पाप पुण्यामुळे ह्या जीवाला मानवी जन्म प्राप्त होतो. पापामुळे दुःख व पुण्यामुळे सुख मिळते. पूर्व जन्मीच्या कर्माची फळे भोगत असताना नवीन वासना निर्माण होतात. नवीन कर्मे घडून पुढच्या जन्माची तयारी होत पुन्हा वासना, कर्म पुन्हा जन्म हे कालचक्र अखंड चालू आहे. ह्या चक्रात असंख्य जीव सापडले आहेत. जो जन्माला आला तो मरणाच्या दारी सापडलाच. जगात सर्वांना ह्या मार्गानेच जावयाचे आहे.

ह्या जगात सर्वच नाशवंत आहे. आपण दुसऱ्याची स्तुतीस्तोत्रे गाण्यात काहीच अर्थ नाही. मानवाची किर्ती फोल आहे. श्री साईबाबांची भक्ती व स्तुतीच श्रेष्ठ आहे. श्री साईबाबांना आळवून त्यांचेच नामस्मरण सर्वात श्रेष्ठ आहे. आपण खरे तेच बोलले पाहिजे. जे असत्य आहे ते काया वाचा मनाने टाळलेच पाहिजे. सत्याची कास कधीही सोडायची नाही.

चिंतनात श्री साईबाबांचे स्मरण नाही, बाबांची स्तुती नाही, कर्मात बाबांची पूजा नाही ते सर्व फोल आहे. बाबांच्या नामस्मरणात हित आहे. पुन्हा पुन्हा बाबांच्या भक्तीचे पारायण केले पाहिजे. हाच भक्तीचा खरा मार्ग आहे. बाकी सर्व फोल आहे.

शेवटचा निष्कर्ष असा आहे की, ह्या जगात आपल्याला, सुख देणारे बाबांच्या भक्तीशिवाय काही नाही. आपले म्हणता येईल असे काही नाही. जे आपले म्हणावे त्याची शाश्वती नाही. फक्त श्री साईबाबा आपल्या हक्काचे आहेत. त्यांना भक्तीमार्गाने आपलेसे करावे. ते आपल्याला कधीही सोडणार नाहीत. म्हणून श्री साईबाबांची अखंड भक्ती करा.

# नमस्कार तुजला साईनाथा

नमस्कार तुजला साईनाथा।
दुःखहर्ता, तव भक्तांच्या नाथा॥ ध्रु० ॥
संसार, सागरी आम्हा तारिल तुझीच नौका।
ये ना धावुनी आता मारितो मी तुजला हाका।
आकाश फाटले ठिगळ कुठे लावू आता।
दे तुझ्या मायेचे विशाल पांघरूण आता।
नमस्कार तुजला साईनाथा
दुःखहर्था, तव भक्तांच्या नाथा॥ १ ॥
तुफानापुढे ज्योत तेवणार किती काळ।
विझुन जाईल क्षणार्धात नच टिके ती फार काळ।
थांबवूनी तुफाना सांभाळ तीला जगन्नाथा।
गुरफटलो संसारी, सोडवी तूच दीनांच्या नाथा।
नमस्कार तुजला साईनाथा
दुःखहर्ता, तव भक्तांच्या नाथा॥ २ ॥

— **कु. पंकज विठ्ठल साटम.**
गंगाबाई मॅन्शन, परेल,
भोईवाडा. मुं.नं. - ४०० ०१२.

# श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

**अनुवादक - साईनंद**

### शुक्रवार ४-१-१९१२

आज सकाळी मी लवकर उठलो. प्रार्थना केली आणि अमरावतीला परतण्याकरिता परवानगी घेण्यासाठी साई महाराजांकडे जाण्यास माझा मुलगा आणि गोपाळराव डोरले यांना मी सांगितले. आमच्या ह्या संभाषणात माझ्या पत्नीने हस्तक्षेप केला व पौष पौर्णिमे सारखा पवित्र दिवस असल्याने निघण्यास विरोध केला. तिच्या प्रतिपादनाला महत्त्व दिल्याने परवानगीच्या प्रश्नावर त्यावेळी पुढील चर्चा झाली नाही. नेहमीप्रमाणे बाहेर पडत असताना मी साई महाराजांना पाहिले आणि ते परतल्यावर मी मशिदीत गेलो. मधल्या वेळात मी रामायणाचे वाचन केले. दुपारच्या आरती नंतर आम्ही परतलो आणि जेवण झाल्यानंतर मी गप्पागोष्टी करण्याकरिता बापुसाहेब जोगांबरोबर बसलो. त्यानंतर पुन्हा रामायण वाचण्यास प्रारंभ केला. सायंकाळी पाच वाजल्यानंतर मी साईमहाराजांकडे मशिदीत गेलो त्यावेळी ते आवारात फेरफटका मारीत होते. माझी पत्नीही येथे आली. काही वेळाने बाबा आपल्या जागी आसनस्थ झाल्यावर आम्ही त्यांच्या सभोवताली बसलो. दिक्षित आणि त्यांची पत्नीही आली होती.

### शुक्रवार ५-१-१९१२

रात्री व्यवस्थित झोप लागली नाही तरीदेखील मी आज सकाळी लवकर उठलो. मी काकड आरतीला उपस्थित राहिलो. साईमहाराज उत्साही मनःस्थितीत होते. माझा मुलगा बाबा आणि गोपाळराव डोरले त्यांच्याकडे गेले. त्यांना पाहताच साई महाराजांनी त्यांना जा असे सांगितले. त्यांची ही परतण्याविषयीची परवानगी समजून माझा मुलगा बाबा व गोपाळराव डोरले यांनी बाळाभाऊचा टांगा भाड्याने घेतला व ते निघून गेले. मी प्रार्थना केली आणि साई महाराज बाहेर जाताना व पुन्हा परतताना मी त्यांना पाहिले. ते अत्यंत उत्साही मनःस्थितीत होते. आज बरेच लोक आले. दुपारची आरती व नेहमीप्रमाणे जेवण झाल्यानंतर मी थोडावेळ पहुडलो. त्यानंतर दिक्षित वाचत असलेले रामायण ऐकण्यास बसलो. त्यावेळी सर्वश्री उपासनी, भीष्मा, माधवरावही उपस्थित होते. त्यानंतर सुमारे पाच वाजता मी, भीष्मा आणि माझा मुलगा बलवंत यांच्यासोबत साईमहाराजांच्या दर्शनास गेलो. त्यांनी, त्यांची तब्बेत कशी ठीक नव्हती व आजाराविषयी विनोदबुद्धीने सांगितले. बाळाभाऊ जोशीने भाजलेले हरभरे आणले होते. साईमहाराजांनी त्यापैकी काही खाल्ले व शिल्लक राहिलेले हरभरे उपस्थितांना वाटले. साईमहाराज फेरफटका मारण्यास जेव्हा बाहेर पडले तेव्हा आम्ही चावडीशेजारी उभे राहिलो. त्यानंतर नेहमीप्रमाणे वाड्यात आरती केली, भीष्माचे भजन झाले आणि दिक्षितांच्या रामायणातील दोन पाठ वाचून झाले. धुळीयाहून आज काही लोक येऊन गेले.

**शनिवार ६-१-१९१२**

दिवस उजाडण्यापूर्वी काही काळ अगोदर मी उठलो. नेहमीप्रमाणे प्रार्थना संपविली आणि साईमहाराजांच्या दर्शनास गेलो. ते गेल्यानंतर मी बाळासाहेब भाटे यांच्याकडे गेलो. त्यांच्याकडून मराठी भाषेतील रंगनाथ स्वामींचे योगवसिष्ठ ह्या पुस्तकाची त्यांच्याकडील प्रत मी घेतली व माझ्या मुक्कामी मी परतलो. परंतु त्यानंतर रामायण वाचण्यास सुरुवात केली. दुपारच्या आरतीला आम्ही सर्व उपस्थित होतो. नेहमीप्रमाणे आम्ही आमचे जेवण घेतले. मला पहुडण्याची इच्छा नव्हती. परंतु झोप अगदीच अनिवार झाल्याने; जवळपास दोन तास मी झोपलो. त्यानंतर दिक्षितांचे रामायणाचे वाचन झाल्यावर साईमहाराजांच्या दर्शनाकरिता मी मशिदीत गेलो. त्यावेळी ते उत्साही मनःस्थितीत होते. त्यांच्याशी बातचीतही झाली. नेहमीप्रमाणे सायंकाळी वाड्यात आरती झाली. त्यानंतर आम्ही शेजआरतीला चावडीत उपस्थित राहिलो. साईमहाराज असाधारण आनंदी मनःस्थितीत होते. त्यांनी मेघाला गूढ खूण केली; जिला योगात 'दृष्टीपट' असे संबोधिले जाते. धुळीयाहून एक फलज्योतिषी आला, तो उपासनींचा पाहुणा असून तो वाड्यात राहायला आहे. रात्री भीष्मांचे भजन व दिक्षितांचे रामायणाचे वाचन झाले.

## "साईगुरु"

साईगुरु माझे कल्पतरू
कल्पनेच्या आठवणीला किती आवरू।
मृगजळामागे धावले जरी लेकरू
साईची दूरदृष्टी लेकरास धरी सावरू।
साईगुरुच्या कृपादृष्टीने दुःखाचे वलय दूर करू
या बहुरंगी जगी सर्व संकटावर मात करू।
जग हे सर्व असे बंदिस्त शाळा
तेथे कोण-कोणास घालेल आळा।
प्रत्येकाचा आप-आपला ढंग न्यारा
साईकृपाच भक्तास दाखवी योग्य किनारा।
साईलिलाचे प्रताप क्षणोक्षणी आत्मसात करू
सत्यनिष्ठ, स्वाभिमान, एकात्मतेने आम्ही जगी वावरू.

**— कु. सिंधु रंगराव थोरात**
बि.नं. ४८/२३१२, गांधीनगर,
गुलमोहर को.ऑ. सोसायटी,
बांद्रा (पूर्व), मुं. - ५१.

# रामाचे रामफळ, सितेचे सीताफळ लक्ष्मणाचे....?

— श्री. मधुसूदन वामन करंबेळकर
रघुनाथ निवास
चेंबूर (गांवठाण)
मुंबई-४०० ०७१

सुमारे पंचवीस-तीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. आम्ही सर्व मंडळी गप्पा मारीत होतो. गप्पा रंगात आल्या व रामायणावर विषय आला. रामाचे रामफळ, सीतेचे सीताफळ, लक्ष्मणाचे काय? त्यावेळी आमच्या आजोबांचा एक शिष्य, सुतार वर्गापैकी पटकन बोलला 'लक्ष्मणाचे सेवाफळ'. हा कर्माने सुतार होता खरा पण अत्यंत भक्तिमार्गी होता. रामविजय नित्य वाचणे, गुरुवर अढळ श्रद्धा व सेवा हा त्याचा आनंदाचा मार्ग होता. त्याचे नाव भागोजी सखाराम पांचाळ असे होते. त्याने दिलेले उत्तर किती समर्पक आहे ह्याचाच विचार करावयाचा आहे.

साईभक्त, साईरामायण वाल्मिकी श्री. हेमाडपंत ह्यांनी लौकिकदृष्ट्या व पारमार्थिक दृष्ट्या रामफळ व सीताफळ ह्यांची तुलना करून त्यातील मतितार्थ 'श्री साईसत् चरितात' दिला आहे. सेवाफळ हे उंबराचे फुलासारखे अदृश्य असून फलप्राप्तीत सर्वांहून श्रेष्ठ आहे. त्याच्या आधारावर विश्वाचे रक्षण होते. मग सर्व फळांत त्याला श्रेष्ठ गणले तर अतियशयोक्ती नाही.

श्रीलक्ष्मणाने रामसेवे व्यतिरिक्त कशाचीही अपेक्षा केलेली नाही. १२ वर्षे पर्यंत निराहार, स्त्रीसुख व निद्रा ह्यांचा त्याग करून रामसेवा केली. म्हणून इंद्रजीत त्यांचे हातून मारला गेला. श्रीरामालाही इंद्रजीत मारणे कठीण होते.

श्री ब्रह्मदेवाच्या आज्ञेने 'काल' मनुष्यरूप धारण करून आयोध्येला आला. व त्याने श्रीरामाची भेट घेऊन 'मला आपणाशी एकांतात भेटणे आहे मात्र तेथे दुसरा कोणीही येता कामा नये' अशी अट घातली. श्रीरामांनी ती अट मान्य करून पहाऱ्याकरिता श्रीलक्ष्मणाची निवड केली. व तू कोणालाही आत सोडू नको, आज्ञा भंग झाल्यास देहान्त प्रायश्चित होईल असे ठाम बजावले. नंतर श्रीरामांची व काळपुरुषाची भेट एकांतात होऊन चर्चा सुरू झाली. 'श्री ब्रह्मदेवांनी आपणास वैकुंठात येण्याबद्दल विनंती केली आहे. आता येथील कार्य झाले आहे तरी त्यांना आपण कृपया निरोप द्यावा.'

हा दोघांचा संवाद चालू असता, दुर्वास मुनी रामाला भेटण्याकरिता आले व लक्ष्मणाला म्हणाले, "मला ताबडतोब रामदर्शन दाखव." श्री लक्ष्मण म्हणाला, "श्रीराम कामात व्यग्र आहेत तूर्त तरी दर्शन होणे कठीण आहे. आपण कृपया थोडे थांबावे." हे ऐकताच श्री दुर्वास कोपायमान झाले व म्हणाले, "मला आताच राम दर्शन दाखव नाहीतर रामवंश अयोध्येसह भस्म करून टाकीन." हे महाभयंकर वाक्य ऐकताच श्रीलक्ष्मणांनी विचार केला की, 'सर्व अयोध्येचा नाश होण्यापेक्षा माझाच झाला तर चांगले. माझा प्राण जाऊन अयोध्या सुरक्षित रहात असेल तर ती माझी मातृभूमी

असल्यामुळे मला त्याबद्दल आनंदच होईल'. लक्ष्मण सरळ रामाजवळ गेला. श्रीराम व काल यांची बोलणी बंद झाली. श्री दुर्वास मुनींची चौकशी करून त्यांना भोजन देण्यात आले. श्री काल पुरुषही रामांना वंदन करून निघून गेला.

नंतर श्रीरामांनी सभा घेऊन झालेली हकिगत सर्वांना सांगितली व वसिष्ठ संमतीनुसार श्रीलक्ष्मणाने देहदंड सोसला पाहिजे असे ठरले. राजकर्तव्य ह्या दृष्टीने रामांनी शिक्षा ठोठावली. श्रीरामांनी आपला वध करणे हे रामाला दुःख देण्यासारखे होईल असा विचार करून श्री लक्ष्मणाने शरयू नदीत प्रवेश करून प्राणायामाने देह सोडून सेवाफळाचे फळ अयोध्येला देऊन सर्वांचे प्राण वाचविले.

साई रामायणात 'श्रीसाई' 'राम' तर म्हाळसापती भगत 'श्रीलक्ष्मण' होते. श्री साईंच्या सेवेशिवाय त्यांना कसलीही आवड उरली नव्हती. द्रव्यापासून ते दूर होते व श्री साईही इतरांना त्यांना द्रव्यमोह करू नका म्हणून सांगत असत.

श्री साई समाधीमध्ये 'एकनंदी' प्रथमच दृष्टीला पडतो. तो कोणी स्थापन केला, का केला? याची माहिती मिळत नाही. श्री. चेंदवणकर यांनाही मी पुष्कळ वेळा विचारे ते माहिती काढून सांगतो असे म्हणाले परंतु अजून त्याचा योग आला नाही.

मला मात्र हा नंदी 'श्री म्हाळसापती भगत' वाटतो. बाबांना पडणारे हार, शाली, असंख्य भक्तांनी गाईलेली स्तुती पाहून आनंद वाटतो. माझे जवळ कोणी येत नाही, मला कोणी हार घालीत नाही, भक्त माझी उपेक्षा करीत आहेत हे विचार करावयास म्हाळसापतींना वेळ कुठे आहे? अखंड साईचिंतन व पडेल ती साई सेवा करण्याकरिता नंदी वाट बघतो आहे. बाबांचा देह तीन दिवस मांडीवर घेऊन त्याचे रक्षण करण्याचे दिलेले वचन श्री म्हाळसापतींनी पूर्ण केले त्यावेळी बराच वादंग निर्माण झाला पण जिद्दीने म्हाळसा लक्ष्मणाने रक्षण केले म्हणूनच पुढे श्री साई रामायण झाले हे सर्वांना श्रुत आहे.

एक वेळेला स्वप्नात एक आर्त इसम आला व मला विनवू लागला, तुम्ही माझेबरोबर शिर्डीला या, तुमचा सर्व खर्च मी करतो, पण त्यामुळे माझे काम होईल. जर नंदी बोलला तर बाबांची पूर्ण कृपा माझ्यावर होईल व आपण आलात तर नंदी निश्चित बोलेल, तेव्हा कृपा करून माझेबरोबर चला. मी त्याचे बरोबर शिर्डीला गेलो. शिर्डीला समाधि मंदीरापेक्षा माझा ओढा 'द्वारकामाईत' आहे. स्वप्नातही मी 'द्वारकामाईत' गेलो. तेथे एक नंदी दिसला. मी गेल्यावर त्याने मला हुंगून तो माझे डोक्यावरून उडी मारून गेला. येथे स्वप्न संपले. पण तेथपासून नंदीबद्दल उत्सुकता वाढली. पूर्वीसारखे नंदीबद्दल वाटत नसे पण ज्याने श्री साई सेवा अनेक संकटांना तोंड देऊन केली ते म्हाळसापती नंदी रूपाने समाधीत तर नाहीत ना? असे वारंवार वाटते.

धन्य रामकालीन लक्ष्मण, आणि धन्य साईकालीन म्हाळसापती लक्ष्मण.

## बालसाई भक्तांसाठी कथा

# साईबाबांचे प्राणी-प्रेम

— सौ. भावना जेऊरकर
डोंबिवली (पश्चिम).

बाळगोपाळांनो! दिवाळीच्या सुट्टीत तुम्ही खूप खूप फटाके उडवता होय ना! फटाके उडविताना तुम्ही देहभान विसरून जाता. भुईनळे, फुलबाज्या उडविताना नकळत बडबड गीत म्हणता,

"दिन दिन दिवाळी, गाई म्हशी ओवाळी!
गाई म्हशी कुणाच्या? लक्ष्मणाच्या----" वगैर वगैरे खरे ना!

दिवाळी अन् गायी-म्हशींचा काय बरे संबंध? आहे ना. खूप अर्थ आहे या ओळीत. पूर्वी घरची गुरे हीच मोठी संपत्ती मानली जायची. ज्याच्याजवळ स्वतःच्या मालकीची जेवढी जास्त गुरे तेवढा तो जास्त श्रीमंत मानला जाई. गुरे म्हणजे धन. दिवाळी सारख्या मोठ्या सणाला आपण या धनाची पूजा करतो. हाच अर्थ वरील बडबड गीतात आहे.

गायी-म्हशी ही गुरे म्हणजे प्राणी. तुम्हाला प्राणी खूप आवडतात होय ना? प्राणी संग्रहालय पहाण्यास तुम्ही नेहमीच उत्सुक असता. पण त्या सर्व प्राण्यांवर तुम्ही मनापासून प्रेम करता का रे? काही मुले तर मुद्दाम ह्या प्राण्यांची छेड काढतात, त्यांना त्रास देतात अन् आनंद मानतात. जो प्राणी आपल्याला त्रास देत नाही त्याला त्रास देण्यात काय अर्थ? म्हणूनच साईबाबा प्राण्यांवर किती प्रेम करीत त्यांच्याशी कसे वागत याची कथा तुम्हाला सांगणार आहे.

चला तर! आपण शिर्डीला जाऊया. हे बघा, दुतर्फा घनदाट हिरवेगार निंबवृक्ष दिसू लागले. ते पहा, पिवळेधमक समाधि मंदीराचे कळस दर्शन. या समाधि मंदीराच्या डाव्या बाजूला आहे भक्त निवास. तेथे एका वाघाची पहा बरे समाधि दिसते आहे ना! याच वाघाची तुम्हाला गोष्ट सांगते हं! ऐका नीट कान देऊन.

साईबाबा हयात असताना एक गावकरी त्या वाघास घेऊन द्वारकामाईत आला. तो वाघ खूप म्हातारा व आसन्नमरण झाला होता. बरेच दिवस आजारी होता. त्याचा मालक औषध करून करून कंटाळला तेव्हा त्याला कोणी सांगितले की, शिर्डीला एक फकीर आहे त्याच्याकडे तू त्याला घेऊन जा. म्हणून तो आजारी वाघाला घेऊन बाबांजवळ आला. द्वारकामाईत बाबांच्या अवतीभोवती नेहमीच भक्त मंडळी बसलेली असत, ती त्या वाघाला बघून घाबरली, अन् दूरवर पळू लागली. बाबा मात्र नेहमी प्रमाणे शांत होते. वाघ बाबांजवळ आला अन् त्याने एवढ्याने डरकाळी फोडली की क्षणभर असे वाटले की आता हा वाघ सगळ्यांना खाऊन टाकणार! पण झाले भलतेच. त्यावाघाने बाबांच्या पायाशी चक्क लोटांगण घातले. बाबांनी त्याला प्रेमाने थोपटले, त्याच्या पाठीवरून मायेने हात फिरविला अन् काय आश्यर्च! त्या आजारी वाघाने बाबांच्या पायाशीच प्राण सोडला, बघता बघता तो गतप्राण झाला. त्याची आठवण रहावी म्हणून

बाबांनी भक्तांकडून एक खड्डा खणून घेतला, तेथे त्याला पुरले. आज तेथे वाघाची समाधि बांधली असून त्या समाधीवर वाघाची प्रतिकृती स्थानापन्न केली आहे.

चला आता आपण द्वारकामाईत जाऊया! ही पहा धुनी. पूर्वीची ही मशिद. पूर्वी पडकी मोडकी अशी ही मशिद होती. बाबा येथेच रहात. याठिकाणी धुनीच्या शेजारी हा कोळंबा पाहिलात का? बाबा रोज पाच घरी भिक्षा मागून आणीत. आणलेले भिक्षान्न येथे कोळंब्यात ठेवत. थोडेसे आपण खात. काही भक्तपण प्रसाद म्हणून थोडेसे अन्न खात. उरलेले अन्न खाण्यासाठी कुत्री, मांजरी इतर जनावरे, पक्षीगण येत. पण बाबा कोणासही ''हडहड'' करत नसत. ते अन्न सर्व प्राणी खात, समाधानी पावत.

एकदा तेथे भिंतीवर एक पाल चुकचुक करत होती. बाबा म्हणाले, ''आज या पालीला तिची बहिण भेटणार. थोड्या वेळाने एक भक्त औरंगाबादेहून बाबांच्या भेटीसाठी आले. त्यांच्या पिशवीतून एक पाल बाहेर पडली ती सरसर भिंतीवर गेली. काय गंमत! दोन्ही पाली एकमेकींना भेटल्या अन् भिंतीवर एकमेकींच्या मागे आनंदाने फेऱ्या घालू लागल्या. बाबा कौतुकाने त्या पालीकडे बघत होते.

आता आपण जाऊ या लेंडी बागेत बरं का! ही बाग बाबांच्या स्वकष्टाचे प्रतीक आहे. आज येथे हे विशाल वृक्ष दिसतात ना? ते सर्व बाबांनी आपल्या हाताने लावलेले आहेत. त्यांना पाणी घालून वाढविलेले आहे. अशा या बागेत बाबांचा आवडता घोडा 'श्यामसुंदर' चिर विश्रांती घेत आहे. नावाप्रमाणे हा घोडा खूप सुंदर होता. उंचपुरा, तगडा, धष्टपुष्ट, केसाळ व झुपकेदार लांब शेपटीचा होता. ज्यावेळी बाबांची मिरवणूक काढली जायची तेव्हा या श्यामसुंदर घोड्याला तऱ्हेतऱ्हेची आभूषणे घालून पाठीवर भरजरी झूल घालून सजविले जाई. हा घोडा बाबांच्या समोर दोन पायांवर उभा राही, नाच करे, नंतर पुढील दोन पाय मुडपून मान पायाशी लावून बाबांना वंदन करी. मग बाबा प्रेमाने त्याच्या पाठीवर थोपटीत, कानाशी काहीतरी गुणगुणत. त्याच्या आयाळावरून हात फिरवित. त्याने केलेली बाबांची सेवा बाबांनी जाणली. त्याच्या मृत्यूनंतर बाबांनी त्याला लेंडी बागेत पुरावयास सांगितले. आज येथे समाधि बांधून त्यावर घोड्याची प्रतिकृती स्थापन केली आहे.

बाबा माणसांइतकेच प्राण्यांवर, पक्ष्यांवर, फुलझाडांवर प्रेम करीत. या सर्वांना आपले मानून त्यांच्यावर प्रेमाचा, मायेचा वर्षाव करीत. कोणालाही ते ''हडहड'' करत नसत.

बाळांनो! तुम्हीपण मुक्या प्राणीमात्रांवर, निसर्गावर दया, प्रेम करणार ना आता?

**बाळाभाऊ गुरव साईचरणी विलीन**

साईभक्त श्री. बाळाभाऊ पिलाजी गुरव (माजी रोखपाल, श्री साईबाबा संस्थान शिरडी) यांचे शनिवार दि. ७-६-१९८६ रोजी शिर्डी येथील निवासस्थानी वृद्धापकाळामुळे देहावसान झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९० वर्षे होते. श्री साईबाबा मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात श्री साईबाबा संस्थान सहभागी आहे.

# विश्वव्यापी देव-सद्गुरू साईनाथ

— सौ. संगीता गोडबोले
(एम.ए.बी.एड.)
प्राधिकरण, 'परिमल',
पुणे - ४११ ०४४.

'गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥

या श्लोकातून गुरुची महती किती उच्च कोटीची आहे हे समजून येते. गुरू, ब्रह्मा, विष्णु, शिव आहे. एवढेच नव्हे तर साक्षात् परब्रह्म म्हणजे गुरूच आहे.

साईनाथ हे खरोखरीच ब्रह्मस्वरूप होते. व आजही या चराचरात ते व्यापून राहिले आहेत. म्हणूनच दासगणूंनी आपल्या स्तवनमंजरीमध्ये म्हटले आहे, "आपण जातगोतातीत.। सद्वस्तु जी का सत्। तीच तुम्ही साक्षात्।" (ओवी ७२)

सद्वस्तु म्हणजे परब्रह्म. या ब्रह्माचे सगुण रूप म्हणजे साईनाथ. आपल्यासारख्या असंख्य पामरांना, जे अज्ञानी आहेत, ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठीच साईनाथ शिर्डी ग्रामी अवतरले.

सध्याच्या कलियुगामध्ये परब्रह्मच असणाऱ्या अशा या साईनाथांचे गुरूचरण ज्यांना लाभले ते खरोखरी भाग्यवंत. अशा या साईनाथांची पूजा त्यांना ज्यांनी गुरूस्थानी मानले ते साईभक्त गुरूपौर्णिमेला करतात.

पण दरवर्षी शिर्डीला जाऊन साईनाथांची षोडशोपचारे पूजा केली, भजन केले, वा घरीही पूजा केली म्हणजे आपणाला 'गुरू' प्राप्त झाला का? साईसद्भक्तांनो, या गुरूपौर्णिमेच्या निमित्ताने थोडासा विचार करून पहा. ही पूजा, नामस्मरण, भजन, पोथीवाचन आदि तर आपण करणारच आहात. पण त्याहीपलिकडे साईनाथांनी जी शिकवण दिली ती जास्तीत जास्त आचरणात आणण्याचा प्रयत्नही आपणास करावयास हवा. आजच्या व्यवहारी जगामध्ये हे कठीण आहे. पदोपदी भ्रष्टाचार, मोह, अज्ञानाचा अंधःकार आहे. तथापि, साईसद्भक्तांना प्रयत्न केल्यावर हे अशक्य मात्र नाही असे मला वाटते.

स्वतः साईनाथांचे विचार पायरी पायरीने का होईना आचरणात आणावेतच. आणि याचबरोबर दुसऱ्यांनासुद्धा साईनाथांच्या उपदेशाप्रमाणे वागण्यास प्रवृत्त करावे. ही सुद्धा खरोखरी सध्याच्या कलियुगातील फार मोठी 'गुरुसेवा' असे म्हणावे लागेल.

अशारितीने साईनाथांच्या उपदेशाप्रमाणे आपण आचरण केल्यास आपले व्यक्तिमत्व खरोखरीच समृद्ध व सर्वांगाने परिपूर्ण बनेल. जीवनामध्ये सुसंवादित्व व सुकरता येईल. मनःशांती तर मिळेलच. व जास्तीत जास्त व्यक्तींनी असे आचरण केल्यास विश्वशांतीचे महान् कार्य साईनाथांनीच केले असे म्हणावे लागेल. आपापसातील झगडे व इतर अनेक निर्माण होणाऱ्या समस्या या साईच्या आचरणाची मूल्ये मनावर जोपासली गेल्याने निर्माणच होणार नाहीत.

साईनाथ हे साऱ्या जगाचे नेते होते. एखादया नेत्याला वा राजाला फक्त स्वतःच्याच देशात मान मिळतो. पण ह्या संतांची किर्ती सर्व विश्वाला व्यापून राहिली आहे. म्हणूनच साईनाथ हे हिंदूधर्माचेच नाही, फक्त भारतीयांचेच नव्हे, तर साऱ्या विश्वाचेच गुरू म्हणून त्यांना मानावे लागेल.

आता साईनाथांनी जी शिकवण दिली, त्यातील काही वचने फक्त सांगत आहे.

१) साईनाथांचा महान् गायत्रीमंत्र म्हणजे 'श्रद्धा व सबुरी' हा होय. अनन्य श्रद्धेने साईनाथांचे पाय तुम्ही एकदा धरल्यावर लौकिक जीवनातील बरीचशी दुःखे नष्ट होणारच. पण याच बरोबर मनःशांतीही मिळेल.

२) शिर्डीला आपण गेलात तर तेथे आरतीच्या वेळी आपल्या शेजारील व्यक्ति पहा, किती तन्मयतेने ती आरती म्हणत असेल. ती व्यक्ति आपल्या जातीची नसेल, तिची भाषा, पोषाख अन्य असेल, पण अंतरीचा भाव मात्र सर्वांचा एकच आहे. ही 'एकत्वाची भावना' व 'सर्वसमभाव' ही साईनाथांची महान शिकवण आहे. सर्व जाती, धर्म, पंथ, भाषा किंबहुना राष्ट्रीयत्वसुद्धा विसरून 'आपण सर्व परमेश्वराची लेकरे' या भावनेने साईभक्त शिर्डीला साईनाथांच्या पायाशी लीन होतात. अशी एकता इतरत्र क्वचितच दिसेल. म्हणून मानवधर्माची भावना आपण वाढवून त्याप्रमाणे आचरण केले पाहिजे. इतरांना आचरण करण्यास प्रवृत्त केले पाहिजे.

३) साईनाथांची महान शिकवण म्हणजे सर्व प्राणिमात्रांवर दया, प्रेम करणे. साईनाथांनी कुत्र्याला सुद्धा मारू नये असे सांगितले. त्यातही त्यांना परमेश्वर वाटतो. सध्याच्या काळात या उपदेशाचे जरी आचरण केले तरी कितीतरी समस्या आपोआप सुटतील वा त्या निर्माण होणारच नाहीत. कारण सर्व चराचरात परमेश्वर भरून राहिल्याने आपण परमेश्वराचा जसा विचार करतो तसा इतरांचाही करू लागू व यामुळे काया, वाचा, मने करून आपण कोणालाही दुःखी करणार नाही. आपल्या हातून कधी दुष्कृत्य होणारच नाही.

४) गुरूविण ज्ञान वा परमार्थ।
नाही शास्त्रार्थ दृढ केला॥ (अ. २ ओ. १९१)

प्रत्येक माणसाला गुरु हा मानावाच लागतो. गुरू शिवाय कोणतेही ज्ञान अपुरे आहे. पारमार्थिक ज्ञानातील अंतिम उद्देश्य म्हणजे मोक्ष. म्हणजे त्या परब्रह्मस्वरूप सद् तत्वाचे ज्ञान, अर्थात् साक्षात्कार. हे शब्दांपलिकडचे आहे. कारण श्रुतीने सुद्धा 'नेति नेति' म्हणून सांगितले आहे. हे ज्ञान अनुभवसिद्ध आहे. व ते सद्गुरुविना शक्य नाही.

'ब्रह्मासि जे ब्रह्मपण।
ते नाही सद्गुरूविण।
कुखंडावे पंचप्राण।
अनन्य शरण रिघावे। (अ. १ ओ. ५४)

आपल्या साईसच्चरिताचे लेखक श्री. दाभोलकर यांच्या मनातही प्रथम 'गुरु' का मानावा? याविषयी मनात शंका आली होती. तथापि, साईनाथांनी हे ओळखून काकासाहेबांना वाड्यात कशावरून वादावादी चालली होती? हे विचारले आणि श्री. दाभोलकरांचे

'हेमाडपंत' म्हणून नामकरण केले. याचे कारण त्यांचा अभिमान गळून जावा हेच होते.

तसेच, प्रत्यक्ष साईनाथांनीसुद्धा स्वतःकडे मोठेपणा वा अहंकार न घेता, 'हे माझ्या गुरूचे स्थान' म्हणून सांगितले. जगाचा गुरू असणाऱ्या साईनाथांनी सुद्धा गुरूचीच महती सांगितली नाही का?

५) साईनाथांची उदी आपण रोज लावतो. ही उदी आपणाला काय सांगते? शेवटी प्रत्येक माणसाच्या शरीराची राख ही होणारच. म्हणूनच या नरजन्माचा जास्तीत जास्त उपयोग करून घे. परमार्थात वेळ घालव.

पण, याचबरोबर दुसऱ्या एका दृष्टिनेही साईनाथांच्या उदीचे फार महत्त्व आहे. उदीने आपले रोग बरे होतात. लौकिक जीवनातील अडीअडचणी दूर होतात. पण ती लावताना थोडासा विचार करून लावा. दासगणूंनी फार मार्मिक शब्दात म्हटले आहे -

"धूपद्रव्यास अग्नीचा। स्पर्श होताक्षणी साचा।
सुवास सद्गुण तदंगींचा। जात त्याला सोडून।
तुमच्यापुढे उलटे होते। घाण तेवढी अग्नीत जळते।
सद्गुण उरती पाहण्याते। अक्षयींचे जगास॥"

(ओवी ११६, ११७)

याठिकाणी आपल्या मनातील कुत्सितपणाचा म्हणजेच षड्रिपु - काम, क्रोध, मोह, मद, मत्सर यांचा धूप जाळावयास सांगितला आहे. या सद्गुरुच्या व्यतिरिक्त व्यवहारात जेथे धूप जाळला जातो तेथे धूपाचा अग्नीस स्पर्श झाल्यावर त्याचा सद्गुण सुवास त्याला सोडून जातो. पण येथे साईनाथांपाशी उलटे आहे. घाण फक्त अग्नीत जळते व सद्गुण लोकांच्या दृष्टीस येतात. म्हणूनच ही उदी फार प्रभावी आहे व साईभक्तांना ती खूप काही शिकवून जाते.

म्हणूनच या गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आपण सर्व साईभक्तांनी साईंच्या निदान या पंचशीलाचे आचरण करण्याची प्रतिज्ञा करू व साईंच्या उपदेशाचा जास्तीत जास्त प्रसार करून लोकांना त्याप्रमाणे आचर करण्यास प्रवृत्त करूया.

# श्रीसाईबाबा व गीतासार

**— कै. श्री. पु.कृ. धुपकर**
२१७/६, जवाहर नगर,
गोरेगाव, मुंबई - ६२.

आपण जर विचार केला तर असे दिसून येते की, श्रीसाईबाबा शिर्डीत प्रगट झाल्यापासून ते १९१८ च्या दसऱ्यापर्यंत त्यांची राहणी, करणी व वागणे हे गीता तत्वज्ञानाप्रमाणे होते. अहंकाराचा नाश, सर्व प्राणीमात्रावर प्रेम, आलेल्या भक्ताला सन्मार्गाला लावणे, सर्व मनुष्य जातीचे भले कसे होईल हे बघून त्याप्रमाणे आचरण

ठेवणे, कर्तव्य करत असताना ईश्वर चिंतन करून त्याचे श्रेय आपल्याकडे न ठेवता ईश्वरार्पण करणे, आपल्याकडे कमीपणा घेऊन सर्वांची सेवा करणे व करत राहणे ह्यातच त्यांची सत्तर वर्षे गेली. भक्त त्यांना ईश्वराचा अवतार मानत होते, ते मात्र आपण ईश्वराचे बंदे गुलाम आहोत असे सांगत. आपण जन्माला आलो ते कशाकरिता ह्याची जाणीव ते आपल्या वागण्यावरून लोकांना दाखवत असत. सर्वत्र समबुद्धी ठेऊन सर्व प्राणीमात्रांचे हित करण्याविषयी तत्पर होऊन अनिर्वाच्य, अव्यक्त, सर्वव्यापी, अचिंत्य, अविकार्य, अचळ व नित्य अशा निर्गुण ब्रह्माची उपासना त्यांची मनोमन चालत असे.

"गीताः थेतु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ॥" अ-१२/६

श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, जे भक्त मत्परायण होऊन व आपली सर्व कर्मे मला अर्पण करून अनन्यभावाने माझे ध्यान करतात. त्या भक्तांचा विलंब न लावता मी त्यांचा त्वरित उद्धार करितो. श्रीसाईबाबांनीही हेच सांगितले आहे. मग जो गाई वाडेकोडे। माझे चरित्र माझे पवाडे। तयाचिया मी मागे पुढे। चोहोंकडे उभाच ॥ कोणीही केल्या माझे कीर्तन। तयासी देईन आनंदधन। नित्य सौख्य समाधान। सत्य वचन मानावे ॥ जो मजलागी अनन्य शरण। विश्वासयुक्त करी मद्भजन। माझे चिंतन माझे स्मरण। तयाचे उद्धरण ब्रीद माझे ॥ गीतेत अध्याय ॥९ ॥

"अनन्याश्चिनायनो। मां ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥२२ ॥

श्रीकृष्णाने गीतेत दिलेले वचन श्रीसाईबाबा तंतोतंत पाळत होते. व अजून पासष्ट वर्षानंतर पाळत आहेत.

"माझिया भक्ताचे धामि। अन्न वस्त्रात नाही कमी।
ये अर्थी श्रीसाई दे हमी। भक्तांसी नेहमी अवगत ॥
मज भजसी जे अनन्यपणें। सेविती नित्याभियुक्त मनें।
तयाचा योगक्षेम चालविणे। ब्रीद हे जाणे मी माझे ॥
हेचि भगवद्गीता वचन। साई म्हणती माना प्रमाण।
नाही अन्नवस्त्राची वाण। तदर्थ प्राण वेचुं नका ॥

श्रद्धायुक्त अंतःकरणाने आपण श्रीसाई मंत्र जपु या. आपल्या बाबतीत श्रीसाईची योजना काय आहे ती आपल्याला कळायची नाही पण वेळ आली की; 'आपली सर्व कामे सुरळीत होत जातील हे निश्चित!

"तत्पर तुझ्या या जे ध्यानीं। अक्षय त्यांचे सदनीं।
लक्ष्मी वास करी दिनरजनी। रक्षिसी संकट वारूनी।
ऐसा येई बा।"----- आपण फक्त येवढेच करावे.

"स्मरावे मनीं त्वत्पदा नित्य भावे। उरावे तरी भक्तिसाठीं स्वभावे।
तरावे जगा तारूनी मायताता। नमस्कार साष्टांग श्रीसाईनाथ ॥"

गीतेत १० व्या अध्यायात

"विषभ्याहमिंद कृत्स्न मे कांशेन। स्थितो जगत्॥ ४२॥

श्रीकृष्ण अर्जुनाला सांगत होते की, मी सर्वांमध्ये आहे. मुख्य दिव्य विभुतीमध्ये, सर्वांच्या अंतरी असणारा आत्मा, विष्णु, सूर्य, मरीची, चंद्र, सामदेव, इंद्र, मन, प्राण्यामधील चैतन्य, रुद्रामध्ये शंकर, कुबेर, अग्नि, मेरु, बृहस्पति, कार्तिक स्वामी, समुद्र, भृगू, वाणीमध्ये ॐ कार, यज्ञामध्ये **जपयज्ञ**, हिमालय, वृक्षांमध्ये पिंपळ, नारद, चित्ररथ गंधर्व, कपिल मुनी, अमृत मंथनाचे वेळी उत्पन्न झालेला उच्चैःश्रवा, ऐरावत, राजा, कामधेनु, वायु, यमधर्म, आदि, अंत व मध्य, ब्रह्मदेव, सर्वांचा नाश करणारा मृत्यू, गायत्री छंद, वसंत ऋतू ही सर्व माझीच रूपे आहेत. एवढेच काय हे संपूर्ण विश्व मी एका अंशाने व्यापून राहिलो आहे.

येणे निदर्शित ऐसा जो मी। तोचि मी सर्वांच्या अंतर्यामी।
तोचि मी हृदयस्थ सर्वगामी। असे मी स्वामी सकलांचा॥
अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम्।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय॥

श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, माझ्या ठिकाणी चांगल्या प्रकारे चित्त स्थिर ठेवणे तुला शक्य होत नसेल तर अभ्यास योगाने म्हणजे पुनः पुनः प्रयत्न करून मला प्राप्त करून घेण्याची इच्छा कर.

श्रीसाईबाबा आपल्याला हेच पण निराळ्या प्रकारे सांगत होते.

साई साई नित्य म्हणाल। सात समुद्र करिन व्याहल।
या बोला विश्वास ठेवाल। पावाल कल्याण निश्चय॥ २॥
संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढ निश्चयः।
मय्यर्पित मनोबुद्धिर्यो मद्भक्तः स. मे प्रियः॥
अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासिनोगत व्यथः।
सर्वारम्भ परित्यागी दो मद्भक्तः स मे प्रियः॥

सुखदुःखाला सम मानणारा, क्षमाशील, सदासंतुष्ट संयमी, दृढ निश्चयी माझ्या ठायी मन व बुद्धी अर्पण केलेला निरपेक्ष, अंतर्बाह्य पवित्र, कर्तव्य, जागरूक, अनासक्त, ज्याला कोणताच विकार चालवू शकत नाही असा जो भक्त तो मला अतिशय प्रिय होय.

मला कै. म्हाळसापतींची आठवण येते. घरी संसारी त्यांचे लक्ष नसे. अत्यंत गरीब. सर्व वेळ श्रीसाई समर्थाजवळ. ना राग, ना लोभ. घरी मुलगा आजारी असतानाही त्यांची श्रीसाई सेवा चुकली नाही. एका धनवान माणसाने त्यांच्या संसाराला मदत म्हणून काही रक्कम पुढे केली तरी त्यांनी त्याला स्पर्श केला नाही. ही निःस्पृहता. सदा आहे त्या परिस्थितीत ते संतुष्ट असत. साईसेवेला तत्पर असे भक्त विरळा.

"ऐसे होता मदाकार। कर्माकर्मी विसर। जेथे हा मत्सेवेचा आदर। तिष्ठे मी निरंतर तेथेचि॥ मज होऊनी अनन्य शरण। जया माझे अखंड स्मरण। तयाचे मज माथा ऋण। फेडीन उद्धरण करूनिया॥ साई जयास घेती पदरीं। तो घरी असो वा द्विपांतरी। तया सन्निध अष्टौप्रहरी। वसे निर्धारी श्रीसाई॥ "सर्व धर्मान्परित्यज मामेकं शरणं व्रज।

अहं त्वा सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामी मा शुन्यः ॥

श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात : सर्व धर्म कर्म सोडून तू मला एकट्याला शरण ये, मी तुला तुझ्या सर्व पातकांपासून मुक्त करीन. तू चिंता शोक करत बसू नकोस. श्रीसाईबाबा आपल्या सर्व भक्तांना हेच सांगत होते व अजूनही दृष्टांताद्वारे सांगत असतात.

"टाकुनिया मजवरी भार। मीनला जो मज साकार।
तयाचे सर्व शरीर व्यापार। मी सुत्रधार चालवी॥
देऊनीया संकटा तोंड। करितां साई स्मरण अखंड।
होतील सकळ अपाय दुखंड। शक्ति ही प्रचंड (साई)नामाची॥
शुक्ल पक्षाचिया चढत्या कला। तेणें परि भजे जो मजला।
धन्य जेणें मनोधर्म आपुला। निःशेष विकला मदर्थ॥

गीतासार :- तू कशाकरता काळजी करत आहेस. आत्मा जन्म घेत नाही व त्याला मरण पण नाही. जे झाले आहे ते चांगल्या करताच झाले आहे, जे होत आहे तेही चांगल्यासाठीच होत आहे आणि जे होणार आहे तेही चांगल्यासाठीच होईल. तू जे होईन गेले आहे त्याची चिंता करू नकोस. तुझ्या भविष्याची चिंता तू माझेवर सोपव आणि वर्तमान काळाला अनुसरून तू वाग. तुझे कल्याणच होईल.

तू जन्माला आलास तेव्हा काय घेऊन आला होतास तर ते गेल्याचा शोक करतोस. तू काय उत्पन्न केले आहेस! तर त्याचा नाश झाला म्हणतोस. तू जे काही मिळवलं आहेस ते येथूनच मिळवल आहेस, तेही ईश्वराच्या इच्छेनेच मिळवलस ते त्यालाच अर्पण कर. तू रिकाम्या हाताने आलास तसाच रिकाम्या हाताने जाणार आहेस. जे आज तुझे आहे अस समजतोस तेच उद्या दुसऱ्याचे होईल, परवा तिसऱ्याचे होईल. तू ज्याला आज स्वतःचे समजून आनंद मिळवतो आहेस तेच तुझ्या दुःखाचे कारण आहे.

परिवर्तनशील संसाराचा नियम आहे, ज्याला तू मृत्यू समजतोस तेच जीवन आहे. एका घटकेत जो करोडो रुपयाचा स्वामी होतो, तोच दुसऱ्या घटकेत दरिद्री होऊन जातो म्हणून तू माझे सांगणे ऐक. तुझे-माझे, लहान-मोठा, उंच-नीच हे तू मनातून काढून टाक मग बघ हे सर्व तुझेच आहे.

हे शरीर तुझे नाही तसेच तू शरीराचाही नाहीस. हे शरीर अग्नि, आप, वायू, पृथ्वी आणि आकाश ह्यांनी बनलेले आहे आणि ते त्यातच मिसळून जाणार आहे. तू फक्त श्रद्धा ठेऊन जे कार्य करशील ते परमेश्वराला अर्पण कर. मोक्ष मिळविण्यासाठी हा उत्तम व सोपा सरळ मार्ग आहे. तू संकल्पाचा त्याग कर. त्यामुळे भय, चिंता, शोक, दुःख वगैरेपासून तू अलिप्त राहशील. तू अहंकाराचा त्याग कर. मी हे केले, मी ते केले, हे माझ्यामुळे झाले असे म्हणू नकोस व मनातही आणू नकोस. मी अहंकारापासून दूर राहतो. (श्रीसाईबाबा सर्व श्रेय परमेश्वराला देत असत.) संसारामध्ये मी ठरवून दिलेले तेच होणार आहे. माणसांनी ठरवलेले काहीही होणार नाही. परमेश्वराच्या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्याला ईश्वरीसत्ता केंव्हाही माफ करणार नाही. चांगले काम करणाऱ्याला कधीही दुर्गति मिळत नाही व मिळणार नाही.

हेच साई भक्तिचे वर्म। व्हावा मात्र सुदैवे समागम।
मग तया कांही न दुर्गम। सर्वचि सुगम क्रमेक्रमें॥
"असत्य चालेना साईप्रति। असत्यें बाही साईची प्राप्ति।"
असत्ये जाणे अधोगति। अंती दुर्गती असत्यें॥
"गीतायाः पुस्तकं यत्र यत्र पाठः प्रवर्तते।
तत्र सर्वाणि तीर्थानी प्रयागादीनी तत्र वै॥

जिकडे गीतेचे पुस्तक असते व गीतेचा पाठ चालतो तिकडे प्रयागराजादि तीर्थे वास करतात.

श्रीसाईबाबांनी कै. दारुगणु महाराजांना आपल्या पदांगुष्ठी "गंगायमुना, प्रयागादी तीर्थे आणून दाखविली. म्हणून मी श्रीसाईबाबांना कृष्णाचाच अवतार समजतो. गीतेचे सार मुळी श्रीसाईबाबांचे अवतारात आहे. त्यांचे बोलणे, वागणे, राहणे, करणे हे सर्व गीतेत सांगितल्या प्रमाणेच होते.

एकं शास्त्रं देवकीपुत्र गीतं। एको देवो देवकीपुत्र एव।
एको मंत्रस्तस्य नामानियानि। कर्माप्येकं तस्य देवस्यसेवा॥
धर्माच्या करितां आम्हास जगती साईंनी धाडियले।
ऐसे जाणूनी साईभक्ति करिता ऐश्वर्य हे लाधले॥
आतां धर्म सख्या तुझ्या पुढतियां नम्रत्वतेने असे।
इच्छा हो जसी मानसीं करीतसे हा देह तुझा असे॥

आपण फक्त "मुखीं श्रीसाईनामावर्तन। चितीं तयाचे वचन चिंतन। मनीं तयाचे मुर्तीचे ध्यान। पुर्ण समाधान येणें मज॥ "तुजवीण रिता कोठे ठाव ना या महीवरी. साईनाथार्पण मस्तु॥

***साईभक्त श्री. पु. कृ. भाऊसाहेब धुपकर यांचा हा अखेरचा लेख प्रकाशित करून त्यांना आम्ही अंतिम श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.***

***— का. संपादक***

# बाबांच्या भक्तांची नावे व त्यांच्या वाचनातील ग्रंथ

१) बाळासाहेब देव यांच्या वाचनातील ग्रंथ — ज्ञानेश्वरी
२) नानासाहेब चांदोरकर यांच्या वाचनातील ग्रंथ — गीता
३) वझे यांच्या वाचनातील ग्रंथ — रामविजय
४) काकासाहेब दीक्षित यांच्या वाचनातील ग्रंथ — नवनाथ
५) माधवराव यांच्या वाचनातील ग्रंथ — विष्णुसहस्त्रनाम
६) रामदास यांच्या वाचनातील ग्रंथ — अध्यात्म रामायण
७) काका महाजनी यांच्या वाचनातील ग्रंथ — भागवत वाचन
८) बापुसाहेब जोग यांच्या वाचनातील ग्रंथ — गीतारहस्य

**— श्री. राघवेंद्र डी. कुलकर्णी**

टाऊन मार्केट सोसायटी, हिंगोली गेट, नांदेड - ४३१ ६०२.

## ग्रंथ परिचय

# श्री अक्कलकोट निवासी स्वामी महाराज यांचे चरित्र

कै. गणेश बल्लाळ मुळेकर लिखित, 'श्री अक्कलकोट निवासी स्वामी महाराज यांचे चरित्र' ह्या श्री अक्कलकोट स्वामी महाराज यांच्या समग्र जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या ग्रंथाची सुधारून काढलेली सहावी आवृत्ती श्री. केशव दत्तात्रय मुळेकर ह्यांनी प्रकाशित केली आहे. भगवंताचे चित्र रेखाटताना व त्याच्या अगाध लिलांचे वर्णन करताना बहुतेक लेखकांनी पद्य या साहित्य प्रकाराचा वापर केला आहे. अक्कलकोटस्थ श्री स्वामी समर्थ हे भगवंताच्या उपअवतारांतील एक. त्यांचेही चरित्र १८९७ पर्यंत पद्यात संक्षेपाने लिहिलेले होते. सर्वसामान्यांना समजणाऱ्या भाषेत श्री समर्थांच्या आचार-विचारांचे दर्शन घडावे म्हणून कै. गणेश बल्लाळ मुळेकर ह्यांनी अत्यंत प्रयासाने श्री स्वामी समर्थांबद्दल ठिकठिकाणाहून माहिती संकलित केली व ती काळजीपूर्वक व बारकाईने शब्दबद्ध केली. श्री स्वामी समर्थांच्या चमत्कारिक लीलांची खात्री पटल्यावरच त्या, लेखकाने पुस्तकात अंतर्भूत केल्या. काही लेखक पुस्तकाचा आकार वाढविण्यासाठी, कपोलकल्पित व मौखिक गोष्टींचा पुस्तकात भरणा करतात परंतु असा फापटपसारा ह्या ग्रंथात कुठेही आढळत नाही.

सदर पुस्तकात श्री स्वामी समर्थ हे साक्षात् दत्त अवतार होते व त्यांची महती पटवून देण्यासाठी लेखकाने त्यांच्याविषयीचे अनेक अनुभव विशद केले आहेत. प्रस्तुत पुस्तक श्री स्वामी समर्थांच्या निर्वाणापर्यंत मर्यादित न राहता, ते पुढेही वाटचाल करते. महाराजांच्या प्रयाणानंतर श्री बाळाप्पा महाराज, श्री आनंदनाथ महाराज, श्री बीडकर महाराज, दादरचे श्री. बाळकृष्ण महाराज (सुरत) वगैरे महाराजांच्या भक्तांनी भक्तिभावाचा प्रवाह चार दिशांनी कसा वाढविला, याचेही वर्णन या पुस्तकात केले आहे.

श्री स्वामी समर्थ महाराजांचे चरित्र सात भागात व परिशिष्टात दिले आहे. परिच्छेदांना उपशिर्षक दिल्याने आगाऊ विषयाची वाचकाला जाणीव होते. महाराजांच्या मुखातून आलेली बोधवचने जाड्या टाईपमध्ये छापल्यामुळे ती वाचकाचे मन वेधून घेतात.

मूळ ग्रंथातील भाषा तत्कालीन समाजाची (१९ व्या शतकाच्या अखेरची) असल्याने, प्रचलित समाजाला ती समजणे अशक्य होते. म्हणून नवीन प्रकाशनात मूळ ग्रंथातील भाषेत सुधारणा करण्यात आली आहे. ती प्रसादपूर्ण व उत्कंठावर्धक आहे. हे कार्य कालानुरूप बदलणे क्रमप्राप्त असते. तरीदेखील काही शब्दांची उकल करण्यासाठी वाचकाला डोक्याला ताण द्यावा लागतो किंवा त्यासाठी मार्गदर्शन घ्यावे लागते.

स्वामी भक्त चोळप्पा यांचे मूळ ग्रंथात विखुरलेले चरित्र एकाच ठिकाणी देण्यात आले आहे. श्री. बाळाप्पांचे मूळ ग्रंथ चरित्र उत्तरार्ध घालून पूर्ण करण्यात आले आहे. श्री.

आनंदनाथ महाराज, श्री. तातमहाराज व दादरचे बाळकृष्ण महाराज (सुरत) यांचीही त्रोटक चरित्रे या ग्रंथात समाविष्ट करून महाराजांच्या चरित्राची परिपूर्ती करण्यात आली आहे.

महाराजांनी प्रयाण केल्यानंतर सुमारे १०८ वर्षे होत आली. तरीदेखील ते आपल्या भक्तांना दृष्टांत देऊन त्यांच्या मनोकामना पूर्ण करीत आहेत. असा अनन्य भक्तांचा अनुभव आहे.

मुखपृष्ठावरील छत्रीधारी श्री. अक्कलकोट स्वामी महाराजांचे लोभसवाणे तैलचित्र चित्रित केलेले आहे. मूळ लेखक कै. गणेश बल्लाळ मुळेकर, कै. दत्तात्रय गणेश मुळेकर (सहाव्या आवृत्तीचे प्रकाशक श्री. के.द. मुळेकर यांचे पिता), आसनस्थ श्री अक्कलकोट स्वामी महाराज, चिंतोपंतांच्या पाटावर उमटलेल्या पादुका, आसन अवस्थेत श्री अक्कलकोट स्वामी महाराज, श्री. सद्गुरू बाळाप्पा महाराज, श्री. गुरुमंदीर, बाळाप्पा मठ, श्री. बाळाप्पा मठातील गाभारा, श्री परम सद्गुरू गजानन महाराज (अक्कलकोट), श्री स्वामी महाराजांची समाधी, श्री बाळकृष्ण महाराज, सुरत (दादर, मुंबई), वडाखालील मठाचा गाभारा (अक्कलकोट) व श्री स्वामी महाराज यांचा वडाखालील मठ (अक्कलकोट) ह्या आकर्षक व उद्बोधक छायाचित्रांचा पुस्तकात समावेश असल्याने हे पुस्तक संग्रही ठेवण्याजोगे परिपूर्ण झाले आहे.

**— शुभनिल, लालबाग.**

पुस्तकाचे नाव- श्री. अक्कलकोट निवासी स्वामी महाराज यांचे चरित्र  
लेखक- कै. गणेश बल्लाच्च मुळेकर  
प्रकाशक- श्री. केशव दत्तात्रेय मुळेकर, ब्लॉक नंबर बी १/३४, शितळाकृपा, माहीम, मुंबई-४०० ०१६.

# चालविसी हाती धरूनिया

**— कु. वत्सला आजगावकर**  
बि.नं. १, तळमजला,  
खेरनगर, दौलतनगर समोर, वांद्रा.

१९७६ साली मी राजा पाटीलच्या ट्रीपमधून काश्मिरला गेले. ट्रीपमध्ये माझ्या नात्याच्या तीन चार बायका होत्या. राजाने काश्मिरच्या सफरीमध्ये जी स्थळं दाखवायचा ठराव केला होता, ती सर्व दाखवली. पण काही ठिकाणं त्याने उल्लेख न केलेली अशी होती. तिथे तुम्ही आपल्या जबाबदारीवर जा असे राजाने आम्हाला सांगितले होते. उदाहरणार्थ श्रीनगर मध्ये आम्ही ज्या हॉटेलात मुक्काम केला होता त्या इन्टरनॅशनल हॉटेलच्या अगदी शेजारीच उंच ठिकाणी श्री शंकराचार्यांचे फार प्राचीन मंदीर आहे. उंच अशा त्या शंकराचार्यांच्या मंदीराचे मला माझ्या कमकुवत पायांमुळे दर्शन घेता येणे शक्य नव्हते. तिथे जायला वाहनांची काही सोय नव्हती. ते उंच ठिकाणी असल्यामुळे

राजाने अधिक रक्तदाब असलेल्या लोकांना तिथे जायला मज्जाव केला होता व ट्रीपमधली बाकीची मंडळी पण मला तिथे जाऊ नकोस म्हणून सांगत होती. वर चढून जायचा व खाली यायचा एकच मार्ग असल्यामुळे मी विचार केला की, वर शेवटपर्यंत जरी मी जाऊ शकले नाही तरी वरून खाली येणारी आमच्या ट्रीपमधली आमची मंडळी मला वाटेत भेटतील व त्यांच्याबरोबर मी खाली येईन. पायथ्याशीच आम्ही उतरलेलं हॉटेल होतं. तोंडाने श्री साईनामाचा जप मात्र अखंड चालला होता. मी हॉटेलमधून निघताना एक सुंदर गुलाबाचं पुष्प आद्य शंकराचार्यांच्या मंदीरात वहाण्यासाठी घेतलं होतं व मनाशी दृढ निश्चय केला होता की, मी श्री साईबाबांचंच दर्शन घ्यायला चालले आहे. चालता चालता थकल्यामुळे मी मध्येच बसले व एका वाटसरूला विचारले, मंदीर अजून किती दूर आहे. तो म्हणाला, बरेच चढून गेले पाहिजे. मग मात्र माझा धिर खचला व तिथेच एका दगडावर ते पुष्प ठेवून बाबांना नमस्कार केला व म्हटलं "बाबा माझं हे गुलाबाचं पुष्प इथूनच स्विकारा. आता मी आणखी वर येऊ शकत नाही." इतक्यात दोन काश्मिरी तरुण श्री शंकराचार्यांच्या दर्शनाला चालले होते. ते मला म्हणाले, "माताजी आपको कहां जाना है? यहाँ से मंदीर नजदीक है! हम वहांही जा रहे है! हम आपको लेके जायेंगे!" आणि त्या दोन्ही काश्मिरी तरुणांनी मला अक्षरशः दोन बाजूला उचलून मंदीराजवळ नेऊन सोडले. तिथे माझ्या सोबतची मंडळी मला भेटली. ते दोघे तरुण नंतर कुठे गेले ते मला समजलेही नाही. म्हणून म्हणते की, चालविसी हाती धरूनिया! श्री साईबाबांवर फक्त विश्वास ठेवा व तोंडाने श्री साईनाम जपा. म्हणजे ती साईशक्ती तुमच्या जवळच आहे.

## चरणमिठी

साई जेव्हा स्वप्नी दिसले
माझी आहेस असे सांगितले
मी माझेपण विसरूनी गेले
त्या चरणा बिलगुनी राहिले
सुटता सुटेना मिठी चरणाची
इच्छा नाही दूर होण्याची
तमा नाही मज मम जीवीताची
ओढ आहे तव चरणाची
नाही होणार दूर कधीही
नाही सोडणार चरण मिठीही
इच्छा विसावे चरणी सदेही
जन आत्मापरमात्म्याचे मिलन पाही

— डॉ. इंदू नाईक
सिता-कुंज, लोणावळा.

# बाबांनी साईप्रकाशला वाचविले

— श्री एन.आर. देशपांडे
यल्लारेडी, पो. निजामाबाद, आं.प्र.

**बाबांचे बोल** - जरी मी हे शरीर गेलो टाकून, तरी मी धावेन भक्तासाठी.''

मी माझी पत्नी सौ. नानीबाई ४०-४५ वर्षापासून बाबांचे भक्त व दास आहोत . बाबांनी आम्हास सुखरूप ठेवून सर्व संकटांतून मुक्त करून आम्हास जे पाहिजे ते करून दिले. आम्हास आमच्या वयाच्या ४५ वर्षापर्यंत संतती नसल्याने चिंतेत होतो आणि बाबांची प्रार्थनाही चालूच होती. दर दोन वर्षी आम्ही शिर्डीस बाबांकडे जात असू. बाबांच्या कृपेने आम्हास १९६१ साली मुलगा झाला, त्याचे नाव साईप्रकाश ठेवण्यात आले. त्यांच्या कृपेने तो आज २५ वर्षाचा झाला असून बी.कॉम.एल.एल.बी. झाला आहे. या चार-पाच वर्षापासून माझ्या डोळ्याची दृष्टी नसल्याने शिर्डीस जाणे कठीण असले तरीही, माझा मुलगा साईप्रकाश शिरडीला जात असतो. आम्ही बाबांचे आजन्म सभासद आहोत.

माझ्या मुलाची एल.एल.बी.ची पदवी होण्याच्या अगोदर गेल्या जून महिन्यात आम्हास बाबांनी या आंधळ्या अवस्थेतही काशी, प्रयाग, गया व इतर यात्रा करून शिर्डीहून घरास सुखरूप पोहचविले. आम्ही यात्रेहून आल्याचा तो दिवस गुरवारच होता. त्याच दिवशी यात्रेचे पूजन वगैरे करून ब्राह्मण समाराधना केले. त्याच दिवशी माझ्या मुलास निर्मलहून एक सोयरीक आली. ते गृहस्थ श्री. दामोदरराव देशमुख वकील असून लोकांमध्ये प्रख्यात झालेले आहेत. त्यांची कन्या चि.सौ. निर्मलास आमच्या मुलास देण्याचे ठरवून बोलाचाली झाली. आणि ता. २८ मे १९८६ रोजी लग्न समारंभ हैद्राबादेस करण्याचे ठरले. त्याप्रमाणे आमची व त्यांची विवाह सोहळ्याची तयारी सुरू झाली.

आमचे घर थोड्या जुन्या पद्धतीचे असून, सोईस्कर नसल्याने, जुन्या घरावरच एक माडी करून द्यावी असे माझ्या मनास वाटले. पण माझ्या पत्नीस व मुलास लग्न समारंभ जवळच येत असल्यामुळे हे काम पूर्ण होणे शक्य नाही असे वाटले. तरी पण माझा विश्वास बाबांवर असल्यामुळे गुरुवारचा पाडवा आल्यामुळे त्याच रोजी बंगला बांधण्याचा मुहूर्त केला आणि कामास सुरुवात झाली. बऱ्याच अडचणी येत राहिल्या तरीपण बाबांनी स्वतः येऊन बांधण्याचे काम उरकले. अंतिम क्षणी लग्नाच्या एक आठवडा अगोदर थोडेसे लाकडी काम थांबले. आणि माझ्या मनास हुरहूर लागली. इतक्यात त्यांच्याच रूपाने माझ्या ओळखीचे एक गृहस्थ श्री दत्तात्रयराव मणूरकर आले आणि लाकडी फळीची व्यवस्था त्यांनी स्वतः केली. बाबा आपल्या भक्तांच्या कामासाठी कसे धावून येतात ते त्यांनी दाखवून दिले. लग्नाचे आमंत्रण श्री बाबांना सर्वांच्या अगोदरच गेले होते.

लग्नाच्या अगोदर २४ मे १९८६ रोजी आमच्या ओळखीचे श्री. दादा दिक्षीत बीदरकर यांच्या मुलाचे लग्न होते. त्या दिवशी पहाटेच सहा वाजता माझा मुलगा साई

प्रकाश व त्याचा चुलत भाऊ श्री. मोहनराव वकील दोघे मिळून मोटर सायकलवरून बेदरला गेले आणि लग्न उरकून चार-पाच वाजता परत येत असताना ५० कि.मी. वर मोटर सायकल समोर दोन मुले एकदम धावत आली, त्यांना वाचविण्याकरिता एकदम ब्रेक लावताच मोटर सायकल उलटली. मोटर सायकलवर बसलेले दोघेही जण बरेच दूर जावून पडले. माझा मुलगा बाबांचा धावा करून म्हणाला, माझे लग्न कसे होणार आणि उठून बसला. उभे राहून पाहतात तर काहीच मार लागलेला नव्हता. मोटर सायकल जशीच्या तशीच चांगल्या स्थितीत दिसली. त्याच मोटर सायकलवर बसून दोघेहीजण सुखरूप घरी पोहचले. हे आम्हास सांगताच आम्ही गहिवरून आलो. डोळ्यांतून आनंदाश्रू गळू लागले. बाबांचा धावा, प्रार्थना करून अगाध उपकार केल्याबद्दल आम्ही आभारी झालो. असेच कितीतरी संकटातून आम्हाला बाबांनी वाचविले आहे.

ठरल्याप्रमाणे २७ मे १९८६ रोजी सर्व लग्न मंडळीसह हैद्राबादेस गेलो. दुसऱ्या दिवशी २८ मे १९८६ रोजी दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी लग्नाचा मुहूर्त होता. त्याचवेळी माझ्या दूरचे ओळखीचे गृहस्थ जे बाबांचे भक्त ते श्री. गुडेराव पटवारी बीदरकर आले आणि म्हणाले की, मला बाबांनी आपल्या मुलाच्या लग्नास अक्षता देवून पाठविले आहे. त्यानंतर ते लग्न करून गेले पण आता पर्यंत येऊन भेटले नाहीत. या वरून संकटसमयी बाबा भक्तांसाठी धावून येतात हे त्यांनी सिद्ध करून दाखविले.

# नवसास माझी पावेल समाधी
# धरा दृढ बुद्धी माझे ठायी

— सौ. पुष्पलता सुर्यवंशी
साकेत, इंदूर.

१९८५ दिवाळीच्या आधी माझ्या नणंदेचे ब्रेस्ट कॅंसरचे ऑपरेशन झाले. श्रीसाई कृपेने त्यांची प्रकृती बरी आहे. माझी मुलगी दिवाळसणासाठी मुंबईहून माहेरी आली होती. एक दिवस रात्री झोपताना ती मला म्हणाली, "आई, माझ्या छातीवर एक गाठ ४-५ महिन्यापासून आहे. पण दुखत नव्हती म्हणून मी लक्ष दिले नाही." आत्याचे ऐकल्यापासून भिती वाटते. दुसऱ्याच दिवशी आम्ही २-३ स्पेशॅलिस्ट डॉक्टरांना दाखविले. त्यांचे म्हणणे पडले की, गांठ ताबडतोब ऑपरेशन करून काढून टाकावी. आमचे सर्वांचे तर तोंडचे पाणीच पळाले. मी तर श्रीसाईबाबांना नवसच केला की, काही नसू दे व ऑपरेशन करावे लागले नाही तर मी शिर्डीला येऊन अभिषेक करीन व हा अनुभव साईलीला मासिकात देईन. मुलीलाही श्रीसाईबाबांची उदी रोज खायला व गाठीला

लावयला सांगितले. आम्ही लगेच मुंबईला जाऊन मुंबईचे प्रसिद्ध डॉक्टरांना दाखविले. त्यांनी व अन्य २-३ डॉक्टरांनी तपासून ऑपरेशनच करावे लागेल व त्यासाठी आवश्यक क्ष किरण वगैरे करून आणण्यास व रुग्णालयात खोली रिझर्व करण्यास सांगितले. त्याप्रमाणे सर्व तपासण्या करून व खोली रिझर्व करून परत डॉक्टरांना दाखविण्यास गेलो. डॉक्टरांनी मुलीला तपासून पाहिले. त्यांना गाठच लागली नाही म्हणून त्यांनी आणखीन २-३ डॉक्टरांना तपासायला सांगितले पण त्यांनाही गाठ सापडली नाही. पहिल्या क्ष किरण तपासणीत गाठ होती म्हणून त्यांनी परत क्ष किरण तपासणी केली पण त्यातही गाठ दिसली नाही. डॉक्टर हसून तिला म्हणाले, गाठच नाही तर ऑपरेशन कशाचे करायचे? अशा प्रकारे श्री साईबाबांचया कृपेने ऑपरेशन टळले व माझ्या श्री साईबाबांनी मोठ्याच संकटातून आम्हाला वाचवले व आमची काळजी दूर केली.

नंतर लगेच मी शिर्डीला श्री बाबांच्या दर्शनाला जाण्याचे ठरविले. मनात निश्चयच केला की, सोबत मिळो अथवा न मिळो शिर्डीला जायचेच. त्याप्रमाणे पुण्याला गेले असताना माझ्या नणंदेचे म्हणणे पडले की, आजकाल एकटे जाऊ नये. म्हणून सोबत पहाण्याच्या मार्गाला लागलो. नणंदेच्या एका मैत्रिणीला सहज विचारले असता त्या लगेचच तयार झाल्या. दुसरेच दिवशी आम्ही दोघी सकाळच्या बसने शिर्डीला रवाना झालो. १० ॥ वाजता शिर्डीला पोहोचल्यावर प्रथम दुपारच्या २ च्या बसचे रिझर्वेशन केले. नंतर अभिषेक, पूजा, दर्शन सर्व व्यवस्थित झाल्यावर माझ्या सोबतीणीला, द्वारकामाई, गुरुस्थान वगैरे फिरून दाखविले. थोड्या वस्तु खरेदी केल्यावर भोजन गृहात जाऊन जेवण केले. त्यात थोडा उशीर झाला. बस स्थानकावर येऊन पहातो तर दुपारची २ ची बस निघून गेलेली. आम्ही दोघीही फार निराश झालो. दुसरी पुणे बस सायंकाळी ६ वाजता होती, पोहोचायला रात्र झाली असती. एकट्या दोघी बायाच होतो म्हणून काळजीत पडलो. तेवढ्यांत एका म्हाताऱ्या बाबांनी येऊन सांगितले की, काळजी करू नका. ३ वाजता अहमदनगर बस आहे तिने नगरला जा. मी पण तुमच्या सोबत आहे. तेथून तुम्हाला पुण्याच्या खूप बसेस मिळतील. म्हणून आम्ही नगर बसने निघालो. नगरला बस थांबल्याबरोबर उतरायच्या आधीच त्या म्हाताऱ्या बाबांनी आम्हाला सांगितले की, ती पहा पुण्याची बस सुटण्यातच आहे. त्याने जा. आम्ही त्या दुसऱ्या बस जवळ गेलो व कंडक्टरला विचारले की जागा आहे का? तर तो म्हणाला, दोनच सिट्स आहेत, लवकर बसा. आम्ही दोघी बसमध्ये बसलो व बस चालू झाली. आम्ही सुखरूप ८ वाजता रात्री पुण्याला पोहोचलो. आमच्या दोघींच्याही मनात सारखे येत होते की, ते म्हातारे बाबा कोण असतील? श्री साईबाबाच तर आम्हाला सोबत करायला आले नसतील! दुसऱ्या बसमध्ये नेमक्या दोनच सिट्स, त्याही जवळ जवळच्याच कश्या रिकाम्या होत्या! आम्ही बसल्याबरोबर बस चालू झाली, जशी ती आमचीच वाट पहात होती. श्री बाबांनीच आम्हाला सहाय्य केले यात शंकाच नाही, हे पाहून मन गहिवरून येते. श्री बाबांची जशी माझ्यावर कृपा आहे तशी सर्वांवर राहो हीच त्यांच्या चरणी प्रार्थना.

# मंगळसूत्र मिळाले

सौ. उमा कीर्तने
२४ अे, महाराष्ट्र सोसायटी, अहमदाबाद.

२० मे १९८६ ची गोष्ट. येथे खूपच उन्हाळा म्हणून आम्ही घरापुढच्या ओट्यावर झोपतो. हल्ली फारच चोऱ्या होत असल्याने आम्ही अंगावरचे दागिने काढूनच बाहेर झोपतो. परंतु त्या दिवशी रात्री बराच वेळपर्यंत गप्पा मारल्या व झोपायला गेलो. रात्री एक-दीड वाजता सहज जाग आली व टोचल्यासारखे झाले. पाहिले तर मंगळसूत्र गळ्यात राहिले. राहू दे गळ्यात, काय होतय? असे म्हणते न म्हणते तोच दुसरा विचार मनात आला की, त्या सोन्यासाठी जीवावर बेतायचं! म्हणून मी ते काढून उशीत टाकले. पहाटे एकदम पावसाचे शिंतोडे आले, घाईत उठून आत आले. कारण नोकर, मुले ह्यांनी गाद्या-उशा आत आणण्याचे काम चालविले होते. मी आत येऊन झोपले; ती बऱ्याच उशीरापर्यंत झोपले. उठल्यानंतर चहा घेतला अन् एकदम मंगळसूत्राची आठवण झाली. म्हणून माझी उशी काढली व पाहिले तर मंगळसूत्र नव्हते. ठेवताना कुठेतरी पडले असेल ही कल्पना माझ्या डोक्यात येऊन गेली.... तरीपण जाणार कुठे ह्या कल्पनेने घेरले. उशा, चादरी सर्व पाहिले पण मंगळसूत्र सापडले नाही. असे सहजी जाणं तर शक्य नव्हते. पेपरवाला बाहेरूनच पेपर टाकतो. झाडूवाली कम्पाऊण्ड झाडायला आलेलीच नव्हती. घरातला नोकर मिलमध्ये कामावर निघून गेला होता. तो इतका जुना, विश्वासू की असे काही घेणं शक्यच नव्हते. माझी तर रडकुंडीची पाळी आली. ४-४॥ हजाराचे घरबसल्या नुकसान! आणि त्यातच माझ्या हातून काही नुकसान होत नाही. म्हणून खंत वाटली. कशीतरी आंघोळ-पूजा केली. साईबाबांना म्हटले, 'मंगळसूत्र मिळू दे. पेढे वाटीन. सत्यनारायणाचा प्रसादासारखा प्रसाद तुला करीन.' मुलगा म्हणाला, 'मी बँकेतून नोकराला फोन करीन व त्याने उचलून ठेवले असेल तर तुला लगेच कळवीन.' दिवसभरात फोन आला नाही. आणि त्याने ठेवले असते तर घरात कुणाला तरी सांगून गेला असता.

दुपार झाली. कसा तरी भात खाल्ला. 'मंगळसूत्र हरवले' हे अशुभ चिन्ह तर नव्हे? आणखीन मन खचले. पण हे म्हणाले, 'जाऊ देत. ३२ वर्षापूर्वी काय किंमत होती, ती नुकसान समज. तरीपण दुपारी आम्ही अंथरूण उशा ठेवतो, ती जागा पाहिली. मंगळसूत्र कुठेही दिसले नाही. शेवटी मी बाबांना म्हटले, बाबा, मी साईलीलात वाचले की तुम्ही सर्वांना धावून मदत करता. मी हा अनुभव साईलीलेत देईन. मंगळसूत्र मिळू देत. संध्याकाळी नोकर आला. मी त्याला घडलेला प्रसंग सांगितला. तो उत्तरला, हो मला हरेशचा फोन आला होता. मी चहा पितो व सर्व बघतो. त्याप्रमाणे त्याने पाहिले. माझा मुलगा व त्याने मिळून मोठमोठी धान्याची पिंपे सरकवली. त्यामागे शोधले असता तेथे मंगळसूत्र मिळाले. तेथे पडले कसे? कदाचित उंदीरमामाने नेले? की उशी ठेवताना उडाले? काय झाले ते कळले नाही. पण संध्याकाळी ७ वाजता मिळाले. नोकराला ११ रु. दिले. प्रसाद केला. पेढे आणले. अन् माझ्या डोळ्यात आनंदाश्रू आले.

# नित्य मी जिवंत, जाणा हेचि सत्य नित्य घ्या प्रचीत अनुभवे

कु. स्मिता मनोहर चिटणीस,
३०१/३, लव बिल्डिंग,
निकदवारी लेन, गिरगाव, मुंबई नं. - ४.

गेल्या वर्षीचीच गोष्ट. माझी प्रकृती जरा नाजूकच आहे. त्यामुळे मला जरा सुद्धा दगदग झाली की ती लगेच जाणवते. असे जरी असले तरी मला प्रवास करायला फार आवडतो. तसेच या दोन वर्षात मी प्रवास फार केला यामुळेच की काय कोण जाणे मला एकसारखे पाठीत दुखू लागले. त्यामुळे जास्तीत जास्त मी अर्धा तास एका ठिकाणी बसणे माझ्याने अशक्य झाले. सारखे वाटायचे की आराम करावा. त्यातच मला ताप येऊ लागला.

थोडे दिवसांनी असाच मला ताप आला व तो ताप दिवसेंदिवस वाढू लागला. मला डॉक्टरचे औषध चालूच होते. पण गुण मात्र थोडासुद्धा येत नव्हता. माझ्या अंगात खूपच अशक्तपणा आला होता. प्रत्येक रोग्याला तर रात्र ही नकोशीच वाटते. त्याप्रमाणे मला रात्र झाली की नकोशीच वाटे. शेवटी अशाच एका रात्री मी अगदी कळवळून माझ्या गुरुंना (प.पू. कलावतीदेवी) व बाबांना सांगितले, 'मला ताप सहन होत नाही. मला लवकर बरे करा. मी 'साईधाम'मध्ये नारळ घेऊन येईन, माझा अनुभवही मी साईलीलेत देईन.' आणि मी बाबांचे व माझ्या गुरुंचे स्मरण करून झोपी गेले. तेव्हा सप्नात मला बाबांनी आशीर्वाद दिला. हसतमुखाने माझ्याकडे बघून त्यांनी माझ्या कपाळाला उदी लावली व तोंडात टाकली. ती उदी मी खात असताना, त्याच ठिकाणी एक प्रकाश दिसून मला माझे गुरू दिसले. जणू मला ते दाखवत होते की आम्ही दोघे एकच आहोत. मी खडबडून जागे झाले. बघते तर, माझ्या सर्व अंगाला घाम आला होता. नंतर मला शांतपणे झोप लागली. सकाळी तर माझा सर्व तापच गेला होता. मी बाबांना सांगितल्याप्रमाणे नारळ घेऊन साईधाममध्ये गेले.

परत थोड्या दिवसांनी मला ताप भरला. पण मी त्याच दिवशी (गुरुवारी) तशीच आईला घेऊन साईधाम मध्ये आली. आईने मला बरे वाटावे व माझी प्रकृती सुधारावी यासाठी नवस केला. मी बाबांची उदी लावून बाबांना सांगितले, "बाबा माझा ताप जावू दे. मला बरे वाटू दे." मी देवळातून घरी जाता जाता, माझ्या अंगात थोडीशी हुशारी वाटू लागली. घरी गेल्यावर मी 'साईस्तवन मंजिरी' वाचले व तेव्हापासून मला बरे वाटू लागले. आणि माझा ताप व पाठदुखी बरी झाली.

माझा दुसरा अनुभव असा की माझा घसा दुखू लागला. मला गिळताना, बोलताना त्रास होऊ लागला. तेव्हा माझ्या बहिणीने बाबांची उदी पाण्यात कालवून तसेच बाबांचे स्मरण करून माझ्या गळ्याला लावली. असे तिने सतत तीन रात्री झोपताना केले व माझा घसा बरा झाला.

# श्री साई कृपेचा 'वरद-हस्त' लाभलेले एक सिद्ध-स्तोत्र

— श्री.विनायक शेंडे
२/७९, नेहरू नगर,
कुर्ला (पूर्व), मुंबई - ८४.

गाणगापूरचे भस्म, अक्कलकोट येथील गंध व शिर्डी येथील विभूति यांना फार महत्व आहे. ते अनुभवसिद्ध आहे. तसेच एक अनुभव सिद्ध स्तोत्र 'साईलीला' वाचकांसमोर ठेवत आहे.

एकदा सान्ताक्रुझंचे प्रसिद्ध साईभक्त आठल्येकाका लोकल मधून जाताना नित्य नियमाप्रमाणे 'साई-स्तवन मंजिरी' ही दासगणू यांची पोथी वाचत होते. इतक्यात समोर एक गुजराथी गृहस्थ आले. साईकाकांना त्यांनी विचारले, "काय वाचता?" साईकाकांनी त्यांना ती पोथी दिली. त्यावर ते गुजराथी गृहस्थ म्हणाले, "अहो सगळी पोथी कशाला वाचता फक्त प्रार्थनाष्टक वाचा, पारायण करा, त्याला आशीर्वाद दिलेला आहे, अनुभव घ्या.' नंतर तो गुजराथी गृहस्थ उतरून गेला.

साईकाकांनी ती पोथी मला 'प्रसाद' म्हणून दिली. देताना त्या प्रार्थनाष्टकाला अत्यंत महत्त्वाचे म्हणून खूण केली. म्हणाले 'रटो अल्ला तेरा भला करेगा.'

माझ्याकडे अनेक लोक येतात. एकदा भुसावळ कडील एक गृहस्थ आले होते. त्यांच्या भगिनींचा विवाह होत नव्हता. त्यांना वर उल्लेख केलेले प्रार्थनाष्टक रोज एकदा व नऊ रविवारी १०८ वेळा म्हणायला सांगितले. मुलीने ते प्रत्येक रविवारी १०८ वेळा म्हटले व तिचा विवाह दहाव्या रविवारी ठरला.

असाच एकदा बसलो होतो. पोस्टमास्तर जाधव यांची पत्नी व दोन मुली माझ्याकडे आल्या. मुलीचे वय झालेले. विवाह नाही. मुलीने प्रश्न विचारला, विवाह केंव्हा होईल. तिला मी सांगितले, उद्या एकटी ये, मग पाहू. दुसऱ्या दिवशी ती मुलगी आली. मी तिला विचारले, "काय ग, कुणी राजपुत्र गवसलाय का?" मुलगी हसायला लागली. म्हणाली, मास्तर, मुलगा पाहिलाय. पण त्याच्याशी बोलायला संकोच वाटतो. मुलगा बेळगांवला आहे, अन् मी मुंबईला. त्यानंतर ती म्हणाली, त्या मुलाकडून मागणी यावी अशी इच्छा आहे. हे सर्व ऐकल्यावर मी वर उल्लेख केलेले "प्रार्थनाष्टक" नऊ रविवार असे प्रत्येक रविवारी १०८ वेळा म्हणावे असे तिला सांगितले. त्यानंतर त्या मुलीने मला दोन-तीन महिन्यांनी येऊन सांगितले की, अपेक्षित व्यक्तिने पत्र लिहून मागणी घातली आहे, पत्रव्यवहार चालू आहे. नंतर तिला अपेक्षित व्यक्ति कडून आमंत्रण आले व मुलगी बेळगांवला गेली. पुढील हकिगत समजली नाही. जाताना नमस्कार करायला आली होती.

या नंतर माझे मित्र श्री. सामंत यांच्या पत्नीने व मुलीने "विवाह प्रश्न" विचारला. तेव्हा मुलीच्या आईला घरीच पू. दाभोळकरांच्या साई सच्चरित्राचा एक सप्ताह करा म्हणून सांगितले व मुलीला वरील प्रमाणेच प्रार्थनाष्टक म्हण असे सांगितले. आश्चर्य

म्हणजे एका आठवड्यात मागणी आली व दहा आठवड्यांनी विवाह झाला.

वरील स्तोत्र अनेक मुलींना म्हणावयास सांगितले व फायदा झाला आहे. फक्त एकाच मुली बाबत यश आले नाही. मुलगी जैन आहे. तिला अपेक्षित असलेल्या मुलाकडून अजून मागणी आलेली नाही. बाकी सर्वांना हे स्तोत्र उपयोगी पडले आहे.

**एक विनंती**

ज्या उपवर व उपवधू मुला/मुलींच्या जन्म लग्न कुंडली मध्ये मंगळ व राहू युति आहे. त्यांच्या पालकांनी विवाह लांबत असेल तर एक सप्ताह पू. दाभोलकरांचे "साई-सच्चरित्र" वाचावे. आणि विवाहेच्छुंनी (मुलगा/मुलगी) वरील उल्लेख केलेले प.पू. दासगणू यांचे "साई-स्तवन मंजिरी" मधील पान २०/२१ वरील प्रार्थनाष्टक रोज एकदा व प्रत्येक रविवारी १०८ वेळा असे नऊ रविवार म्हणावे व विवाह झाल्यावर साईलीलाच्या संपादकांना अनुभव कळवावे.

असतील जे विमल मनोरथ, परिपूर्ण सदा ते होतात ॥
शाश्वत या नियमाची, सत्यता अनुभवी मनांत ॥

# प्रार्थनाष्टक

शांतचित्ता महाप्रज्ञा। साईनाथा दयाधना ॥
दयासिंधो सत्स्वरूपा। मायातमविनाशना ॥ १ ॥
जातगोतातीता सिद्धा। अचिंत्या करूणालयां ॥
पाहि मां पाहि मां नाथा। शिर्डीग्रामनिवासिया ॥ २ ॥
श्रीज्ञानार्का ज्ञानदात्या । सर्वमंगलकारका ॥
भक्तचित्तमराळा हे। शरणगतरक्षका ॥ ३ ॥
सृष्टिकर्ता विरिंची तूं। पाता तूं इंदिरापती ॥
जगत्रया लया नेता। रूद्र तो तूंच निश्चितीं ॥ ४ ॥
तुजवीणें रिता कोठें। ठाव ना या महीवरी ॥
सर्वज्ञ तूं साईनाथा। सर्वांच्या हृदयांतरी ॥ ५ ॥
क्षमा सर्वापराधांची। करावी हेंचि मागणें ॥
अभक्तिसंशयाच्या त्या। लाटा शीघ्र निवारणें ॥ ६ ॥
तूं धेनू वत्स मी तान्हें। तूं इंदु चंद्रकांत मी ॥
स्वर्नदीरूप त्वत्पादा। आदरें दास हा नमी ॥ ७ ॥
ठेव आतां शिरीं माझ्या। कृपेचा करपंजर ॥
शोक चींता निवारावी। गणू हा तव किंकर ॥ ८ ॥

# श्रीबाबांचा एक विशेष आलेला अनुभव!

— सौ. मालती सतीशराव भोसले
"तुळजा निवास"
२४, प्रेमनगर सोसायटी,
पुणे-सातारा रोड, पुणे.

सर्वच स्वप्ने खरी असतात असं जरी ठामपणे म्हणता येत नसलं तरी काही स्वप्नांना काही विशेष अर्थ असतो एवढं मात्र खरं. त्यातूनही संत स्वप्नात येणं ह्याला तर एक फार मोठा पारमार्थिक अर्थ आहे.

नुकतीच १९८१ सालातली गोष्ट. श्रीबाबा प्रथमच माझ्या स्वप्नात आले. स्वप्नात मी शिर्डीच्या बसमध्ये बसून शिर्डीस जाण्यास निघाले होते. अचानक माझ्या ध्यानात आलं की माझ्याकडे तर पैसे नाहीत. त्यावेळेस बरोबर जाऊबाई होत्या त्या म्हणाल्या की कशाला काळजी करता, माझ्याकडे आहेत. तेव्हढ्यात शिर्डी गाव आले. आम्ही बसमधून उतरलो, थोडे पुढे जातो न जातो तोच स्टुलावर बसलेले बाबा दिसले. श्रीबाबाच ते, मनोहर रूप पाहून मला इतका काही एक निराळाच आनंद झाला की, तो मी लिहू शकत नाही. स्वप्नीच्या त्या परम् आनंदाचा, अलौकिक आनंदाचा आजही जागृतीत देखिल मी अनुभव केवळ आठवणीने सुद्धा घेत असते. पांढरे शुभ्र वस्त्रधारी तेजस्वी ते बाबा आजही माझ्या डोळ्यासमोर तसेच उभे रहातात. बाबा माझ्याकडे प्रसन्नतेने पाहून म्हणाले, "शांती हवी असेल तर काय करायचे सांगू? - फक्त ओम साईनाथ जय साईनाथ म्हणत जा." तेव्हढ्यात माझ्या बरोबर असलेल्या सासूबाई म्हणाल्या, "ती बघ बाबांकडे. महम्मदखान लिहीलेली चादर, बाबांकडे मुसलमान लोकही येतात," त्यावर बाबा म्हणाले, "मला सर्व लोक सारखे आहेत. मला चढवलेल्या सर्व चादरी मी रात्री पांघरत असतो."

त्या स्वप्नानंतर तर मला असे झाले की मी केव्हां एकदा शिरडीला जाते, आणि माझ्या बाबांचे दर्शन घेते. अर्थात माझी ती इच्छा माझ्या बाबांनी लवकरच पूर्ण केली. मी जेव्हा शिरडीला गेले तेव्हा माझ्या तोंडातून रोज रक्त पडत होते. बऱ्याच दिवसाच्या त्या रक्त पडण्याच्या आजाराने मी आणि घरातील सर्वजण चिन्तेत रहात असत. त्यामुळे माझ्याकडून श्रीबाबांकडे एक मागणं मागितलं गेलच. शिरडीतच मी बाबांना म्हणाले, 'बाबा! पुण्याला घरी गेल्यावर माझ्या तोंडातून रक्त पडू देऊ नका. एवढचं मी मागते.' अर्थात सर्व निष्णात डॉक्टरांचे इलाजही संपले होते. माझ्या पितृतुल्य सासऱ्यांनी तर इलाज करण्यात काहीच बाकी ठेवलं नव्हतं. शिरडीस साईदेवाला सांगून मी घरी आले आणि काय आश्चर्य! घशातून रक्त पडणं अजिबात बंद झालं. सतत चार महिन्यापासून रक्त पडत होतं.

माझ्याच्याने होईल तवढ नामस्मरण मी करीतच राहीन, पण एकही दिवस रक्त पडलं नाही, असं एकदाही झालं नाही. सर्वशक्तीमान माझ्या बाबांनीच माझं रक्त पडणं बंद

केलं. सर्वांच्या हाकेला धाऊन येणारे बाबा माझ्याही हाकेला धाऊन आले.

भोग हे भोगूनच घ्यायचे असतात, परंतु आपण सामान्य माणसं देवाला हाक मारतो, आणि तो परम् दयाळू भोगमुक्त करतोही. मग "भाव तेथे देव" ह्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो. अलिकडील १९८४ सालातील घटना. मला कमालीबाहेरचा खोकला झाला होता. असा विचित्र खोकला कोणाला झालेलाही मी पाहिला नव्हता. बरीच औषधे करूनही खोकला थांबला नाही. शेवटी छातीचा 'क्ष' किरण फोटो काढावा लागला. त्यावरून पुण्यातील हुशार डॉक्टरांनी निदान केलं की क्षयरोग आहे. आम्ही घरातील सर्व मंडळी घाबरून गेलो. मन राहीना म्हणून शेवटी दुसऱ्या ठिकाणी दुसरा फोटो काढला. त्यावरूनही क्षय आहे हेच नक्की झालं. मुंबईला जावे लागेल आणि दोन महिने रहावं लागेल असंही डॉक्टरांनी सांगितल. काय करू? मी माझ्या मुलांपासून दूर राहू शकत नाही. म्हणून मला फार वाईट वाटलं. शेवटी माझ्या नेहमीच्या अनेक अनुभवांप्रमाणे सर्व अडचणींचा एकमेव इलाज म्हणजे बाबा! मी उदी खाण्यास सुरुवात केली. एका गुरुवारी बाबांचरणी मस्तक ठेऊन विनवणी केली. म्हणाले, 'बाबा! मला चमत्कार हवा! मी पुढच्या गुरुवारी पुन्हा फोटो काढीन पण त्यात मला कुठलाच रोग नसावा. बाबा! तुम्ही मला असा चमत्कार जर दाखवला तर मी आपल्या सर्व साई बंधू-भगिनींना सांगेन.

आठच दिवसांनी काय घडलं, हे लिहिण्याची आवश्यकता आहे खरी. रोजचा सूर्य उगवल्यावाचून रहात नाही. तिसरा फोटो काढला, डॉक्टरांना दाखविला. डॉक्टर म्हणाले तुम्हाला क्षयरोग नाही. हे ऐकून माझे डोळे नकळत पाणावले. आणि स्वप्नातील ते स्टुलावर बसलेले बाबा डोळ्यासमोर दिसू लागले. आधीचे दोन 'क्ष' किरण फोटो त्यांनी पडताळून पाहिले, आणि डॉक्टरांना आश्चर्याचा धक्काच बसला. ईश्वरी शक्तीशिवाय हे कार्य कोण करू शकणार? माझे बाबा ईश्वरच आहेत. शंकाच नाही. खोकलाही संपूर्ण बरा झाला. बाबांची माझ्यावर फार फार कृपा आहे.

अशीच ही कृपा बाबांची सर्वांवर राहो हीच प्रार्थना. माझ्या आणि सर्वांच्या हृदयात असलेल्या माझ्या बाबांना माझे कोटी कोटी प्रणाम!

# श्रद्धा व सबुरी कार्य सिद्धी करी

**— सौ. मनोरमा वि. तळवडेकर**

जुहू मन-मंदिर,
गुलमोहर मार्ग, जुहू,
मुंबई-४०० ०४९.

माझ्या मुलाचा साखरपुडा ता. २९-४-८४ रोजी व्यवस्थितपणे पार पडला. तारीख २८ नोव्हेंबर १९८४ सकाळी १०-५५ वाजताचा मुहूर्त ठरला. दोन तीन महिने केव्हा संपले ते कळलेच नाही. चौथ्या महिन्यापासून एक एक आपत्ती येण्यास सुरुवात झाली व आमची सगळ्यांची झोप उडाली. माझे यजमान हे साईभक्त आहेत त्यांनी हा सर्वभार

बाबांवर टाकला व आम्हास स्वस्थ बसण्यास सांगितले. श्रद्धा व सबुरी या दोन गोष्टींचे महत्व किती मोठे आहे याचा अनुभव आम्हास यावयास लागला व सर्व गोष्टी व्यवस्थीत पार पडू लागल्या. वधुवर खंबीर असल्यामुळे कुणाचेही काही चालत नव्हते. समुद्राची लाट ज्या प्रमाणे जोरात येते व किनाऱ्याजवळ येवून शांत होते त्या प्रमाणे वादळे उठत होती व शांत होत होती. लग्न तारीख जवळ आली तसतश्या वावटळी उठण्याचे प्रमाण वाढले व घरातील वातावरण बरेच अस्वस्थ झाले पण बाबांचा वरदहस्त पाठीमागे आहे त्या ठिकाणी काळजी करण्याचे काहीच कारण नव्हते. माझे सर्व कुटुंबीय, नातलग व मित्रमैत्रिणी ह्या सर्वांनी मला या काळात धीर दिला त्यामुळे हे लग्न अत्यंत चांगल्या तऱ्हेने पार पडले.

नामस्मरणाशिवाय दुसरा मार्ग नाही म्हणून आपण सर्वांनी श्री साईबाबांच्या नामाचा जप करणे आजच्या संसारी जगात अगदीच सोपे साधन आहे. आपले मन, लोभ, मद, काम, क्रोध, मोह, मत्सर या षड्रिपुने बरबटलेले आहे. श्री साईबाबांचे नाम स्मरणाने अंतःकरण स्वच्छ होऊन आनंद आणि सुखाचा मार्ग दिसू लागेल. रात्रीच्या प्रशांत समयी दंव पडत असताना त्याचा आवाज कुणालाही ऐकू येत नाही पण सकाळी उठून पाहिल्यावर सर्व फुले व फळे प्रफुल्ल व विकसित झालेली आपणास आढळतील. त्याचप्रमाणे बाबांचेही कार्य कसलाही गाजावाजा न होता हळूवार व संथपणे चाललेले असते. शिरडीस ज्याचे लागतील पाय, टळतील अपाय सर्व त्याचे. श्री साईनाथास माझे कोटी कोटी प्रणाम.

# साईबाबांची कृपा

— सौ. अर्चना चंद्रकांत तावडे
वृंदावन पॅलेस, बि.नं. १२६/४४३४,
टिळक नगर, चेंबूर,
मुंबई ४०० ०८९

मला ज्यावेळी अडचण येते त्या वेळी मी मनोभावाने श्रीसाईबाबांना शरण जावून भक्ती भावाने प्रार्थना करते व ती संकटनिवारण होऊन संपन्न होते.

दिनांक २२.१.१९८५ रोजी कचेरीतून घरी जात असताना कॉलनीमध्ये माझ्या पाठीमागून अनपेक्षितपणे एका मुलीने तिच्या सायकलची जोरदार धडक दिली, मी क्षणातच दूर फेकले गेले व जोरदार आपटले. क्षणभर माझी स्थिती केविलवाणी झाली. मला बसता अगर उठता येईना. उजव्या पायातून भयंकर कळा येऊ लागल्या. मी श्री साईबाबांचा धावा केला. त्यांची उदी संपूर्ण अंगाला व पायाला लावली व त्यांच्या नामाचा जप केला, व साईबाबांना सांगितले "डॉक्टरी ईलाज न करता मला ठणठणीत बरे करा" बाबांनी माझी हाक ऐकली. बाबांची लीला अगाध आहे. माझा पाय पूर्ववत झाला. अशी ही बाबांची उदीची किमया.

# ही श्री बाबांचीच लीला

— श्री. सूर्यकांत मा. गर्जे
१९८/म-७, म.हौ.बो. कॉलनी,
गोखले नगर,पुणे- १६.

परमपूज्य श्री साईनाथ महाराजांचे भजन-पूजन अन् मनन करण्यात जी अवीट गोडी आहे, तिचे वर्णन शब्दात करता येणार नाही. साखरेची गोडी किंवा गुलाब पुष्पाचा सुगंध प्रत्यक्ष अनुभवावा लागतो किंबहुना त्याची प्रचीतीच घ्यावी लागते. साखरेची गोडी कदाचित कमी होईल किंवा फुलाचा सुगंध उडून जाईल परंतु श्री बाबांचा भक्तीचा गोडवा दिन-प्रतिदिन वृद्धिंगत होत जातो. श्री बाबांची निस्सीम भक्ती, भक्ताला श्री बाबांच्या समीप नेते. श्री बाबांचा जो अंकित होतो त्याचे रक्षण करणे हे तर श्री बाबांचे ब्रीदच आहे.

श्री. वाघ, श्री बाबांचे परम भक्त, माझे मित्र आहेत. त्यांच्या पत्नी सुविद्य असून श्रीबाबांवर त्यांची नितांत श्रद्धा आहे.

नुकतीच घडलेली एक घटना. सौ. वाघ घरी एकट्याच होत्या. दुपारची वेळ. बँकेत जावून पैसे काढावयाचे होते म्हणून त्या लगबगीने उठल्या. आवरा-आवर केली. घर बंद करून दाराला कुलूप लावले आणि हातातील पर्समध्ये किल्ली ठेवून त्या बँकेत गेल्या. घरापासून बँक तशी अर्धा-एक फर्लांगावरच आहे. अर्ध्या तासातच त्या बँकेतील काम उरकून घरी परत आल्या आणि त्यांना धक्काच बसला.

दाराला कुलूपच नव्हते. दार अर्धवट उघडे होते. "हे कसे शक्य आहे? दाराला मी नक्कीच कुलूप लावले होते. मग दार उघडले कोणी?" सौ. वाघ यांच्या मनात संशयाची पाल चुकचुकली. त्यांनी दार उघडून त्वरित घरात प्रवेश केला. त्यांची शंका खरी ठरली होती.

चोराने कुलूप तोडून घरात प्रवेश केला होता. फळीवरची स्टेनलेस स्टीलची भांडी नाहीशी झाली होती. अजून काय चोरीला गेले असेल या विचाराने त्यांचे डोके सुन्न झाले. तोंडाला कोरड पडली. काय करावे काहीच सुचेना. त्यांची भिरभिरती नजर उजव्या बाजूच्या भिंतीवर लावलेल्या श्री बाबांच्या फोटोवर स्थिरावली. वाळवंटात झरा सापडावा, तसा आनंद सौ. वाघ यांना श्री बाबांचा फोटो पाहून झाला.

त्या बाबांच्या फोटोजवळ आल्या आणि आर्त नजरेने श्री बाबांच्याकडे पाहू लागल्या. जणू त्या बाबांना विचारीत होत्या- "बाबा, तुम्ही घरात असताना हे कसे घडले?" त्यांचे डोळे आसवांनी भरून आले. थरथरत्या हातांनी नतमस्तक होऊन त्यांनी श्री बाबांना नमस्कार केला. कितीतरी वेळ या अवस्थेत त्या स्तब्ध उभ्या होत्या. दारावरची घंटी वाजली तशा त्या भानावर आल्या. मागे वळून पाहिले तर दारात पोलिस एका चोराला पकडून उभे होते.

सर्व प्रकार पाहून सौ. वाघ क्षणभर भांबावून जागीच खिळून उभ्या राहिल्या. त्यांच्या मुखातून शब्दच उमटेना.

पोलिसाने खुलासा केला - "बाई, या माणसाला आम्ही रस्त्यात हटकले. त्याच्या जवळ एक सुटकेस व पिशवीत काहीभांडी होती. त्याला पोलिस चौकीत नेले. प्रथम् तो काही कबूलच करेना. जेव्हा त्याला पोलीसी खाक्या दाखवला तेव्हा तो तात्काळ कबूल झाला. सर्व सामान पोलिस ठाण्यातच ठेवले आहे. कुठून चोरी केलीस ते दाखव. असे विचारल्यावरून या चोराने आम्हास आपले घर दाखविले. आपले काय काय चोरीस गेले आहे?" पोलिसाने सरळ प्रश्न केला.

पोलिसांनी चोराला पकडल्याचे पाहून सौ. वाघ बाईंचा जीव भांड्यात पडला. त्यांनी पोलिसांना सविस्तर हकीगत सांगितली व पोलिसांच्या विनंतीवरुन त्या पोलिस चौकीत गेल्या. लेखी तक्रार दिली व आपल्या सर्व चीज-वस्तू घेवून घरी परत आल्या.

श्री बाबांच्या फोटोपुढे तेलाचा दिवा लावला आणि त्यांच्या डोळ्यातून घळघळा अश्रूधारा वाहू लागल्या.

## साई नाथ गुरु

साईनाथ गुरु। साईनाथ गुरु॥
जय जय परब्रह्म सद्गुरु॥
साई माझी माता। साई माझा पिता।
सोयरा सज्जनभाता। साई माझा ॥ १ ॥
साई माझा गुरु। साई माझे तारु।
नेई पैल पारू भवनदीच्या॥ २ ॥
भव नदीला तुफान आले
कैसा जाऊ पैल तिरू॥ ३ ॥
जय जय पर ब्रह्म सद्गुरु
काम क्रोध मगरी टपल्या।
एकच माझा ग्रास गिळू॥ ४ ॥
जय जय परब्रह्म सद्गुरु
नामामृत असता ओठी।
नको नको डगमगू॥ ५ ॥
जय जय परब्रह्म सद्गुरु
भाव भक्तीच्या खजाणा विणा।
देवासाई काय तुला अर्पू॥ ६ ॥
जय जय परब्रह्म सद्गुरु॥

**— डॉ. कोपडी**
कोल्हापूर.

# पाठीराखा-साई

— सौ. पुष्पा सुभाषराव वडगावे
देगलूर, जिल्हा - नांदेड.

मी, माझे पती, एवढेच नाही तर माझी मुलगी व मुलगा सर्वजण मोठ्या श्रद्धेने साईबाबांना भजतो.

बाबांच्या कृपेने आम्ही सुखी आहोत. सासरी व माहेरी भरपूर नातेवाईक आहेत ते सुद्धा बाबांच्या कृपेने सुखी आहेत.

बाबांच्या इच्छेनुसार किमान वर्षातून एकदा तरी शिर्डीला बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी येते. शिर्डीला जायचे म्हटले की मुलांना कोण आनंद होतो. मोठ्या उत्साहाने ते तयार होतात. कितीही गर्दी असो, कितीही रात्र होवो ते बाबांचे दर्शन घेण्यास तयार असतात, इतकेच नाही तर केव्हाही मनात आले की विचारतात शिर्डीला जावेसं वाटतय. शिर्डीला केव्हा जायचे? मला तर शिर्डीच दिसू लागली, तेथून परत यायला तयार नसतात.
तयार नसतात.

बाबांच्या कृपेने आम्ही खाऊन पिऊन, कपड्यालत्त्यांनी सुखी आहोत. अधुनमधून सर्वसामान्यांप्रमाणे आम्हालाही प्रकृती साथ देत नाही, विशेषतः माझ्या मुलाला. पण बाबांच्या आराधनेने व उदीने आम्ही त्यातून पार पडतो.

माझा मुलगा दोन-अडीच वर्षाचा असेल तेव्हा अचानक एक झोप झाल्यावर म्हणजे मध्यरात्री जो रडत उठला तो थांबायचे नाव घेईना. तहान लागली असेल म्हणून पाणी, भूक लागली असेल म्हणून दूध दिले पण तो कांहीच घेईना, पण त्याचे रडेही थांबेना. त्याला काय होते तेही समजेना. शेवटी कानाला हात लावून तो कान ओढून रडू लागला. तेव्हा लक्षात आले की याचा कान दुखत असावा. हे जवळ जवळ दोन तास चालले, आम्ही दोघांनी घाबरून बाबांचे नामस्मरण सुरू केलेच होते. बाबा काही चुकले असेल तर क्षमा करा. बाबा, बाबा तोंडाने चालूच होते. इतक्यात लक्षात आले की याचा कान दुखत आहे. बाबांच्या कथा व साईलीला वाचन आम्ही केलेच होते. उदीचे महात्म्य वाचून माहित होते. त्यामुळे मागचा पुढचा विचार न करता बाबांचे नामस्मरण करून मुलाच्या कानात उदीची चुटकी टाकली व बाबा याचे रक्षण कर म्हणून प्रार्थना केली. मुलगा दहा मिनीटाच्या आत शांत झोपला, तो सकाळी आठ पर्यंत उठला नाही. एवढेच नाही तर अद्यापही कधी त्याचा कान दुखत नाही. अशा प्रकारे वाचून माहित असलेले उदीचे महात्म्य प्रत्यक्ष अनुभवाने प्रकट झाले. उदी टाकण्यापूर्वी त्याला वर्षभर आधी गोवर आला होता तेव्हापासून त्याचा कान अधुनमधून दुखत होता. कानात ड्रॉप्स टाकत होतोच.

नंतर तो दीड दोन वर्ष निरोगी होता. अधुनमधून किरकोळ ताप, सर्दी, खोकला, कफचा घरघर आवाज व उलट्या होत असत. औषधे, गोळ्या दिल्या तर तात्पुरता फरक पडत असे. पण त्याच्या कानाच्या मागे गाठी झाल्या होत्या, देगलूरच्या डॉक्टरांनी सल्ला दिला की, तुम्ही एकदा नांदेडला जाऊनच चेकअप करून आणा. असं सारखं

सारखं होतं व या गाठी बऱ्या नसतात. आम्ही ताबडतोब त्याला नांदेडला चिल्ड्रन स्पेशालिस्टकडे दाखविले. त्यांनी एक्सरे काढले, रक्त व लघवी तपासून सांगितले की आज काल चाईल्ड टी.बी. फार व्हायला लागला आहे. बरे केले तुम्ही आलात.अजून थोडा उशीर केला असतात तर याच्या छातीला पहा कसा कफ धरलाय. छातीला छिद्र पडली असती. असे म्हणून त्यांनी भली लांबलचक औषध-गोळ्या, ६० इंजेक्शनची लिस्ट दिली. त्याचे वय त्यावेळी फार फार तर चार वर्ष असेल. अशा प्रकारे दर महिन्याला बोलावून त्यांनी सहा महिने इलाज केला, व आता घाबरायचे कारण नाही असे सांगितले, व महिनाभराच्या औषध-गोळ्या दिल्या. त्या गोळ्या संपल्या आणि काय पहिला पाढा पंचावन. पुन्हा उलट्या, घरघर, ताप, खोकला, गाडी चालू. बाबांवर विश्वास होता पण मन वेडे असते ते स्वस्थ बसू देईना. पुन्हा आम्ही नांदेडला टी.बी. स्पेशालिस्टकडे धाव घेतली. त्यांनी पूर्वीच्या उपचाराची कागदपत्रे, एक्सरे, लघवी, व रक्ताचा रिपोर्ट दाखवला. त्यांनी मुलाला तपासले, गाठी पाहिल्या, रिपोर्ट पाहिला व पुन्हा थोड्याशा भारीच्या गोळ्या व जास्ती पावरचे इंजेक्शन्स, टॉनिक वगैरे लिहून दिले व घाबरायचे कारण नाही. एक महिन्यानी पुन्हा आणा. अशा प्रकारे महिन्याला बोलावून त्यांनी वर्षभर इलाज केला तो इलाजही तात्पुरताच राहिला. शेवटी त्यांनी सांगितले की, निवांत १५ दिवसाची सवड घेऊनच या. आपण या गाठी ऑपरेशन करून काढून टाकू व इलाज करू.

आता पर्यंत दोन्ही डॉक्टरांचे मिळून दिड दोनशे इंजेक्शन अर्ध्या बोटा एवढ्या कॅपसुल्स, ४ आण्याच्या रुंदी एवढ्या टॅबलेटस् गिळण्यास माझ्या मुलाला खूप त्रास होत होता. त्याचे वय आता पावेतो साडे पाच वर्षाचे झाले होते. पण तो अतिशय कृश (रोडच) होता. बाबांचे नामस्मरण, सवड मिळेल तेव्हा समाधीचे दर्शन, दर गुरुवारी होईल ती सेवा करीतच होतो. साईलीला मासिकाचे वाचनही चालूच होते. दर महिन्याला आमच्याकडे ते मासिक येते. वाचनात ऊदीचे माहात्म्य, समाधी दर्शनाचे फळ आपल्या बाबांचे सहाय्य मिळाल्यास साईलीलात लेख देऊ अशा संदर्भाचे लेख आले. आता पर्यंत हिंमतीने त्याचा (मुलाचा) इलाज आम्ही करीत होतो. पण आता त्याचा हा त्रास पहावत नव्हता. ऑपरेशन म्हटल्यावर आमची हिंमत खचली. बाबा आम्ही काय चुकलो काही समजत नाही. चुकलो नाही. मातलो नाही. मग लेकराला एवढा का त्रास? असा बाबांना प्रश्न टाकला.

शेवटी आम्ही तुझी लेकरं काही चुकलं असेल तर क्षमा कर. तुझा विसर आम्हाला कधीही पडू देऊ नकोस. आमच्याने होईल ती सेवा करण्यास आम्ही कधीही कसूर करणार नाही. काही नाही तरी निदान तुझ्या तसबीरीचे दर्शन या डोळ्याने दररोज घेऊच. बाबा आम्हाला तुझ्या आशिर्वादाने काही कमी नाही. आहे त्यापेक्षा जास्ती मिळण्याची अपेक्षा नाही पण आहे तेवढे पती व मुलांचे सुख समाधानाने व शांतीने मिळो ही इच्छा आहे. बाबा लीला दाखव, मदत कर या संकटातून, ऑपरेशनच्या तावडीतून वाचव बाबा, अशी बाबांजवळ याचना केली.

शेवटी बाबांनी आमची प्रार्थना ऐकली. आता त्याच्या गाठी कमी आहेत. तो फ्रेश आहे. अधुनमधून चार सहा महिन्याला उलट्या होतात, पण बाबांच्या नामस्मरणाने कमी होतात. अशाप्रकारे सध्या सुखाने व आनंदाने बाबांना स्मरून जीवन जगत आहोत. बाबांच्या आशिर्वादाने आम्हाला कशाची कमी नाही. बाबा असेच संकटात सापडलेल्यांना सहाय्य करोत ही इच्छा मनाशी बाळगते व आमच्यावर मेहरनजर राहो, अशी बाबांच्या चरणी प्रार्थना करते.

## विजयादशमी

विजयादशमीच्या शुभ दिनी
एक तेजस्वी तारा मावळला
बाबांच्या देहरूपी पिंजऱ्यातूनी
चैतन्य रूपी पक्षी उडूनी गेला

शुभ्र निळ्या नभातील तारे
निस्तेज असती सर्व दुःखाने
अक्राळ विक्राळ मेघांमध्ये
वीज कडाडे जोराने

उद्या उगवण्यासाठी पुन्हा
एक सूर्य अस्ताला जाई
अन् दुसरा सूर्य समाधीमध्ये
गाढ चिरनिद्रा घेई

जरी हा निर्जीव झाला देह
तरी मी धावेन भक्तांसाठी
नित्य घ्या प्रचीती याची
अश्रू नका ढाळू माझ्यासाठी

१५ ऑक्टोबर १९१८ दिनी
बाबांचे महानिर्वाण जाहले
अनेक आठवणींनी त्यांच्या
नकळत नयनी अश्रू दाटले

असे मी एक पामर तुमचा
लिहिण्यास पुढे शब्द सुचेना
त्रिवार वंदन करितो तुजला
(साई) मूर्ती तुमची हृदयातून जाईना

**श्री. विश्वनाथ सदाशिव चव्हाण**
कमल निवास, कॉरी रोड,
भांडूप (पश्चिम), मुंबई ४०० ०७८.

# नवयुगाला साईंचा महान संदेश

— श्री. प्रमोद बी. रायसोनी
१६४, समर्थनगर, औरंगाबाद.

आजचे युग नवीन पिढीला जाचक ठरत असून अनेक नवनवीन समस्या उभ्या आहेत. काहीच मार्ग दिसत नसून दुःखाच्या महासागरात अनेक लोक लोटले जात आहेत. 'ब्रह्मानंदा'चा अभ्यास दूरच राहिला परंतु साधे संसारातले खर्च, काळजी, चिंता दूर होत नाही....?

धन्य धन्य भावी पिढी! अनेक संकटांतून, समस्यांतून भावी पिढी तावून निघत आहे. खरोखरच आज गरज आहे, एका महान महापुरुषाच्या मार्गदर्शनाची आणि ती आहे शिर्डी निवासी श्री साईबाबांची. आज जागृत एक महान शक्ती उभी आहे, ''साई शक्ती'' आता पाहू साईबाबांनी नव्या पिढीला काय मार्गदर्शन केले.

शास्त्र विशारद वेदवादी प्रज्ञावंत पंडितादि घटपटदिवाप्रवादी यांच्या नादी भरू नका. हरी निज भक्तांचा भुकेला — भोळीयांचा भुकेला प्रेमालागी समूळ विकला यातचि तुमचे कल्याण आहे. नसता श्रद्धा आणि सबुरी परमार्थ तीळभरी साधेना कलीयुगी नाम, कथा, कीर्तन स्वरुप साधन परमार्था श्वान सूकर का माशी हडहड कुणाशी करू नये नलगे व्रत उद्यापन! नलगे उपवास शरीर पोषण नलगे तीर्थयात्रा पर्यटन चरित्र श्रवण एक पुरे गरीबी अव्वल बादशाही अमीरी से लाख सवाई गरीबों का अल्लाभाई अक्षयी साई बदत की पिंडपोषण आणि मैथुन। हेचि जरी नरदेहाचे साधन हेचि जरी या जन्माचे पर्यवसन तरी तो नरजन्म निरर्थक शुध्द करोनीया अंतःकरण नेमनिष्ठ व्हा साईपारायण ब्रह्म सनातन पावाल महाकठीण वित्त मोह. चित्त शुद्ध नेहमी हवे पुरुषांचे पौरुष ती ही सबूरी सबूरीवर यशाचा वाटा विपत्ती पळवी आल्या गेल्याचा आदर करी। तृषीता जल भुकेल्या भाकरी उघड्यास बसाया ओसरी देता श्रीहरी तुष्टेल कोणाही बोल बोलो शंभर। स्वये नेदीं कटु उत्तर। धरितां सहिष्णुता निरंतर। सुख अपार लाधेल दुनिया झालिया इकडची तिकडे। आपण व्हावे न मागे पुढे। ठायीच निश्चल राहून रोकडे कौतुक तेवढे पहावे जैसे जो करील तैसे भरील अमोल हे बोल बाबांचे प्रेमाने जगावे.

आजच्या नव्या पिढीला साईसंदेश हा नक्कीच गुणकारी व मार्गदर्शन ठरणार आहे. वरील उपदेश वाचा. चिंतन करा. निराश होऊ नका. मार्ग जरूर सापडेल.

साईंपासून क्षणही विभक्त। तो काय होईल साईभक्त।

**दिवाळी अंक १९८६**

**भक्तांच्या विविध अनुभवांनी भरगच्च असा दिवाळी अंक १ नोव्हेंबर रोजी प्रकाशित होईल. पृष्ठे १२८, किंमत २ रु.**

**मुखपृष्ठावर श्री बाबांचे नयनमनोहर संग्राह्यचित्र.**

# ..... आणि इच्छा पूर्ण झाली

— व.दा. वेदक
मालाड (पूर्व), मुंबई नं. ९७.

सन १९७९ च्या डिसेंबर महिन्यात शिरडीच्या ईश्वरास प्रथम पहाण्याचा योग आला. श्री दासगणूकृत 'स्तवनमंजरी मध्ये मलपृष्ठावर समाधीवर टाकण्यात येत असलेल्या गलेफाचे मोजमाप दिलेले आहे. त्याप्रमाणे शिरडीस जाण्या अगोदरच मी गलेफा समाधीवर पांघरण्याचा संकल्प केला होता. परंतु शिरडीत गलेफ तयार मिळाला नाही. चादरी मात्र बाजारात भरपूर प्रमाणात उपलब्ध होत्या. या गोष्टीची काहीच कल्पना नसल्यामुळे आपण पुढील शिरडी यात्रेस स्वतः गलेफ तयार करून थोडेसे भरतकाम करून समाधीस अर्पण करू, असा मनाशी संकल्प केला. मात्र त्यावेळी मनास खंत वाटल्या वाचून राहिली नाही.

पुढे १९८२ मध्ये शिरडीस जाणे झाले. त्यावेळी रात्रौ ११ च्या मुंबई-शिरडी एस्.टी. बसने गेलो, ते सकाळी ६।। वाजता तेथे पोहचलो. आणि तसेच अभिषेकाच्या तिकीटासाठी रांगेत उभे होतो. परंतु मर्यादित तिकीटविक्री संपल्यामुळे आम्हास अभिषेकाची तिकीटे मिळाली नाहीत. त्यामुळे समाधीजवळ जाण्यास मिळणार नाही आणि सोबत नेलेला गलेफ वजा चादर समाधीवर पांघरण्यास मिळणार नाही यामुळे मन विषण्ण झाले. आम्ही प्रातःविधी आटोपून पूजासाहित्य घेऊन केवळ दर्शनाच्या रांगेत उभे होतो. समाधीजवळ गेल्यावर पुजाऱ्याने विचारले की, हा गलेफ समाधीस स्पर्श करून परत हवाय का? का समाधीस अर्पण करावयाचा आहे? मी उत्तरलो, मला समाधीस अर्पण करावयाचा आहे. त्यावर पुजारी म्हणाले, संस्थानच्या कार्यालयात जाऊन जमा करा. यामुळे मनाची व्यथा अधिकच वाढली. धड समाधीवर पांघरण्यासही मिळाले नाही, धड पांघरलेली पहावयासही मिळाली नाही तर गलेफ वजा चादर काय उपयोगाची? अशी मनात शंकेची पाल चुकचुकली. परंतु थोड्या वेळाने संध्याकाळी ते निटसे आठवत नाही पण पुन्हा आम्ही समाधीमंदिरात गेलो तो काय महत् आश्चर्य! पुजारी दोन बाजूला दोन भक्तगणांच्या चादरी घालत होते आणि काढत होते. परंतु मी नेलेला गलेफ मात्र माझ्या समक्ष समाधीवर टाकला आणि तिथे मी जवळजवळ १० मिनिटे उभा होतो तिथपर्यंत तो बदलण्यात आला नाही. हे मी माझे मित्र श्री. एस्.वाय्. पिळणकर यांच्या दृष्टीस आणून दिले. मनी खूप आनंद झाला. शिरडीच्या ईश्वराने जणू माझी इच्छा जाणून पूर्ण केली. यावेळी हृदय दाटून आले.

हेचि दान देगा देवा तुझा विसर न व्हावा ।।

# शिरडीवृत्त

## जुलै १९८६

या महिन्यात गुरुपौर्णिमा उत्सवाकरिता श्री साईबाबांचे दर्शनासाठी आलेल्या साईभक्तांची तसेच पंढरपूर यात्रेस जाणारे व पंढरपूरहून येणारे अशा साईभक्तांची खूपच गर्दी झाली होती. हा उत्सव रविवार दि. २०-७-८६ ते मंगळवार दि. २२-७-८६ पर्यंत ३ दिवस समाधी मंदिरात मोठ्या थाटाने साजरा झाला. नामांकित कलाकार सर्वश्री आनंदराव आढाव, आनंद संगीत विद्यालय कोपरगांव, श्री. दिगंबर दामले, सौ. सुनिती केळकर पुणे, श्री. जयवंत कुलकर्णी, मुंबई वगैरे कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. ह.भ.प. गंगाधर बुवा व्यास, डोंबिवली यांची कीर्तने झाली.

**गुरुपौर्णिमा उत्सव, पहिला दिवस** - रविवार दि. २०-७-८६ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५.१५ वा. काकड आरती झाली. सकाळी ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत गेली. त्याठिकाणी साईचरित्र अध्यायवाचनास सुरुवात झाली. श्रींचे स्नान, अभिषेक, पूजा, आरती झाल्यानंतर दुपारी ४.३० ते ६.३० पर्यंत ह.भ.प. गंगाधर बुवा व्यास, डोंबिवली यांचे कीर्तन झाले. रात्रौ ७.३० ते ९.०० पर्यंत आनंद संगीत विद्यालय, कोपरगांव; श्री. आनंदराव आढाव सर, कोपरगांव यांचे सुश्राव्य गायन झाले. रात्रौ ९.१५ वा. श्रींच्या पालखीची मिरवणूक निघाली. पालखीस आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. रात्री ११.०० वा. गावातून पालखीची मिरवणूक परत आल्यानंतर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस** - सोमवार दि. २१-७-८६ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. उत्सवाचा मुख्य दिवस असल्यामुळे साईभक्तांची गर्दी बरीच होती. ५.१५ वा. काकड आरती सुरू झाली. ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची अध्यायवाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थानमार्गे समाधी मंदिरात आली. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान झाले. नित्याचे कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४.३० ते ६.३० पर्यंत ह.भ.प. गंगाधर बुवा व्यास, डोंबिवली यांचे कीर्तन झाले.

सायंकाळी ७.३० वा. धूपारती झाल्यानंतर रात्रौ ९.१५ वा. श्रींच्या रथाची मिरवणूक समाधी मंदिरातून वाद्यांचे गजरात निघाली. सनई, चौघडा, टाळ, मृदुंग, गायन, भजन, राहता बॅण्डपथक, कोपरगांव चौघडा नगारा, पुणे येथील मयूर बॅण्ड व न्यू गंधर्व बॅण्डपथक, डफ, ढोल अशा थाटात लाईटने सुशोभित केलेला रथ संस्थानचे गुरुस्थान नजीक आला. त्या ठिकाणी संस्थान कर्मचारी, साईभक्त व ग्रामस्थ यांनी गारुड-भारुड कार्यक्रम केले. गारुड-भारूड कार्यक्रमात सर्वश्री तुकाराम परदेशी, एकनाथ पाटील कोते, किसन हनमंता पा. गोंदकर, शिरडी यांनी भाग घेतला. पुण्याचे सिने कलाकार श्री. रघुनाथ सांडभोर यांनी नकला व भारुड कार्यक्रम केले. त्यानंतर रात्री १२.३० वा. रथ मिरवणूक समाधी मंदिरात आली. मिरवणुकीतील भक्त कलाकारांच्या कार्यक्रमात सामील

झाले. सकाळी ६ वाजेपर्यंत कलाकारांच्या हजेऱ्या (जागर) झाल्या. साईभक्तांना दर्शनासाठी मंदिर रात्रभर उघडे ठेवण्यात आले होते.

**उत्सवाचा सांगता दिन** - मंगळवार दि. २२-७-८६ रोजी सकाळी ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. ७.३० ते ८.३० पर्यंत गुरुस्थान येथे रुद्राभिषेक झाला. १०.३० ते १२.३० पर्यंत ह.भ.प. गंगाधरबुवा व्यास, डोंबिवली यांचे कालाकीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर माधान्ह आरती झाली व साईभक्तांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्रौ ७.३० ते ९.४५ पर्यंत श्री. दिगंबर दामले व सौ. सुनिती केळकर, पुणे यांचे गायन झाले. १० वा. शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे —

**कीर्तन** - १) ह.भ.प. मधुकर गणेश सुर्यवंशी, संस्थान गवई यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली. २) ह.भ.प. गंगाधर बुवा व्यास, डोंबिवली. ३) ह.भ.प. दत्तमहाराज दर्भे, नागपूर. ४) ह.भ.प. तुकाराम बुवा परदेशी, शिरडी. ५) ह.भ.प. मनोहर दत्तात्रय अवचट, बारामती.

**प्रवचन** - ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

**भजन, गायन, वादन इ.** - १) श्री. सुधाकर नारायण कामटेकर, वडाळा २) श्री. एम्.बी. रोकडे, बिलासपूर ३) श्रीमती संतोष विजय, दिल्ली ५) श्रीमती वेंकटाचलम् ५) श्री. शाहू भोसले, मुंबई ६) श्री. विद्युत नाईक, मुंबई ७) श्री. आर.आर. सुपेकर, देवास ८) श्री. राजन पटेल, सायन ९) सौ. अनुसयाबाई कडूकर, यवतमाळ १०) श्री. मारुतराव पींटो ११) श्री. लक्ष्मण तुकाराम जाधव, मुंबई १२) श्री. रमाकांत देवीदास जोशी, नांदेड १३) श्री. गंगाधर जाधव, पुणे १४) रेखा मडावी, नगर १५) श्री. अनंत पांचाळ, मुंबई १६) सौ. कविता मडावी, नागपूर १७) वनिता गवस, मुंबई १८) श्री. अनिल बाईल, मुंबई १९) श्री उदय बाईल २०) प्रमोदिनी बाईल २१) श्री. मनोहर घडसे २२) श्री. सुरेश धुमाळ, मुंबई २३) वैशाली जाधव २४) श्री. राजेंद्र जाधव, पुणे २५) श्री. जितेंद्र जाधव २६) श्री. देवेंद्र देवळकर २७) सुलभा गोरीवले, पुणे २८) श्री. कैलास मडावी, नगर २९) श्री. रमेश मडावी ३०) श्री. धनंजय उईके ३१) वंदना वपार, पुणे ३२) कुंदा मसूरकर ३३) श्री. दत्ता भोसले, बडोदा ३४) श्री. दिलीप सावंत, मुंबई ३५) श्री. गोविंदराव कदम, पुणे ३६) श्री. श्रीराम सातर्डेकर, मुंबई ३७) श्री. अनंत राणे ३८) शिवाजी तुकाराम धुमाळ, शिर्डी ३९) आनंदसंगीत विद्यालय, कोपरगांव द्वारा श्री. आनंदराव आढाव ४०) श्री. बाबूराव नरोडे ४१) श्री. विकास किर्लोस्कर ४२) प्राध्यापक घैसास ४३) मोहिनी वैद्य ४४) माधवी गुजराथी ४५) रत्ना जाधव ४६) विद्या जोशी ४७) वर्षा जोशी ४८) भावना पुरोहित ४९) सुजाता वाबळे ५०) राणी भोकरे ५१) श्री. अनंत जोशी ५२) रविंद्र पिंगळे ५३) श्री. वसंतराव भावसार ५४) भारती गोदा ५५) जयश्री मुंदडा ५६) श्री. मु.ब. निंबाळकर, मुंबई ५७) सौ. प्रमिला निंबाळकर ५८) श्री. एम्.जी. सोनावणे, बडोदा ५९) श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे ६०) श्री. गणपत बाळाजी जाधव,

शिर्डी ६१) श्री. दत्तात्रय एन्. भोसले, बडोदा ६२) श्री. सुरेश लोणकर, पुणे ६३) श्री. ज्ञानोबा जगन्नाथ नगरकर, पुणे ६४) श्री. महादेव ग्यानुजी दैठणकर, पुणे ६५) श्री. नारायण राहुरकर, पुणे ६६) श्री. दत्तात्रय विठ्ठल घाग, घाटकोपर ६७) श्री. नितीन कोरगांवकर, मुंबई ६८) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई-गिरगांव ६९) श्री. भास्कर य. वराडकर ७०) श्री. रघुवीर शांताराम मिराणे, शिर्डी ७१) श्री. चंद्रशेखर गाडगीळ, पुणे ७२) श्री. चंद्रकात बी. बाईत, मुंबई ७३) श्री. दिलीप सावंत, मुंबई ७४) श्री. विजय मालवणकर ७५) श्री. जयवंत कुलकर्णी आणि पार्टी, मुंबई ७६) श्री रामदास मगरुळकर, मगरुळ ७७) श्री. मल्लेश ७८) श्री. अरविंद म्हात्रे ७९) श्री. शंकर विध्वांस ८०) श्री. यशवंत गव्हाणकर ८१) श्री. बबन मांडवकर ८२) श्री. बबन शेळके ८३) श्री. संजय परळकर ८४) श्री. महेंद्र गोखले ८५) श्री. ज्ञानोबा तात्या वाडेकर, शिर्डी ८६) श्री. अनिल उत्तरवार, नांदेड ८७) श्री. जगन्नाथ तालकुकुले, नांदेड ८८) श्री. विजय पत्तेवार ८९) श्री. अप्पा सावंत, मुंबई ९०) श्री. सखाराम गुरव, बेट-कोपरगांव ९१) कु. कविता मडावी, नगर ९२) श्री. वामनराव टाकसाळ, पुणतांबा ९३) श्री. राजकुमार बार्शीकर, पुणे ९४) श्री. राजा रंगनाथ देशपांडे, पुणे ९५) श्री. विश्वास द. साळूंखे, कोल्हापूर ९६) श्री. चंद्रशेखर जाधव, विजापूर ९७) श्री. सुभाष पोरवाल ९८) श्री. प्रकाश खैरमोडे ९९) श्री. रावसाहेब देशमुख, अमरावती १००) श्री. शिवराम बिडवे, संगमनेर १०१) श्री. अजित कुलकर्णी, पुणे १०२) श्री. गोविंद लोणकर, पुणे १०३) कुमार शेखर नटवर विसपुते, शिर्डी १०४) श्री. नाथा सोनावणे, वैजापूर १०५) श्री. नाना गवते, विटावा १०६) शाहीर कुमा कुळकर्णी, पाथर्डी १०७) सौ. व्ही.आर. कोळी १०८) श्री. विश्वास जोशी, पुणे १०९) श्री. शेख पटेल, अस्तगांव ११०) श्री. इ.जी. कर्डीले, वैजापूर १११) श्री. बी.एन्. कुळकर्णी, वैजापूर ११२) श्री. सिद्धेश्वर पीसे, बारशी ११३) श्री. बालमभाई सय्यद, राहता ११४) श्री. स्वरमुनी सदाशिवराव जाधव, पुणे ११५) श्री. दिगंबर भातोडे, राहता ११६) श्री. शशिकांत जोशी, राहता ११७) श्री. अशोक आढाव, पुणे ११८) श्री. वसंत दामोदर रासवे ११९) श्री. पी.पी. कठाळे १२०) श्री. महादेव तुपे १२१) श्री. रामकृष्ण सालकर १२२) श्री. देवेंद्र देवळकर, पुणे १२३) न्यू. गंधर्व ब्रास बॅण्ड, पुणे १२४) मयूर ब्रास बॅण्ड, पुणे १२५) श्री. चतुर्धन नागरे, शिर्डी १२६) श्री. रघुनाथ नागरे, शिर्डी १२७) श्री. बारावकर काका १२८) श्री. मधुकर निवृत्ती भालेराव, शिर्डी १२९) श्री. शांताराम मिराणे १३०) श्री. वसंतराव हाटकर १३१) श्री. आल्हाद सुमंत हाटकर १३२) श्री. नरहर बुवा व्यास, डोंबिवली १३३) श्री. विजय बांदेकर, मुंबई १३४) श्री. प्रदीप रघुनाथ गिरप १३५) श्री. सुरेश गोसावी १३६) श्री. शशिकांत ए. दळवी १३७) श्री. सतीशराव १३८) श्री. बारकूशेठ मांडवकर १३९) श्री. सुरेश रा. अंजर्लेकर १४०) श्री. सुभाष कांबळी १४१) श्री. विलास महाडीक १४२) श्री. अरविंद पवार १४३) श्री सिद्धेश्वर वारकरी सांप्रदाय, श्री वामन रामराव भाकरे, अमरावती १४४) श्री. सुरजराव, छोटीछापरी-राजस्तान १४५) श्री. दौलतराव १४६) कॅप्टन गोपाळ शेट्टी, साकरवाडी १४७) श्री. एस्.एस्. वाघ, साकरवाडी

१४८) श्री. एस्.ए. पटेल, साकरवाडी १४९) श्री. आंबोडकर एम्.आर., लक्ष्मीवाडी १५०) श्री. बी.व्ही. काळपांडे, रावळगांव १५१) श्री. एस्.एल्. राठी, कोपरगांव १५२) श्री. एस्.बी. जोर्तेकर, कोपरगांव १५३) श्री. एस्.एस्. कोटस्थाने, शिर्डी १५४) माठ सुरक्षा अधिकारी १५५) सौ. अनुराधा पिंपळगांवकर, पुणे १५६) ओंकार विलास परळकर, मुंबई १५७) श्री. विवेक मुळे, मुंबई १५८) श्री. प्रदीप रासने, अहमदनगर १५९) श्री. दिगंबर दामले, पुणे १६०) सौ. सुनीती केळकर, पुणे १६१) श्री. परशुराम बापट, १६२) श्री. शशिकांत पुराणिक १६३) श्री. मनोहर केतकर १६४) श्री. शंकर घाणेकर १६५) श्री. महेश सावर्डेकर १६६) श्री. नंदू चव्हाण १६७) श्री. केदार म्हात्रे १६८) श्री. दीपक राठोड १६९) श्री. माणिक साळी, शिर्डी १७०) श्री. ओंकार पिराजी पवार, शिर्डी १७१) श्री. विनायक ग्यानबा दैठणकर, पुणे १७२) श्री. मनोहर दत्तात्रय अवचट, बारामती १७३) श्री. दामूअण्णा महादेव दळवी, श्रीरामपूर १७४) श्री. शाहूराम भगवंतराव भोसले, साईधाम १७५) श्री. नवुशेक के. इराणी, मुंबई १७६) डॉ. देवीप्रसाद खंडेराव खरवंटीकर, अहमदनगर १७७) प्रा. मधुसुदन बोपर्डीकर, नगर १७८) श्री. पाठक गुरुजी, नगर १७९) श्री. रामचंद्र जगन्नाथ कवळे, पिरवडे १८०) ज्योत्स्ना उषा मंजिरी, हैद्राबाद १८१) श्री. बंडोपंत सोलापूरकर, (हळदे) पुणे.

**हवापाणी** - शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

## ऑगस्ट १९८६

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे —

**कीर्तन** - १) ह.भ.प. मधुकर सर्यवंशी , संस्थान गवई यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाच्या दिवशी झाली. २) ह.भ.प. दत्तात्रय महाराज गाडेकर, पारेगांव. ३) ह.भ.प. शुक्लेश्वर महाराज, खेडलेझुंगे, निफाड. ४) ह.भ.प. दिगंबर गोपाळ घुंगुर्डे, पुणे. ५) ह.भ.प. विश्वनाथ महाराज सहाणे, सुराळा, वैजापूर.

**प्रवचन**- १) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिर्डी. २) ह.भ.प. पोपट रामराव घोडके, शिऊर.

**भजन, गायन, वादन, इ.**- १) श्री. कचेश्वर बापू गडक, पारेगांव २) श्री. काशीनाथ यादव बिडवे ३) डॉ. बी.जी. पंड्या, उल्हासनगर ४) सौ. ज्योती मनुजा ५) श्री. चाँद मनुजा, मुंबई ६) कु. मीना मनुजा ७) श्री. तुकाराम खुशालचंद परदेशी, शिर्डी ८) श्री. हनुमान भजनी मंडळ, इचलकरंजी ९) श्री. रतनलाल महावीर शर्मा, नागपूर १०) विजयालक्ष्मी मलानी, ११) इंद्रा छाधा, १२) श्री. श्रीपाद बाळकृष्ण थोटे, १३) श्री. आश्विनकुमार पंड्या, पुणे १४) श्री. चंद्रकांत कामत, पुणे १५) श्री. मनोजकुमार पंड्या, पुणे १६) श्री. साईनाथ भजनी मंडळ, द्वारा तुळशीराम निवृत्ती पा. गोंदकर, शिर्डी १७) श्री. आर.व्ही. राजन, दिल्ली १८) श्री. एम. कृष्णा, हैदराबाद १९) श्री. पोपट रामराव घोडके, शिऊर २०) पद्मशाली मार्कंडेय भजनी मंडळ, शंकरराव सापा, पुणे

२१) श्री. सतीश वासुदेव काळे २२) स्वामी प्रेमगोविंद, पुणे २३) श्री. चंद्रकांत अत्रे २४) श्री. अभय कुळकर्णी २५) श्री. शिवलकर २६) श्री. रमेश गुलानी, पुणे २७) श्री. राजलिंग करमपुरी २८) श्री. शोभा जे.एस्. शास्त्री, हैदराबाद २९) श्री. जे.एस्. शास्त्री, हैदराबाद ३०) श्री. रामदास आनंद पाटील, दादर ३१) श्री. रमेश तुकाराम बेगरुट, पुणे ३२) श्री. एन्.बी. नारायण स्वामी, बंगलोर ३३) श्री. वसंत दत्तात्रय फुलंब्रीकर, वांद्रा ३४) श्री. दत्तात्रय रघुनाथ विशाल, वांद्रा ३५) श्री. दिनकर केशर वळणकर, गोरेगांव ३६) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई ३७) श्री. शत्रुघ्न मांजरेकर, मुंबई ३८) श्री. चंद्रशेखर गाडगीळ, पुणे ३९) श्री. गोविंद प्रसाद, मुंबई ४०) श्री. अशोक गुंजाळ, शिरडी ४१) श्री. ज्ञानेश्वर वैद्य ४२) मालिनी कपिलेश्वरी, मुंबई ४३) श्री. राजकुमार कपिलेश्वरी ४४) सौ. भागीरथीबाई आंबादास देवरे.

**स्वराज्य प्राप्ती दिन** - सालाबाद प्रमाणे शुक्रवार दि. १५ ऑगस्ट १९८६ रोजी स्वातंत्र्यदिना निमित्त श्री साईबाबा संस्थान शिर्डी तर्फे मा. कार्यकारी अधिकारी श्री. रा. द. बन्ने साहेब यांच्या शुभहस्ते ध्वजवंदन कार्यक्रम झाला. कार्यक्रमास संस्थान कर्मचारी, श्री साईधाम हायस्कूल बॅण्डपथक, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, होमगार्डस्, पोलीस, प्रतिष्ठित ग्रामस्थ मंडळी, साईभक्त, पाहुणे उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यानंतर सर्वांना चहापान देण्यात आले व मुलांना खाऊ वाटण्यात आला. रात्रौ श्रींचे कळसावर रोषणाई करण्यात आली होती.

**हवापाणी**- शिरडी येथील हवापणी उत्तम असून रोगराई काही नाही. पावसाचे प्रमाण कमी आहे.

---

# नाम तुझे गोड साई!

नाम तुझे गोड साई, नाम तुझे गोड
त्या नामाने रात्रंदिन मज लावियले वेड ॥ १ ॥
श्रद्धा आणि सबुरी हिच तुझ्या उपदेशातील खरी माधुरी
सेवुनिया झाले मी धन्य सबाह्य अंतरी ॥ २ ॥
दर्शन मज द्यावे साई, हिच एक आस ऊरी
सगुण साक्षात रूपे मज भेट एकदा तरी ॥ ३ ॥
कित्येकांना उद्धरूनी त्वा नेले भवपार
साई माऊली कृपा करी मज दीनावर ॥ ४ ॥
कधी न घडो विस्मरण मम तव चरणांचे
सतत आम्हा रक्षी साई तुझ्या आशीर्वचे ॥ ५ ॥

— **सौ. कुन्दा रमेश गोडे,**
'श्रेयस' १०९, ११०,
श्रीकृष्ण नगर, बोरीवली (पूर्व),
मुंबई - ४०० ०६६.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
# श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|
| १. श्री साई चरित्र | मराठी | ३४-५० | ६-०० |
| २. –"– | इंग्रजी | २०-०० | ४-२५ |
| ३. –"– | हिन्दी | १६-०० | ४-२५ |
| ४. –"– | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ५. –"– | तेलगू | १४-५० | ५-२५ |
| ६. –"– | तामीळ | १२-०० | ४-५० |
| ७. –"– | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ८. गुजराथी पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-०० |
| ९. श्री साईलिलांमृत | मराठी | ७-५० | ४-०० |
| १०. –"– | गुजराथी | ४-२५ | ४-०० |
| ११. अवतार व कार्य | मराठी | ६-५० | ४-०० |
| १२. स्तवन मंजिरी | मराठी | ०-३० | ३-५० |
| १३. –"– | गुजराथी | ०-३० | ३-५० |
| १४. सगूणोपासना | मराठी | ०-७० | ३-५० |
| १५. चार अध्याय | मराठी | १-२५ | ३-५० |
| १६. सगूणोपासना | सिंधी | १-२५ | ३-५० |
| १७. सचित्र साईबाबा | इंग्रजी | ३-४० | ३-५० |
| १८. मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | ३-५० |
| १९. –"– | इंग्रजी | २-०० | ३-५० |
| २०. –"– | तेलगू | २-५० | ३-५० |
| २१. –"– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २२. गाईड टू होली शिरडी | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| २३. –"– | मराठी | १-५० | ३-५० |
| २४. –"– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २५. तेलगु पुजाविधी | तेलगु | — | — |
| २६. रूद्राध्याय | मराठी | ०-९० | ३-५० |
| २७. साईबाबा ऑफ शिरडी बाय प्रधान | इंग्रजी | ३-०० | ३-५० |
| २८. साईबाबा ऑफ शिरडी वाय. पी. भरूचा | इंग्रजी | ६-५० | ४-०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १. | आशिर्वाद फोटो | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| २. | —"— | १०" × १४" | १-१५ | ३-५० |
| ३. | —"— | १०" × १२" | १-५० | ३-५० |
| ४. | —"— | ७" × २०" | ०-६० | ३-५० |
| ५. | —"— | ५½" × ६½" | ०-३५ | ३-५० |
| ६. | —"— | ४" × ५" | ०-३० | ३-५० |
| ७. | —"— | २" × ३" | ०-२० | ३-५० |
| ८. | दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| ९. | " " (काळापांढरा) | १४" × २०" | ०-८५ | ३-५० |
| १०. | दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | ३½" × ५½" | ०-६० | ३-५० |
| ११. | द्वारकामाई (रंगीत) | १७" × २२" | ५-७५ | ३-५० |
| १२. | —"— | १४" × २०" | १-६० | ३-५० |
| १३. | —"— | १०" × १४" | १-२५ | ३-५० |
| १४. | समाधी फोटो | १३" × ९" | १-१५ | ३-५० |
| १५. | —"— | ८" × ६" | ०-७५ | ३-५० |
| १६. | —"— | ४" × २½" | ०-१० | ३-५० |
| १७. | कॅमेरा फोटो (रंगीत) | ९" × १२" | १-६५ | ३-५० |
| १८. | ऑफसेट फोटो | ९" × १३" | १-५० | ३-५० |
| १९. | —"— | ५" × ७" | ०-४० | ३-५० |
| २०. | दगडावर बसलेले बाबा (निळा) | ९" × १२" | ०-७५ | ३-५० |
| २१. | मूर्ती फोटो (बुस्ट) | ३¾ × ४½" | ०-३५ | ३-५० |

मुद्रक : श्री.एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३ रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट,
नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई ४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक** :श्री.रा.द. बन्ने, साई निकेतन